म ग्रं सं ठाणे
विषय : काव्य
सं क्र : ८८९

॥ ॐ नम [illegible] ॥

# काव्यरत्नमाला

लेखक

[illegible]

REFBK-0001800

स्थळप्रत
म. ग्रं. सं. कार्यां.

REFBK-0001800

दा. क्र. १८००

॥ ॐ नमश्चंडिकायै ॥

# काव्यरत्नमाला.

रसिकचित्तविहारिणि मानिनी,
रमवि जी जनि वा धन-काननीं।
सरस मंजुल-वर्ण-पदान्विता,
सुकविता भवताप हरी स्वता.

लेखक

दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी. शेंदुर्णीकर.
आसिस्टंट मास्तर, सावदें.

[ प्रथमावृत्ति. प्रति ५०० ]
फेब्रुवारी १९२०

( ग्रंथकर्त्यानें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत )

किंमत २॥ रु.

हे पुस्तक शंकर नरहर जोशी यानीं आपल्या चित्रशाळा छापखान्यांत
१०२६ पेठ सदाशिव, पुणें येथें छापिलें

प्रकाशक—दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी, शेंदुर्णीकर. मु. सावदें

सूचना:—



धैर्यौदार्यचूडामणि श्रीमंत सरदार गंगाधरराव रघुनाथराव
गंभीरराव, देशमुख, देशपांडे, सर कानगो, सावर्दे

# अर्पणपत्रिका.

## श्रीमंत अण्णासाहेब !—

महाराष्ट्र काव्याभिमानी पुष्कळ असतील; परंतु त्यांत श्रीमंत थोडे सापडतील; आणि त्यांनीही ऐष-आरामाकडे खर्च होणारें वित्त राखून त्याचा काव्योत्तेजनार्थ व्यय करणारे तुमच्यासारखे सरस्वतीचे लाल फारच थोडे आढळतील.

आज चार वर्षे आपल्यासारख्यांच्या सहवासांत राहून तयार केलेला हा काव्याचा रत्नहार मी प्रेमानें आपल्या कंठांत घालीत आहें.

आपला नम्र

दु० आ० तिवारी.

# विषयानुक्रम


पृष्ठ

अर्पणपत्रिका
ग्रंथकर्त्याचे चार शब्द
ग्रंथपरिचय
प्रस्तावना
१ छत्र-बंध
२ आराधना १
३ "परीक्षा केव्हांही वयानें वयुनीं होत नसते" ४
४ पंकजमालाबंध ६
५ कोकिला ८
६ बाहिर्लापिका १०
७ शुष्क आम्र ११
८ काकान्योक्ति १५
९ "सगळे दिवस सारखे नसतात" १७
१० अष्टदल कमलबंध २०
११ भग्न मंदिर २१
१२ नरा ! वाहशी व्यर्थ कां गर्वराशी ? " २८
१३ चातक ३३
१४ अष्टदलाबदल ३५
१५ अंतर्लापिका ३७
१६ कीर्तिच्या मंदिरांत ३८
१७ भिकारीण ४०
१८ कशाला ? ४४
१९ मृत कोकीळ ४७
२० जीवितसाध्य ५२
२१ चक्र बंध ५५
२२ मौज ५६

२३ संभाजीचें औरंगजेबास उत्तर ६०
२४ " निर्दोष कोणी जगतांत नाहीं " ६२
२५ विश्वाचा बाजार ६४
२६ हेंवे चोरास ६६
२७ प्रभंजन ७०
२८ मेवाडच्या सरहद्दीवरील प्रतापसिंहाचे उद्गार ७२
२९ मझार घूं ७७
३० अग्रगृह-प्रवेश *
३१ स्वर्गंगा ८१
३२ विधवा ८३
३३ हें सारें कशामुळें ? ८९
३४ स्मरण पूर्ति ९५
३५ भावगुणवनुरंग ९६
३६ निकान्योक्ति ९७
३७ विरहतरंग ९९
३८ यशोगायन १११
३९ अश्रुबिंदु १२२
४० सामुदायास १४६
४१ सीताशपथ १६०
४२ कृष्णाकारुण्य १६८
४३ " शारदी कटोरी मेला " १७४
४४ " विश्वास सोडुनी गेला " १७९
४५ " भाऊ ! भाऊ ! ! " १८२
४६ " मोहरा हरेला पडला " १८९
४७ विश्वास १९३
४८ दिवाळी व देशांतील दैन्य १९७
४९ समाराधन १९८
५० " कांतांचा ध्वज मळवीला " २०२
५१ " स्वर्गांत भेट होईल " २०५
५२ " विजयाच्या द्वारीं अडला " २११
५३ मन:सान्त्वन २१७

| | | |
|---|---|---|
| ५४ | छत्रपतींचा मानभंग | २१९ |
| ५५ | हे मोडें ? | २२२ |
| ५६ | विजयोत्साहदिन | २२४ |
| ५७ | चक्रव्यूह बंध | २२८ |
| ५८ | " कृपेची तुझी नित्य छाया असावी " | २२९ |

# ग्रंथकर्त्याचे चार शब्द.

" रसात्मकं काव्य " काव्याच्या या लहानशा लक्षणांत जो अर्थ आहे त्याला धरूनच त्याच्या इतर विस्तृत व्याख्या करण्यांत येतात. जी शब्दरचना हृदयस्पर्शकारी असते ती काव्य होय; मग ती रचना गद्य कां असेना. पण एवढें लक्षांत घेतलें पाहिजे कीं, गद्य आणि पद्य हीं भाषेचीं दोन अंगें आहेत आणि " काव्य " ही संज्ञा विशेषानें उत्कृष्ट पद्यरचनेसच लावितात. ही उत्कृष्ट पद्यरचना साधण्यास दोन गोष्टींची आवश्यकता लागते, कल्पना व शब्दसाहित्य. त्यांतही कल्पनेचें फार महत्त्व असतें. कल्पना काव्याचा आत्माच होय म्हटलें तरी चालेल. अवलोकनानें व वाचनानें उद्भूत झालेले मनोविकार जेव्हां हृदयावर आघात करूं लागतात, तेव्हां त्यांत त्या त्या विषयासंबंधीं एकंदर भावनांचा समवाय झालेला असतो. त्या त्या भावना कल्पनेच्या साह्यानें विस्तृत करावयाच्या हें एक कार्य आणि त्या भावनाविस्तृत्वाला विशद करावयाला बरोबर शब्दयोजना करावयाची हें दुसरें कार्य; अशीं काव्यरचनेंत दोन कार्यें प्रमुख आहेत. उदाहरणानें असें दाखवितां येईल कीः—

रस्त्यानें जातांना एक अनाथ पोर अन्नपाण्यावांचून आसन्न स्थितींत पडलें आहे, त्याला पाहतांच आपणास जो कळवळा येतो, त्या कळवळ्यांत त्याचे आईबाप मेले असतील कीं जिवंत असतील, मेले असतील तर शेवटला उच्छ्वास टाकतांना या पोराकडे पाहून त्यांस काय वाटलें असेल, या पोरासहि तेव्हां किती दुःख झालें असेल, याचे दिवस आतां पुढें कसे जातील वगैरे वगैरे कितीक गोष्टी त्यांत भरलेल्या असतात, त्यांचें पृथःकरण ज्याची कल्पनाशक्ति अधिक तेजस्वि असेल तो अधिक चांगलें करील. म्हणजे आपल्या डोळ्यांपुढें त्याच्या भूत व भविष्य काळाचें चित्र उभें करूं शकेल! तें हळहळावयास लावणारें यथार्थ चित्र काढावयास शब्दसाहित्य इतकें तयार पाहिजे कीं, तत्स्थितिनिदर्शक अमूक एक शब्द कवितेंत बसत नाहीं तर तोच अर्थ दाखविणारे दुसरे पुष्कळ शब्द सुचले पाहिजेत. कल्पनाचित्र डोळ्यांपुढें आणणें हेंच काम कठीण आहे. तें साध्य झाल्यावर तद्दर्शक भाषा बोलण

सोपें असलें तरी 'तें' त्यास पद्याचें रूप द्यावयाचें असतें आणि पद्याचे नियम ( गण मात्रा यति व० ) सांभाळून बोलावयाचें म्हणजे त्या साच्यांत न बसणारा शब्द सोडून तदर्थी दुसरा शब्द चटदिशीं सुचला पाहिजे.

वरील कल्पनेस शोधीत फिरणारा व ती सांपडतांच शब्दभांडार शोधणारा कवि लोकांस वेडा वाटतो परंतु कल्पना आणि भाषा याचा मिलाफ घडतांच होणारा त्याचा कल्पनातीत आनंद या वेड्यांना काय ठाऊक ! ! वेडे म्हणविल्या जाणाऱ्या कवींनींच तर सगळ्या जगास शहाणपणाच्या आनंदात नेऊन सोडलें आहे. वरील कल्पनेस-कधीं हातीं येणाऱ्या व कधीं निसटून जाणाऱ्या या आकाश-चुपलेस भाषेचा पेहेराव देऊन " काव्यरत्नमाला " या नांवाने मी तिला महाराष्ट्र रसिकां पुढें दुसऱ्यानें आणीत आहे.

यांतील बहुतेक कविता निरनिराळ्या मासिकातून प्रसिद्ध झालेल्या आहेत. छत्र-बंध, चक्रबध वगैरे चित्रालंकारांची रचना संस्कृत काव्यात बरीच आहे तितकी ती मराठींत नाहीं. निदान आधुनिक काव्यांत नाहीं, म्हणून मी तो प्रयत्न केला. श्रीमंत सरदार आण्णासाहेब देशमुख यांना तो विशेष आवडला व त्यांजकडून कर्त्यास त्याबद्दल योग्य पारितोषिकहि मिळालें म्हणून त्याचें वृद्धिंगत स्वरूप या काव्यकलापांत बघावयास सांपडत आहे. पुस्तकांतील इतर कवितांसंबधानें माझें मला काहीं लिहावयाचे नाहीं. 'अश्रुबिंदु' ही कविता जवळ जवळ खंड काव्यच आहे. तें स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध करावें अशी काहीं कविमित्रांची सूचना होती. ज्या साध्वीकरितां ते अश्रुबिंदु गळाले तिच्यावरील माझ्या अमर्याद प्रेमाने मला तसें करावेंसेंहि वाटत होतें; पण दारिद्र्यानें माझी मनीषा जाळिली. प्रेम जाळणें शक्य नव्हतें म्हणून " प्रसन्नराधा " हें दुसरें खंडकाव्य लिहून मी तें तिला अर्पण केलें आहे.

माझे कविमित्र श्री. दत्तात्रय अनंत आपटे ( अनंततनय ) हे आजारी असतांहि त्यांनीं माझ्या विनंतीस मान देऊन या माझ्या काव्यकलापास मार्मिक प्रस्तावना लिहून दिली याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

धैर्योदार्यचूडामणि श्रीमंत सरदार गंगाधरराव रघुनाथराव गंभीरराव देशमुख देशपांडे सरकानगो, सावदें, यांनीं हा ग्रंथ अर्पण करण्यास परवानगी दिली आणि सर्वतोपरी आर्थिक सहाय्य केलें. 'काव्यकुसुमांजलि' या पुस्तकासहि या दानशूर महात्म्यांनीं मला असेंच आर्थिक साह्य केलें या दोन्ही गोष्टींनीं त्यांनीं मला ऋणी करून ठेविलें आहे

माझे मित्र श्री. यशवंत व्यंकटेश कुळकर्णी श्री. गणेश बळवंत नाईक व श्री. विष्णु तुळशीराम शिंपी यांनीं ग्रंथांच्या आकारे काढण्यास मजकरितां श्रम घेतले म्हणून त्यांच्याविषयीं मी कृतज्ञ आहें.

पुण्यास मलेरियानें कहर केल्यामुळें छापखान्याची तारांबळ उडली असतांहि चित्रशाळेच्या म्यानेजरांनीं व्यवस्थितपणें माझें हें छपाईचें कार्य पार पाडलें यामुळें त्याविषयीं मला आदर वाटत आहे.

शेवटीं ज्या जगज्जननी चंडिकेनें माझ्या तोंडून ही काव्यवाणी वदवली तिला नमस्कार करून हे स्मरणीय विचार आटोपतों.

॥ ॐ नमश्चंडिकायै ॥

दु. आ. तिवारी,
सावर्दे, २५।२।२०.

# ग्रंथपरिचय.

आधुनिक महाराष्ट्र कवितेविषयीं सामान्य जनसमुहांत दिसून येणारा अनादर दिवसेंदिवस नाहींसा होऊं लागला आहे याबद्दल कोणाहि काव्य भोक्त्यास संतोषच वाटला पाहिजे.

आधुनिक महाराष्ट्र कविता सामान्य जनतेच्या अनादरास कां पात्र झाली याची विचिकित्सा करण्याचें हें स्थल नव्हे. परंतु ती गोष्ट अगदीं कानामागें टाकणेंहि उचित नाहीं. प्राचीन महाराष्ट्र कविता प्राय ईश्वरपर व वेदांतपर अतएव तात्विक आहे. प्राय. म्हणण्याचें कारण श्रीज्ञानदेव, नामदेव, एकनाथ यांच्या काव्याबरोबर रामजोशी, अनंतफंदी, होनाजीबाळ, गोविंदा साव्ळी वगैरे शाहिराच्या शृंगारिक व व ऐतिहासिक लावण्या पोवाड्यांचा अंतर्भावहि प्राचीन काव्यांतच होतो.

प्राचीन काव्याबद्दल जनतेच्या मनांत इतका आदर कां ? व अर्वाचीनाबद्दल कां नाहीं याचा सूक्ष्म विचार करितां असें आढळून येईल कीं, त्यात कांहीं तरी तथ्यांश आहे अगदीच वांरेमापी खास नव्हे कसें तें आता आपण पाहूं.

पाश्चात्यांपेक्षां आम्हा भारतवर्षीयांच्या अतएव पौरस्त्यांच्या अंगीं आमच्या धर्माचीं तत्व व समजुती इतक्या खोल रुजल्या आहेत कीं, धर्माशिवाय आमचें पाऊल पालटत नाहीं व म्हणूनच 'आचार.प्रथमो धर्म' हें वाक्य आमच्यांत अत्यंत रूढ होऊन बसलें आहे. आमच्यातील प्रत्येक व्यावहारिक कार्यांची, सण-वारादि उत्सव दिनांची उभारणी धार्मिक तत्वावर कशी केली आहे हें बारकाईनें पाहिल्यास वरील म्हणण्याची सत्यता प्रतीत झाल्याशिवाय खास राहणार नाहीं परमेश्वरानें मनुष्यास बुद्धि व वाणी या ज्या अमूल्य देणग्या देऊन अखिल जीव-सृष्टीच्या स्वामित्वपदावर स्थिर जमान केलें आहे त्याबद्दल त्याचें त्याच बुद्धि व वाणीच्या बलावर गुणानुवाद गाण्यापलीकडे वाणीची इति कर्तव्यता दुसरी कोणती असणार ? वाणीची योग्यता अतर्क्य आहे प्राचीन काळचे ऋषि तिला ब्रह्मच समजत.

"स यैतत्सर्वं विज्ञापयति वाचमुपास्स्वेति । स यो वाचं ब्रह्मेत्यु-पास्ते । यावद्वाचोगतं तत्रास्य तथा कामचारो भवति । यो वाचं ब्रह्मे-त्युपास्ते"

—छान्दोग्योपनिषत्.

" वाणीच सर्वज्ञान करून देते, तेव्हा वाणीची उपासना करा, जो वाणीला ब्रह्म समजून उपासना करितो, तो वाणीच्या साम्राज्यात स्वतंत्र होतो. वाणीला ब्रह्म समजून उपासना करितो तोच असा होतो " शिवाय प्रत्येक जीवाचें अंतिम-ध्येय 'ईश्वरप्राप्ति' हेंच आहे अशी वस्तुस्थिति असल्यामुळे आमच्यातील सामान्य-जनसमूहास-इंग्रज वाङ्मयाने भारलल्यास नव्हे-आधुनिक वैषयिक व भिन्न प्रकारची कविता फारशी न आवडतां प्राचीन कविताच त्यांच्या आदरास पात्र व्हावी यांत विशेष आश्चर्य तरी कोणतें? व यात त्याना दोष तरी का म्हणून द्यावा. वस्तुत. कांहीं कारण नाहीं आंबे आवडणाऱ्या मनुष्याला नारिंग अगर सफरचंद आवडलेंच पाहिजे हा सिद्धांत बांधणे युक्त होणार नाहीं.

वस्तुत. कवितेचे प्राचीन व अर्वाचीन असे भाग पाडण्याचें प्रयोजनच नाहीं संस्कृत वाङ्मयात असे भाग कोणी पाडलेले नाहींत वेदकालीन वाङ्मयास 'आर्ष' म्हणजे ऋषिप्रणीत म्हणण्याचा प्रघात आहे पण यात प्राचीन आणि अर्वाचीन असे विभाग केलेले नाहींत हे लक्षात ठेविलें पाहिजे. इतर वाङ्मयातही असे भाग केल्याचें ऐकिवात नाहीं. मग आमच्या मराठीवरच हा शस्त्रप्रयोग करण्याचें कोणा अर्वाच्याच्या डोक्यांत आलें कळत नाहीं. परंतु एवढी गोष्ट खरी कीं, त्या बहाद्दराने जी ही फाडाफाड करून एका अंगाचीं दोन शकलें केलीं तीं पुनश्च जोडणें अगदीं दुष्कर झालें आहे संस्कृतातल्याप्रमाणें फार तर संतकालीन किंवा संतप्रणीत म्हणून 'सान्त' असा भाग पाडला असता तर बरें झालें असतें. असें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं. अशी वस्तुस्थिति आहे तरी 'प्राचीन व अर्वाचीन अगर आधुनिक कविता' हे शब्द इतके रूढ झाले आहेत कीं 'शास्त्राद्रूढिर्बलीयसी' या न्यायाने ते व नव शब्द आतां वापरल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

प्राचीन व अर्वाचीन महाराष्ट्र कवितेच्या अंतर्बाह्य स्वरूपांत बराच फरक पडला आहे व झाला कारण सर्वांशीं नसलें तरी बऱ्याच अंशी परिस्थिति आहे परिस्थितीचा वरवंटा कठीण आहे अर्वाचीन कविता इंग्रजी वळणावर जात आहे-नव्हे गेली आहे आतां हे वळण चांगलें कीं वाईट याची चर्चा करण्याचें हें स्थल नाहीं व कारणही पण नाहीं. 'पदरीं पडलें पवित्र झालें' या नियमाला अनुसरून जें जें आतां कांहीं घरीं चालून येईल त्याला मुकाट्यानें घरांत घेऊन त्याचे भाग आवडीनें कोड कौतुक केलें पाहिजे हें निर्विवाद आहे 'नवकल्पना' हें आधुनिक कवितेचें एक मुख्य लक्षण आहे असं मानण्यांत येत आहे परंतु 'स्वर्गाचे द्वारांत' या काव्यांत द्वारपालाने कवीस सांगितल्याप्रमाणे—

'विश्वातीत अशी न वस्तु विलसे या ! जन्मजन्मार्जित
'नानासंस्कृति सुष्ट दुष्ट तव ज्या, त्यांचीच जीं निश्चित-
'रूपें मूर्त हृदंतरीं विनटती,—त्या त्या तुझ्या कल्पना;
'ध्यानीं कीं मनिं जें सदा भ्रमतसे स्वप्नीं दिसे होय ना ?

कल्पना शब्दाची वाट झाल्यावर त्यांत फारसा तथ्यांश उरत नाहीं असो 'रसात्मकं काव्य' किंवा हृदयाला आनंदविणारें तें काव्य अशीच काव्याची एकतंत्री व्याख्या जमेस धरून कित्येकजण सर्व भाषांतील काव्य एकाच मापानें सरसहा मोजण्याचा प्रयत्न करितात. परंतु तसें करणें सर्वथैव युक्तच आहे असें वाटत नाहीं मनुष्यप्राणी जर येथून तेथून एकच तर वर्णभेद कां ? यदाकदाचित् वर्णभेद जलस्थलवाय्वादिकामुळें झाला असें जरी घटकाभर कबूल केलें तरी पाश्चात्य पंचमहाभूतें वेगळीं व पौरस्त्य पंचमहाभूतें वेगळीं असें म्हणता येत नाहीं. अर्थात 'हवा पाणी' हें भेदाचें कारण खास नव्हे. बरें एक वेळ तेच कारण धरून चालल तर जपानी व चिनी लोकांचीं नाकें चपटीं का ? तार्तरी लोकांचे डोळे घार का ? व आफ्रीकन लोकांचे ओठ जाड कां ? याची कारणपरंपरा कोणी सांगेल काय ? सुमनसृष्टि येथून तेथून एकच पण गुलाबाचें फूल गुलाबी व मोठें कां ? जाईचें फूल पांढरें कां ? जुईचें फूल अगदीं बारीक कां ? पारिजातकाचं फूल इतकें कोमल कां ? व कण्हेरीचें किंवा चाफ्याचें फूल इतकें निबर्ट कां ? याची कार्य-कारणमीमांसा कोणी करील काय ? स्थूलमानानें विचार करून आपण क्षणभर असें म्हणूं कीं, चर्मचक्षूला दृश्यमान होणाऱ्या या बाह्यस्वरूपभेदालाही पण हवा-पाणी व भूमि यांची भिन्नता हेंच कारण होय. बरें पण मग अंत:स्वरूपात विभिन्नता कां उत्पन्न व्हावी ? एकाची वृत्ति सात्विक का ? दुसऱ्याची तामस कां ? व तिसऱ्याची राजस का ? एका पुष्पाचा सुवास मधुर का ? दुसऱ्याचा उग्र कां ? व तिसऱ्याचा घाणेरडा कां ? आणि चवथ्याला वासच कां नहीं ? असाच धागा पुढें काढीत गेल्यास असेही प्रश्न निघतील कीं, पारिजातकाचीं व दुसरीं कांहीं फुलें सकाळींच का फुलतात ? खवळ्योवरीची किंवा दुपारीचीं दुपारींच कां उमलतात? व निशिगंधाचीं प्रदोष काळींच कां फुलतात ? याचीं समर्पक उत्तरें देणें खरोखरीच फार कठीण जाऊन अखेरीस 'विषमसृष्टिगुणाले' ही ईश्वरी कृति आहे असें म्हणून स्वस्थ बसावें लागेल अशी लेखकाची अल्प समजूत आहे तात्पर्य मानवसुमसृष्टि-मूळांत एक स्वरूपी असताही त्यास जशी सहजविभिन्नता प्राप्त झाली आहे तशीच

काव्यासही झाली आहे. काव्याचें अमूर्तस्वरूप ईश्वरनिर्मित असून मूर्तस्वरूप ही मनुज कृति आहे अर्थात् प्रत्येक जीवाची मनोवृत्ति व मनोधर्म भिन्न असल्यामुळें काव्यनिष्पत्ति भिन्न होणं साहजिक आहे. त्यांत आणखी आचारविचारांच्या भिन्नतेचें व बाह्यसृष्ट्यवलोकनाचे परिणाम काव्यावर होत असतात तें निराळेंच. उपनिर्दिष्ट कार्यकारणपरंपरा ध्यानांत घेतली असता प्रस्तुत मुद्दा सयुक्तिक नाहीं, असें बहुशः म्हणवणार नाहीं व 'भिन्नरुचिर्हि लोकः' हें तत्त्व डोळ्यापुढे ठेविल्यावर त्याची यथार्थता प्रतीत झाल्याशिवाय राहणार नाहीं.

महाराष्ट्र प्राचीन कविता व अर्वाचिन कविता यांच्या स्वरूपांत अंतर कोठें, कसें व कशामुळें पडलें याचें अंधुक दिग्दर्शन वर केलें आहे. अशा प्रकारें आधुनिक कविता प्राचीन कवितेचे कांहीं गुण अर्वाचिन कवितेंत सहजच उतरले आहेत 'जो गुण बाळा तो जन्मकाळा' हें सुभाषित प्रसिद्धच आहे.

रा० दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी यानीं वेळोवेळीं मासिक पुस्तकांतून प्रसिद्ध झालेल्या आपल्या कांहीं कविता व कांहीं अप्रसिद्ध कविता एकत्र ग्रथित करून त्यांचा हा दुसरा हप्ता 'काव्यरत्नमाला' या नांवाखालीं ग्रंथरूपानें छापून तयार केला त्याला प्रास्ताविक चार शब्द जोडण्याविषयीं रा० तिवारी यांनीं प्रस्तुत लेखकास प्रेमळपणें सांगितलं. प्रस्तावनालेखकाचें काम म्हणजे मुनिमाचें काम आहे. मालक तिवारी, गिऱ्हाईक महाराष्ट्र काव्यरसिक व मध्यस्थ-मुनीम-प्रस्तुत लेखक अशी ही त्रिकुटी आहे. म्हणजे रा० तिवारी यांच्या काव्यकोषागारांतील काव्यरत्नें महाराष्ट्र काव्यरत्नपारख्यांस पटवावयाचीं आहेत व म्हणून प्रस्तुत लेखक हे चार शब्द येथें लिहित आहे. रा० तिवारी हे आपल्या काव्यगुणानें महाराष्ट्रास परिचित झालेले आहेतच. त्यांच्या काव्यरत्नावलि. मनोरंजन, वि० ज्ञा० विस्तार मराठी शिक्षक, नवयुग, उद्यान, महाराष्ट्र साहित्य, लोकमित्र या मासिक पुस्तकांतून आलेल्या कविता पुष्कळांच्या नजरेखालून गेल्या आहेत व म्हणून त्यांचा याहून जास्त परिचय करून देण्याचें तादृश कारण नाहीं. त्यांचा 'काव्यकुसुमांजलि' नांवाचा एक काव्यग्रंथ महाराष्ट्राच्या पुढें आहेच व दुसरीं तीन खंडकाव्यें ('प्रसन्नराधा' 'मनोहरलीला' व 'प्रतापसुंदरी') हीं तयार असून तीं लवकरच ग्रंथरूपानें बाहेर येणार आहेत इतकें सांगितलें म्हणजे पुरे.

'आकृति सुंदर तेथें वद न धरी कोण आदरा जीवा'

हें सुभाषित यद्यपि खरें असले तरी मनुष्याचें मोठेपण त्याच्या आकृतीवर

नसून त्याच्या कृतीवर असतें म्हणून ग्रंथकाराचा परिचय करून दिला इतका पुरा करून त्याच्या कृतीचा परिचय करून देतों म्हणजे झालें.

प्रस्तुत रत्नमालेंत रत्नें असून तीं खरोखरच नितांत रमणीय आहेत. त्यात छत्र, पंकजमाला कमल, चक्र, चक्रव्यूह, मोज, अष्टगृह किंवा गृध्र, अंतर्लापिका, बहिर्लापिका असे ९ चित्रबंध असून ते सुंदर साधले आहेत एका काळीं चित्रबंध रचना फार लोकप्रिय होती तिला प्रस्तुत कवींनें हल्लींच्या काळीं चालना दिली आहे. चित्रबंध हे गणितांतील कूटाप्रमाणेंच असतात. गणितांतील कोडीं सोडविताना जरी त्रासदायक वाटलीं तरी तीं सोडविल्यावर मनास आल्हाद वाटतो. तोच प्रकार चित्रकाव्याचा आहे. यांत अर्थगांभीर्याच्या दृष्टीनें बघावयाचें नसते तशी दृष्टि सहसा कोणी ठेवीत नाहीं आणि ठेवूंही पण नये. उपरिनिर्दिष्ट बंध पाहिले असतां बंधकाराचें भाषाप्रभुत्व उत्तम प्रकारें प्रतीत होतें.

‘ आराधना ’ ‘ कृपेची तुझी नित्य छाया असावी हीं प्रकरणें कवीची भक्ति-प्रवीणता निदर्शनास आणून देतात. परमेश्वराचे गुणानुवाद वर्णन करून त्याचें स्तुति-स्तोत्र गाणें या पलीकडे वाणीची इतिकर्तव्यता नाहीं व हा सिद्धांत कवीचे अंत-र्यामीं बिंबला आहे याबद्दल वाद नाहीं

‘ भग्नमंदिर ’ ‘ कीर्तीच्या मंदिरांत ‘ भिकारीण ‘ विधवा विरहतरंग ’ व ‘ अश्रुबिंदु ’ हीं प्रकरणें सारखींच सरस असून तीं हृदयसिंधु हेलवून सोड-णारीं आहेत. ‘ भग्नमंदिर पाहिल्यावर प्रत्येकाचें मन क्षणभर तरी उदास झाल्या-वाचून रहाणार नाहीं व अश्रुबिंदु तर पुस्तकाचीं पृष्ठेंच ओलीं करवितील. ‘ संभाजीचें उत्तर ‘ प्रतापसिंहाचें उद्गार व ‘ यशोगायन ’ हीं तीन ऐतिहासिक प्रकरणें असून तीं भीरुमनालाही उत्तेजित करणारीं आहेत संभाजीनें औरंगजेबास दिलेलें सणसणीत पण खोंचदार उत्तर, प्रतापसिंहाचे निराशाव्यंजक उद्गार व दत्ताजी शिंद्याचें वीरश्रीनिदर्शक भाषण ज्याच्या अंतःकरणांत कल्लोळ करून सोडणार नाहींत त्याला स एव मुक्तो या कोटींत खुशाल घालावें

मायदेशाविषयीं प्रेम कोणाला नसतें ? ज्याला स्वाभिमान व स्वदेशाभिमान नाहीं तो ‘ मानव ’ या संज्ञेसच पात्र होत नाहीं स्वदेशाची दुरवस्थापाहून कवीचें अंतःकरण तिळतीळ तुटत आहे, याची ‘महाराष्ट्र हीं कविता उत्तम साक्ष पटविते. त्याचप्रमाणें परकीयांच्या फाजिल अनुकरणामुळे आमचें किती चमत्कारिक स्थित्यं-तर झालें आहे व प्रत्यहीं होत आहे, हे पाहून कोणाही स्वाभिमानी पुरुषास क्षणभर

तरी खिन्नता ही वाटलीच पाहिजे. व तशाप्रकारें कवि खिन्न झाला आहे. तो सुधारणादेवीला संबोधून---

'देशोद्धार तुझ्याविना न अडला चिंता तुला ती नको

असे चोख व निर्व्याज उत्तर देत आहे ही मोठ्या समाधानाची गोष्ट आहे. आणि त्याबद्दल कवि प्रशंसेस पात्र नाहीं असें कोण म्हणेल? 'मृतकोकिळ' व 'शुष्क आम्र' हीं प्रकरणे मनाला आनंदविणारीं असून त्यांपैकीं प्रत्येक कवितेंत कवीनें एकेक सिद्धांत ग्रथित केला आहे! हे सिद्धांत प्रत्येकाला पटणारे असून ते कवीच्या चाणाक्षपणाची, दूरदृष्टीची, सूक्ष्मावलोकनाची, बहुश्रुतपणाची व हंसबुद्धीची साक्ष पटवितात


'काकान्योक्ति' 'सगळे दिवस सारखे नसतात' 'नरा वाहसी व्यर्थ का गर्वराशी?' 'कशाला?' 'निर्दोष कोणी जगतांत नाहीं' 'विश्वासाचा बाजार' 'हेवेखोरास' 'हें सारें कशामुळें?' या प्रासंगिक कविता असून यांत कवीनें स्वानुभव ओतिला आहे प्रत्येकजण हा जगाचा अंशात घटकावयव असून तो तें दुसऱ्याशीं वर्तन करतांना विसरत असतो. वस्तुत: हा प्रकार उचित नव्हे दुसऱ्यानें आपल्याशी ज्या तऱ्हेनें वागावें अशी इच्छा असते त्या तऱ्हेनें आपण त्याच्याशीं वागावयाचें असतें, परंतु पुष्कळवेळां हा प्रकार आपल्या हातून होत नाहीं व कटु अनुभव आल्यावर त्याबद्दल दुसऱ्याचे माथीं खापर फोडतों याला अपवाद नाहींत किंवा नसतील असें म्हणावयास लेखक तयार नाहीं परंतु ते अपवादच होत हें विसरतां कामा नये गंगातटाकीं राहून गंगाजलानें नुसतें अघमर्षण करणारे व कापरा इतका हात पैशात घातला तरी कोरडा ठण्ठणीत काढावयास लावणारे हरीचे लाल जगांत कमी नाहींत! नसते तरच नवल. अशांची संभावना भर्तृहरीनें म्हटल्याप्रमाणें 'ते कोण की दुर्मति' या वाक्यानें करून त्यांची सर्वथैव उपेक्षाच करणें योग्य. त्यांना उपदेश करूं जाणें म्हणजे कडू भोपळ्याला गोड करण्याचा प्रयत्न करण्यासारखें आहे. "प्रायश्चित्त दिलें तरीहि न भलें ज्याचें मन क्षोभलें" असें म्हणून स्वस्थ बसावें दुसरें काय? परंतु जगांत असे लोक जर नसते व सर्वच तुकाराम बुवा असते, तर जगाचें 'जगत्व' जाऊन त्याजकडेस 'स्वर्ग' म्हणूनच बोट केलें असतें!! व 'यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत' या गीतासिद्धांताला हरताळ फासावी लागली असती। दुर्जनांशिवाय सज्जनांना मोल नाहीं तिळेशिवाय सुवर्णाला सुवर्णता नाहीं व कांट्यांशिवाय गुलाब नाहीं, दुष्ट खर अफझुलखान, रुस्तुमजमान, व सिद्दीजोहार यांचे अभावीं श्रीशिवछत्र-

पतिदिग्विजय लिहिलाच गेला नसता. मंबाजी व रामभट्ट वाघोलीकर यांचे अभावीं तुकाराम महाराजांचें साधुत्व तावून निघालें नसतें, असें म्हणावयास कोणता प्रत्यवाय आहे ?

सबंध काव्यकलापच पुढें हाताशीं असल्यामुळें त्यांतील अधले मधले अर्धवट उतारे येथें आणखी देऊन प्रस्तावना फुगविण्याचें व चर्वित चर्वण पुनः पुन करावयास लावण्याचें कांहींच कारण नाहीं. वस्तुत लेखकाची कामगिरी येथेंच संपली आहे, परंतु एका गोष्टीचा प्रामुख्यानें उल्लेख करावयाचा राहिला आहे तेवढें करून प्रस्तुत लेख आटपु ही गोष्ट म्हटली म्हणजे आभार प्रदर्शन कवीनें आपला हृदय-सागर मंथन करून हीं काढलेलीं वाग्रत्नें किंवा हृदयसरोवरातील भावनाकमलिनीचीं मनोहर कमलें किंवा हृदयाच्या भागावर बुद्धीरूप धोट्यानें विणून महेश्वरी, धनवडी, खंबायती, नागपुरी, ब्र्हाणपुरी, इरकली इत्यादि वळणार काढलेलीं विचाराचीं जरीभर्जरी तलम रेशमी वसनें, ज्या स्वर्णगुणात गांठून ज्या सुंदर परडींत भरून किंवा ज्या मनोवेधक बासनांत बांधून महाराष्ट्रीय गुणग्राही व रसिक बंधुंभगिनींपुढें मांडीत आहें तो गुण, ती परडी, तें बासन म्हटलें म्हणजे साववाचे प्रख्यात दानशूर व उदारधी श्रीमत गृहस्थ सरदार गंगाधरराव रघुनाथराव गंभीरराव देशमूख देशपांडे सर कानगो यांची कृपा होय श्रीमंताचे कृपेचे अभावीं ही रत्नमाला व हा कमालखानी कमलहार तयार होणें केवळ दुरापास्त होतं ता रत्नें कोठें तरी पडलीं असतीं कमलें सुकलीं असता व दुकूल-वसनें जागच्या जागीच चिंध्या विंध्यांत लोळत पडून त्याचे तुकडे तुकडे झाले असते सदरहू ग्रंथ-प्रकाशनास लागणारें द्रव्य वेंचून सरदार साहेबांनीं रा० तिवारी कवीसच नव्हे, तर सर्व महाराष्ट्राला आपलें ऋणी करून ठेविलें आहे व हें त्यांना अत्यंत भूषणास्पद आहे. श्रीमत अण्णासाहेब देशमूख हे स्वभावानें प्रेमळ, रसिक, गुणग्राही व विद्वज्जनाचे पोशिंदे असल्याबद्दल त्यांचा लौकिक गाजत आहे. त्याच्या वडिलानीं आधुनिक कवींत नांवाजलेल्या विनायकास आश्रय देऊन पुष्कळ दिवसपर्यंत आपल्या घरीं ठेवून घेतलें होतें असें ऐकिवांत आहे. श्रीमंत हे आपल्या वडिलांप्रमाणेंच गुणीजनाचे चहाते आहेत. त्यांचा हा गुण उत्कर्ष पावून त्याचा यश-केतु भोजराजाप्रमाणे अखंड फडकत राहो अशी त्या सर्व चालकापाशीं प्रार्थना करून हा लांबलेला प्रास्ताविक लेख आटोपता घेतों,

पुणें, माघ व० ६ शके १८४०

दत्तात्रय अनंत आपटे





साबदे २ फेब्रुवारी
१९१९

ग्रंथकार-
दु आ तिवारी

# " आराधना "

## शिखरिणी

(१)

मुकुंदा ! गोविंदा ! तुजसि जगतीं संत नमिती ।
चिदानंदा ! बंधांतुनि सुटति ते सर्व सुमती ॥
दयाळा ! स्नेहाळा ! तुजसि भजकांचा कळवळा ।
कृपाळा ! गोपाळा ! म्हणुनि नमितों पादयुगुळा ॥

(२)

मनीं जेव्हां तेव्हां स्मरण करितों प्रेमळ हरी ! ।
तरी सोडीं दासावरि तव हरी प्रेम लहरी ॥
महत्पापें तापें प्रभु तुजकडे मन्मन जडे ।
जिवाला या लागे तळमळ कधीं दर्शन घडे ॥

(३)

तुझ्या भेटीसाठीं हृदय जगजेठी ! तळमळे ।
हृषीकेशी ! येशी कधिं घडविशी भेट न कळे ॥
घन:शामा ! रामा ! मदिय रति नामावरि बरी ।
महारामा ! कामा पुरविशिल कां माधव ! खरी ॥

(४)

अनंता ! श्रीमंता ! सकलगुणवंता ! तव पदीं ।
रमानाथा ! ताता ! शरण जन येतात त्रिपदीं ।
दयाळू मायाळू परमकनवाळू रघुवरा ! ॥
कृपाळू स्नेहाळू खचित ममताळू न दुसरा ॥

(५)

जगाच्या आधारा ! मुनिजनविहारा सुरवरा !।
कृपेच्या आगारा ! गद्गनत उदारा ! सुखकरा ! ॥
दयेच्या भांडारा ! मजवरि करावी अनुदया ।
न होई माघारा करुनि सुविचारास सदया ! ॥

(६)

यशोदेच्या बाळा ! तुजसि कनवाळा बहु असे ।
म्हणोनी वेल्हाळा ! जवळ लडिवाळा करितसे ॥
जगत्पाळा ! हा मी पतित नव बाळासम असे ;
उमाळा येऊं दे चरणकमळाला नमितसें ॥

(७)

दयामाया यांचा निधि असशि तू एक जगतीं ।
तुझी छाया होतां सकल असुखें दूर पळती ॥
जगन्नाथा ! त्राता तुजसम न पाता दिसतसे ।
अनाथांच्या नाथा ! म्हणुनि पदिं माथा धरितसें ॥

(८)

विरक्तीची युक्ती मज न कळली माधव ! जरी ।
यथाशक्ती भक्ती धरुनि अनुरक्ती तव करीं ॥
असाराचा सारा जरि जगिं पसारा दिसतसे ।
पिसें संसाराचें तरिहि मजला सोडित नसे ॥

(९)

घडो देवा ! सेवा, मम मन कधीं वा नच विटो ।
जडो तृष्णा कृष्णा ! मधुर मुरली वादन पटो ! ॥
भवन्माया राया ! परि तनुस वायां फिरविते ।
प्रमत्ता उन्मत्ता सम अदय मत्ता मिरविते ॥

(१०)

जशी खाशी माशी न कळत मधाशीं चिकटली ।
तशी सर्वांशीं ही मति विषयपाशीं अडकली ॥
नसे शांति धांती; मदिय मरणांतीं गति कशी ।
गुणाधीशा ! ईशा ! सकल जगदीशा वद मशीं ॥

(११)

महा आधि व्याधी टपुनि बसले व्याघ्र वपुला ।
विपत्ती आपत्ती हडळि विवशा येथ विपुला ॥
पहा शामा ! कामादिक रिपु मना त्रासिति वृथा ।
मुरारे ! कंसारे ! तुज कितिक सांगूं रडकथा ॥

(१२)

निवारीं संहारीं सकल दुरतें हीं निजकरीं ।
मुरारी ! उद्धारीं मजसि गिरिधारी लवकरी ॥
असारीं संसारीं दिसुनि बहु आली विफलता
विहारी या ! तारीं तनुसि वय आली विकलता ॥

(१३)

सदा हातें होवो रुचिर तव सेवामय कृति ।
शिवो पापाची बा ? कधिंहि जगदीशा न विकृति ॥
मला मोठी आशा तुजविषयिं चित्तांत वसते ।
" समर्थाच्या ठायीं विनति विफला होत नसते" ॥

# "परीक्षा केव्हांही वरुनि बघुनी होत नसते"

( शिखरिणी )

(१)

उभा एका पायीं नयन मिटुनी मौन धरुनी ।
जणों योगी वाटे बक खचित मीनांस दुरुनी ।
वरुनी हा गोरा परि हृदयिं कैसा न कळतें ।
परीक्षा केव्हांही वरुनि बघुनी होत नसते ॥

(२)

पिकाला वर्णानें म्हणति दिसतो काक वरवा ।
न ऐकीलें त्याच्या मधुरतर जो पंचम रवा ॥
तयाच्या सत्कंठीं किति सुखद माधुर्य वसते
परीक्षा केव्हांही वरुनि बघुनी होत नसते ॥

(३)

पहावीं वृक्षाग्रीं दुरुनि कडु वृंदावन-फळें ।
सुवर्ण-स्वादू हीं असतिल अशी तें मति भुळे ॥
परंतू चाखांनी सहज बघतां भ्रांति फिटते ।
परीक्षा केव्हांही वरुनि बघुनी होत नसते ॥

(४)

जयाच्या सर्वांगीं असति बहु कांटे फणस ते ।
रस-स्वादू ऐसे असतिल न अज्ञांस कळतें ।
रुची अंतर्भागीं अति मधुर त्याचीच असते ।
परीक्षा केव्हांही वरुनि बघुनी होत नसते ॥

(५)

वसंतीं जेव्हां तां सह उपवनीं किंशुक फुले ।
दिसे सर्वांपेक्षां तादिय नयनीं सुंदर फुलें ॥
सुगंधाची तेणें डागिच हृदया भूल पडते ।
परीक्षा केव्हांही वरुनि बघुनी होत नसते ॥

(६)

कथ्याचा दागीना अति कुशलतेनें घडाविला ।
मुलामा सोन्याचा जरि वरुनि त्याला चढविला ॥
" सुवर्णालंकार " प्रथम कथितां सत्य गमतें ।
परीक्षा केव्हांही वरुनि बघुनी होत नसते ॥

(७)

किती ढोंगी साधू ' गुरु ' म्हणुनि भोंदू मिरविती ।
जगीं भोळ्या लोकां फसवुनि धनातें हिरविती ॥
जटा माळा वस्त्रें कफनि जनता यांस भुलते ।
परीक्षा केव्हांही वरुनि बघुनी होत नसते ॥

(८)

बुधांनां बोधावें मदिय कविता -हेतु न खरा ।
कसें खद्योतानें गगनिं दिपवावें दिनकरा ॥
नका देऊं केव्हां स्वमत बघुनी रूप नुसतें ।
परीक्षा केव्हांही वरुनि बघुनी होत नसते ॥


# " पंकज मालाबंध "

स्रग्धरा

गंगावेगावगाही ! धनकनक नसे, आपदापंकपंक्त ।
दीनाधीनावना ! मी इतिकृतिमतिला वाहतों हंत हंत ॥
गातों ध्यातों स्वतोषें रतिपतिगतिदा! नंदिपा दिव्यदीक्षी।
बाधी आधी सुधीला तिळतिळ जळतों रीति नीति प्रतीक्षी ।

समजण्याची रीत—प्रत्येक कमलांत ५ वर्तुळें आहेत. मध्य वर्तुळांतील अक्षर कायम ठेवून प्रत्येक वर्तुळांतून मधें यावें व शेवटीं बाहेर पडावें.

उदाहरणार्थ:—




नं. १ च्या वर्तुळांतून मधें (गंगा) नं. २ मधून मधें (वेगा) नं. ३ वरून मध व एकदम बाहेर (वगाही) 'गंगावेगावगाही'

साध्य.—प्रत्येक कमलांतील पहिल्या वर्तुळांतील एकेक अक्षर क्रमानें घेतलें असतां; गंगाधर, आनंदीबाई, तिवारी अशीं नांवें तयार होतात. यांत गंगाधर हें देशमुख साहेबांचें नांव, आनंदीबाई हें त्यांच्या पत्नीचें नांव व तिवारी हें कर्त्याचें उपनांव होय



बधकार–दु आ तिवारी
ता. १५।१२।१८

अर्थः—गंगावेगावगाही ! (गंगा×आवेग×अवगाही) गंगेच्या आवेगांत निमज्जन करणाऱ्या गंगाधरा ! (मज जवळ) धन (आणि) कनक नाहीं. मी आपदापंकपंक्त (आपत्तीच्या चिखलांत लडबडलेलों) आहें. हे दीनाधीनावना म्ह० दीन आणि आधीन (ताब्यांतील दासभक्त) अशांचें अवन म्ह० रक्षण करणाऱ्या (शंकरा) याच कारणानें मी इतिकृतिमतिला (कविताकृति न करण्याच्या बुद्धीला) धारण करितों. हंत 'हंत' ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. हे रतिपतिगतिदा ! म्ह० रतिपति जो मदन त्यांतें गति म्हणजे मुक्ति देणाऱ्या हे नंदिपा ! म्ह. हे नंदीचें पालन करणाऱ्या आणि हे दिव्यदीक्षी ! म्ह० गजचर्मादिक दिव्य दीक्षा धारण करणाऱ्या शंकरा मी स्वतोषें तुला गातों ध्यातों तरीही आधी म्ह० मनोव्यथा ( दारिद्र्याची ) सुधीला म्हणजे बुद्धीला बाधी (बाधिते) म्हणून तिळ तिळ जळतों. तरी तूं आपली रीति आणि नीति ( एकवेळ ) पतीक्षीं म्हणजे शोधून पहा कीं तुझा स्तव करणारा मी अकिंचन कसा

---

यातील गंगावेगावगाही ' वगैरे संबोधनें देशमुख साहेब व त्यांच्या पत्नी यांसही लागतात

# " कोकिला "

(१)

( पृथ्वीवृत्त )

तुझें जनन कोकिले ! परगृहांत झालें असे ।
कृतघ्न असती तुझ्या जवळ दोष मोठा वसे ॥
परी मधुरता तुझी जनमनास मोहीतसे ।
" खरा सुगुण एक तो अवगुणांस झांकीतसे " ॥

(२)

तुझ्या दुरुनि ऐकतां मधुर पंचमाचा ध्वनी ।
खरी तशिच सुंदरा असासि वाटलें गे ' मनीं ॥
परी जवळि येउनी निराखितां विरूपा दिसे ।
"दिसे दुरुनि हें जसें जग तसें मुळीं तें नसे " ॥

(३)

नसे नयनसुंदरा वपु मनोहरा लक्षणा ।
जनां दुरुनि वाटशी खचित काकसलक्षणा ॥
म्हणून अनभिज्ञ तो तव निरीक्षणीं गोंधळे ।
" कुठें गुण कसा वसे तनुवरूनि हें ना कळे " ॥

(४)

वसंत ऋतु येउनी फुलतसे वनश्री यदा ।
सुगंधमय वायुही डुलवि आम्रराजी यदा ॥
तदा तव कुठें मिळे मधुर गान ऐकावया ।
" गुणी बहुत मान घे निज गुणास दावावया " ॥

(५)

तुझी रुचिर कोकिले ! हृदय मोहिते वाक्सुधा ।
करी विकल कामुकां मधुतरा परी ती सदा ॥
चमत्कृति न यांत गे ! लवहि वाटते मन्मना ।
" विचार नसतो मनीं प्रणयमूढ कामी जनां " ॥

(६)

समुत्सुक असे जरी जगत गान ऐकावया ।
वसंत ऋतु वांचुनी परि न लागशी गावया ॥
दिली जरि न मान्यता उचित आपणाला कुणीं ।
" गुणज्ञ पुरुषा विना गुण न दाविती सद्गुणी "॥

## " बहिलापिका "

पुष्पीं काय वसे, पयोनिधि कसा, तो कोण लक्ष्मीसखा ।
स्नेही कोण रथीं, कशी बुधकृती, दे कोण कस्तूरिका ॥
रोगोत्पत्तिस काय कारण, कसे ते वृद्धकालीं कच ।
मत्प्रश्नोत्तरमध्यमाक्षरपदीं राया ! त्वदाशीर्वच ।

| प्रश्न | | | उत्तरें | | |
|---|---|---|---|---|---|
| पुष्पीं काय वसे ? | .... | .... | सु | गं | ध |
| पयोनिधि कसा ? | .... | .... | अ | गा | ध |
| तो लक्ष्मीसखा कोण ? | .... | .... | मा | ध | व |
| रथीं स्नेही कोण ? | .... | .... | सा | र | थी |
| बुधकृती कशी ? | .... | .... | रु | चि | र |
| कस्तूरिका कोण दे ? | .... | .... | कु | रं | ग |
| रोगोत्पत्तिस कारण काय ? | | .... | अ | जी | र्ण |
| वृद्धकालीं ते कच कसे ? | | .... | ध | व | ल |

" गंगाधर ! चिरंजीव "

# " शुष्क–आम्र "

मन्दाक्रान्ता

१

गेली सारी वपु तव अहा ! आम्रवृक्षा ! सुकोनी ।
या लोकांच्या रुचिर विभवा हाय ! जाशी मुकोनी ॥
तूं होताशी अमृत तरु ना ! कां तुला मृत्यु आला ।
"कांहीं केल्या चुकत नसतो मृत्यु केव्हां कुणाला ॥"

२

आम्रा ! छाया हरित तव ती सर्वही नष्ट झाली ।
पांथस्थातें सुखद बहु जी भासली उष्णकालीं ॥
मृत्युच्छाया वरि पसरतां होय ती शून्यमान ।
"मोठी छाया वरि विलसतां लुप्त होते लहान ॥"

३

पानें सारीं गळुनि पडलीं वाळुनी शुष्क झालीं ।
सौंदर्याचें स्वरुप फिरलें प्रेतकाया जहाली ॥
या स्वदुःखें रुदन करिती वृक्ष भृंग–स्वनांत ।
" सन्मित्राचा विरह सकलां ताप देई मनांत ॥"

४

येतां जातां पथिक जन जे आतपक्रांत झाले ।
झाले मार्गश्रम म्हणुनियां धर्मबिंदू निघाले ॥

छायाशांती मिळवुनि तुझी, शांतवीती स्वदेहा ।
"पुण्यात्म्यांच्या जवळ वसतो शांतिचा नित्य ठेवा ।।"

५

जे त्वच्छायातळिं बसुनियां शांतवीती जिवाला ।
सत्प्रेमानें मधुतर फळें अर्पिलीं तूं जयांला ॥
ते तोडाया उलट तुजला घालिती हाय ! घाव ।
"स्वार्थी लोकांतरिं वसतसे ना कृतज्ञ स्वभाव ।।"

६

ज्यानें लोकीं उपकृति सुखें आचरावी तयाला ।
कां लोकांचीं अपकृतिफळें येत भोगावयाला ॥
पुण्याचें तें प्रतिफळ कसें पापरूपें मिळावें ।
"जेथें कांहीं कळत नसतें 'दैव'त्याला म्हणावें" ॥

७

येई जेव्हां प्रथम तुजसी चैत्रमासीं बहार ।
येई शोभा तंव तुजमुळें काननश्रीस फार ॥
सौभाग्याचा तिलक सुभगा ! तूंच होतास तीचा ।
"वैधव्याचा समय नयनीं पाहवे ना सतीचा" ॥

८

त्वत्पुष्पाच्या परिमलभरें पूर्ण मोहून गेले ।
प्राशोनीयां त्वदिय मधु जे तृप्त आकंठ झाले ॥
कोठें गेले उदर भरण्या भृंग तूतें त्यजोनी ।
"सौख्याचे बा! सकल असती दुःखकालीं न कोणी" ॥

९

जो स्वच्छाखेवरतिं बसुनी पंचमज्ञानवेत्ता ।
आलापांनीं भरुनि अवघें रान टाकीत होता ॥
कोठें गेला वचनपटु तो मित्र कोकीळ पक्षी ।
" होतां दैव प्रतिकुल अहा! सर्व होती विपक्षी " ॥

१०

नानापक्षी फलरुचि तुझी घेउनी तृप्त झाले ।
आनंदानें सुमरससुधा भाशुनी भृंग धाले ॥
ऐसा जो तूं त्वदिय निटिलीं दुःख हें काय भावी ।
" येवो कोणा विपरित गती दानशूरा न यावी " ॥

११

त्वत्पर्णाचीं जन शुभदिनीं तोरणें बांधुनीयां ।
प्रेमें देवद्विज सुमफलें पूजिती तोषुनीयां ॥
ऐसा पुण्यप्रद परि तुला पातला दैवघाला ।
" दुष्कर्माच्या गहन गतिचा शोध कोणीं न केला " ॥

१२

व्योमीं मेघध्वनि उसळले घेतसे वायु झोके ।
विद्युत्तेजें मधुनि मधुनी नेत्रयुग्मास झांके ॥
ऐशा काळीं खगतति किती धावुनी येत होती ।
"भीतिग्रस्तां बुध निजगृहीं आश्रयस्थान देती"॥

१३

वायूनें हें उपवन यदा होय कंपायमान ।
तूं डौलानें डुलत दिसशी दिग्गजाच्या समान ॥

डोले तैसा वदतरु जरी काय होईल वंद्य ।
"थोरांची बा ! अनुकृति असे योग्यतेवीण निंद्य"॥

१४

झाला होता तुजसि रुचिरा ! कोणता तो अपाय ।
कोणालाही मुळिंच सुचला काय नाहीं उपाय ॥
होत्या थोड्या उपवनिं तरी औषधी येथ काय ।
"आयुष्याच्या पुढति न चले औषधींचा उपाय"॥

१५

तूं सर्वांना रमणिय वनीं तोषवीलें दयाळा ।
त्वद्दुःखाच्या कठिणसमयीं कोण कामास आला ॥
कोणी कैसा जरिहि असला थोर मोठ्या मनाचा ।
"येतां आपत्समय जगतीं कोणि नाहीं कुणाचा"॥

१६

होते माझी बघुनि तुजला आज व्याकूळ दृष्टी ।
कष्टी होतें मन, घडतसे उष्ण नेत्राश्रुवृष्टी ॥
गोष्टी दुःखें सकल वदतां येत नाहींत ओष्ठीं ।
"सृष्टीमध्यें विपरित कृती आचरीतो विसृष्टी"

# "काकान्योक्ति."

( शिखरिणी )

(१)

बसावें आम्राच्या तरुवरि असें इच्छिसि जरी ।
नको काढूं काका ! वच निज मुखीं कर्कश तरी ॥
तुला साधे भोळे म्हणतिल—'पहा कोकिळ दिसे' ।
" न मूर्खाला मौनाविण उचित लोकीं पथ असे" ॥

(२)

तुझ्या मोठ्या शब्दें पिक मधुर गाईल न जरी ।
मुकेल स्वानंदा रसिक जनता गान-लहरी ॥
गड्या ! माझें ऐकें वचन नच काढीं अवगुणी ।
" न व्हावें कोणाचा विरस करण्या कारण कुणी "॥

(३)

असें बोलावें कीं सुजन जनही मान्य करिती ।
जया ऐकोनीयां रसिक जनही शांति वरिती ॥
रहावेना तूतें अहमहमिके चीण अगदीं ।
" खलांचा जो आहे अवगुण न तो जाइल कधीं "

(४)

जयाची प्राशोनी मधुरतर ती पंचम सुधा ।
रसानंदें ज्यातें रसिक वदती 'धन्य' बहुधा ॥
पिकाशीं त्या कैशी त्वदिय समता होईल बरें ।
" खलांना हेव्यानें खचित सदसद्बुद्धि न उरे " ॥

(५)

न काढावी काका ! श्रवणकटु वाणी बहु बरें ।
पिकाचा तूं हेवा करिशिल जरी बा ! मत्सरें ॥
तरी तें होईल त्वदिय वचनांनीं तव हंसें ।
" दुजी लोकीं हानी खचित उपहासा सम नसे "

(६)

तुझ्या ठायीं आहे बहु चपलता ठाउक मला ।
तुला देवानें तो रुचिर गुण नैसर्गिक दिला ॥
तयानें ही लोकीं परि तुजसि येई न महती ।
" मनाच्या खोट्यांना सुगुण तरि ते काय करिती? "

(७)

स्वजातीचे मेळे जमवुनि करी पंडितपणा ।
करी दुःशब्दांचा प्रसर, म्हणवी थोर अपणा ॥
रहावें ना येथें, पिक शुक मयूरादि वसती ।
" अयोग्यातें योग्या जवळ बघुनी लोक हसती "

(८)

न खावीं आम्राचीं मधुतर फळें या तरुवरी ।
स्मशानीं मृत्पिंडें मिळतिल तिथें जा झडकरी ॥
तुझ्या ठायीं काहीं अभिरुचि रसाची न दिसते ।
" जयाचा जो भोक्ता तदभिरुचि त्यालाच असते ॥ "

# "सगळे दिवस सारखे नसतात."

( मालिनी )

१

कधिं दिवस सुखाचा पुत्र जन्मोत्सवाचा ।
कधिं दिन उगवे तो मृत्यु कोलाहलाचा ॥
अवचित सुखदुःखें नित्य येतात पाहीं ।
दिवस जगतिं सारे सारखे येत नाहीं ॥

२

मिरवणुक कधीं ती चालली लग्नकालीं ।
दिवस कधिं असा कीं प्रेतयात्रा निघाली ॥
उगिच मनुज चित्तीं हर्षशोकांस वाही ।
दिवस जगतिं सारे सारखे येत नाहीं ॥

३

जगतिं उणिव होती काय हो ! पांडवांसी ।
गत विभव जहाले सर्व अज्ञात वासी ॥
जिवलग जरि झाला देव श्रीकृष्ण तोही ।
दिवस जगतीं सारे सारखे येत नाहीं ॥

४

भगिनिसम जियेला देव तो कृष्ण मानी ।
धरुनि तिज सभेला आणिलें कौरवांनीं ॥
अहह ! समय कैसा द्रौपदी नग्न होई ।
दिवस जगतिं सारे सारखे येत नाहीं ॥

५

त्रिभुवनपति ऐसा थोर जो रामराया ।
हर ! हर ! वनिं गेला दैवयोगें फिराया ॥
लिखित चुकत नाहीं देवदेवादिकांही ।
दिवस जगतिं सारे सारखे येत नाहीं ॥

६

रघुकुलतिलकाची जानकी पट्टराणी ।
कठिण समय आला बैसली घोररानीं ॥
विरहदिवस काढी दुःखकष्टांस साही ।
दिवस जगतिं सारे सारखे येत नाहीं ॥

७

भुवनिं विदित आहे जो हरिश्चंद्र राजा ।
सकल विभ जातां राहिला डोंबकाजा ॥
नृपतिपण कुठें तें तें कुठें दास्य पाही ।
दिवस जगतिं सारे सारखे येत नाहीं ॥

८

वरिलि नल नृपानें भीमकी राजबाळी ।
परतुनि गृहिं येतां भोग आला कपाळीं ॥
त्यजुनि तिजसि जाई अर्धवस्त्रेंच राही ।
दिवस जगतिं सारे सारखे येत नाहीं ॥

९

बघुनि दिन सुखाचे गर्व वाहूं नका हो ! ।
स्वजन परजनांना तुच्छ मानूं नका हो ॥
अनुभव असला हा थोरथोरांस येई ।
दिवस जगतिं सारे सारखे येत नाहीं ॥

# अष्टदल कमलबंध.

चामर वृत्त

राजमान्य गंभिर स्वभाव गा ! मनोहरा ! ।
राहतो स्वधर्म नीति–दक्ष–रक्षणीं खरा ॥
राखतां अरक्षितां असो लघू कृपागरा ! ।
राग ना मना शिवे दयापथ–प्रिया ! जरा ॥

समजण्याची रीतः—


मध्यांतून समोरील खालच्या पाकळीच्या डाव्या बाजूवरून उजव्या बाजूकडे याप्रमाण दोन पाकळ्या वाचून मध्यें शिरावें म्हणजे १ लें चरण तयार झालें. पुन्हां मध्यांतून त्याचप्रमाणें पुढच्या ( ३।४ ) पाकळ्यांस प्रदक्षिणा घालून २ रें चरण पुरें करावें. याप्रमाणें ४ ओळी वाचाव्या

साध्यः—

१ कमलमध्य
२ प्रत्येक दलाग्रावरील

अक्षरें क्रमानें वाचावीं म्हणजे 'गंगाधर रघुनाथ' हें आश्रयदात्याचें नांव निघेल

# अष्टदल कमलबंध.



## चामरवृत्त.

राजमान्य गंभिर स्वभाव गा ! मनोहरा ! !
राहतो स्वधर्म नीति--दक्ष रक्षणीं खरा ।
राखतां अरक्षितां असो लघू कृपागरा !
राग ना मना शिवे दया-पथ-प्रिया ! जरा ॥.

---

मिति वैशाख शुद्ध १२ शाके १८३८ कवि दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी

# भग्न-मंदीर.

( मंदाक्रांता )

(१)

आलों येथें परिसुनि तुझी मंदिरा ! थोर कीर्ति ।
वृत्ती माझी स्तिमित बनली पाहुनी भग्न मूर्ती ॥
सौंदर्याचें मजशि सखया ! रूप तें आढळेना ।
ऐश्वर्याचे दिन तव कुठें हाय ! गेले कळे ना ॥

(२)

पूर्वीं तुझें सकल जगतीं गाजलें नांव मोठें ।
वाटे वस्तुस्थिति बघुनि तें मंदिरा ! आज खोटें ॥
गेल्या मूर्ती दगडहि चिरे शेष कांहींच नाहीं ।
आहे तेंही निबिड विपिनीं लुप्त होऊनि जाई ॥

(३)

शोभा देती दुरुनिच तुझ्या भोंवताली शिलांच्या ।
होत्या येथें रुचिरतर ज्या मूर्ति देवादिकांच्या ॥
झालीं त्यांचीं पडुनि फुटुनी छिन्न भिन्न स्वरूपें ।
नेत्रीं त्यांचीं अहह ! अगदीं पाहवे ना विरूपें ॥

(४)

जागोजागीं उखळुनि चुना जीर्ण काष्ठाविहीन ।
एकाएकीं बळनि पडती भाग आधारहीन ॥

नाहीं कोणी धनिक तव ही दुःस्थिती उद्धराया ।
त्वत्स्थानाची शिव ! शिव ! अशी दीनता देवराया ॥

(५)

धर्मश्रद्धा प्रबलतर जैं आर्यलोकांत वागे ।
वृद्धी पावे तनुरुचिरता मंदिरा ! सौख्यभोगें ॥
आली धर्मामति विकलता काळ गेला निघून ।
दुःखाश्रूंनीं नयन गळती दुःस्थितीतें बघून ॥

(६)

कोठें कोठें दिसति नयनीं जीर्ण भिंती शिळांच्या ।
सोई केल्या असतिल किती येथ यात्रेकरूंच्या ॥
स्थानीं स्थानीं दडुन वसती श्वापदें क्रूर आतां ।
भीती वाटे बहुतचि मना एकटें तेथ जातां ॥

७

ऐश्वर्यानें मिरवित जगीं पूर्ण होतास जेव्हां ।
तूं सर्वांच्या नयनविषया जाहला पात्र तेव्हां ॥
गेलें सारें विभव निघुनी खेद होई मनाला ।
"ऐश्वर्याच्या पुढति न विपत्काळ यावा कुणाला ॥"

८

सोन्याचा जो कळस झळके उंचभागीं विशाल- ।
कोठें गेला, दगडहि विटा लोक नेती खुशाल ॥
ज्याला लोकीं नच जरि धनी, दुर्दशा होय त्याची ।
तो सोन्याचा जरिहि असला, मृत्तिका होय त्याची ॥

(९)

तो सोन्याचा कळस दुरुनी कोस कोसांवरूनी।
पांथस्थांचे श्रम हरुनियां, चित्त घेई हिरूनी ॥
होती शक्ती भुवनविदिता चित्त आकर्षणाची।
ती जाऊनी स्थिति तुजसि ये भूमिसंघर्षणाची ॥

(१०)

बालार्काचे किरण पडुनी होइ दैदीप्यमान।
भासे चित्तीं कनकशिखर स्वर्गपुष्पासमान ॥
पाहोनीयां शिखरसुषमा बिंबरूपें प्रवाहीं।
तीच्या संगें तरुण युवती खेळती कांहिं कांहीं ॥

(११)

जेथें वेदध्वनि उसळती नित्य विद्वज्जनांचे।,
आतां येती ध्वनि बहु तिथें श्वान कोलाहलांचे।;
व्हावा घोष प्रतिदिनिं जिथें ईश्वराच्या स्तवाचा ॥
तेथें कैसा उलुकखग हा शब्द काढी भयाचा ॥

(१२)

जेथें विप्रादिक जन बहू जेउनी तुष्ट होती।
आतां तेथें मृत कलिवरीं पावती गृध्र तृप्ती ॥
वाचाशक्ती जरिहि असती मंदिरा! आज तूतें।
दुःखानें तूं खचित भरुनी टाकितां या स्थलातें।

(१३)

नाना स्थानाहुनि जन जिथें दर्शना येत होते।
जाती आतां जवळुनि परी, पाहती ना मुखीं तें; ॥

आत्मा देहीं जंववरि वसे तोंचि त्याचें महत्व ।
तो जातां त्या कुणि न भजती मात्र हें सत्य तत्व ॥

(१४)

यावे मेळे दुरुनि दुरुनी साधुवृंदेश्वरांचे ।
झाले क्षेत्रीं फिरुनि फिरुनी शुद्ध आत्मे जयांचे॥
ऐसा होता सुखकर तुझा मंदिरा! भाग्ययोग ।
तो जाऊनी खंडतर महा ओढवे दैवभोग ॥

१५

सारे विद्वज्जन जमुनियां धर्मशास्त्रार्थ चाले ।
धर्मप्रश्नावरिल जिथले न्याय सन्मान्य झाले ॥
विद्यार्थ्यांनीं करुनि जिथुनी पूर्ण अभ्यास जावे ।
कोणी वैय्याकरणि अथवा न्यायशास्त्रीबनावे ॥

(१६)

होतीं येथें बहु उपवनें मोठ मोठ्याहि बागा ।
देवेंन्द्राचें उपवन जना, वाटली हीच जागा ॥
हा! हा! तेथें पसरत असे कंटकारण्य आतां ।
सृष्टीमध्यें उलट असले खेळ खेळे विधाता ॥

(१७)

घेऊनीयां परिमळ सवें वाहती पुष्पवारे ।
कारंजांचे मधुनि उडती जागजागीं फवारे ॥
पाहूनीयां मन विरमतें पूर्ण ऐशा स्थळाशीं ।
येती जाती बहुत फिरती लोक नाना विलासीं ॥

(१८)

देवागारा! रुचिरतर ह्या आसमंतात् प्रदेशीं ।
होते साधू करित वसती पापपुण्योपदेशी ॥
त्यांचें ज्ञानामृत पिउनियां लोक संतुष्ट झाले ।
संसाराब्धी तरुनि, अवघे पैलतीरास गेले ॥

(१९)

प्रत्यूषीं जो उसळत असे वाद्य गंभीर घोष ।
ऐशा रीतीं भजक जनतां जागवी कोस कोस ॥
आतां मात्र श्रवणकटु तो शब्द ये कीटकांचा ।
पांथस्थातें सभय करितो रात्र होतांच साचा ॥

(२०)

रत्नच्छायेसम विलसती रम्य ज्यांचे पिसारे ।
पूजावाद्य-ध्वनि परिसुनी नाचती मोर सारे ॥
घेई ताना मधुनि पिकही पंचमाच्या सुराच्या ।
लीला गाई फिरुनि फिरुनी सुस्वरें ईश्वराच्या ॥

२१

प्रातःकाळीं सकल जनता कर्ममार्गास लागे ।
कांपे भारी तनु हिमभरें दंत दंतास लागे ॥
ऐशा काळीं बहु गजबजे मार्ग हा मंदिराचा ।
भक्तिप्रेमा तनुहुनि असे श्रेष्ठ हिंदू जनांचा ॥

२२

तीरीं जीच्या नगरजन हे येउनी पर्वकाळीं ।
ईशस्तोत्रें म्हणत करिती स्नान मोठ्या सकाळीं ॥

त्वत्सान्निध्यें जगति ठरलें मंदिरा ! पुण्यपात्र– ।
तीं ही वाहे अश्रुनि तटिनी तूंच नाहींस मात्र ॥

२३

नाना स्थानाहुनि जन बहू स्नानपूजार्थ आले ।
गंगे ! गंगे ! हर ! हर ! असा एकची घोष चाले ॥
ओलेत्यानें मग तुजकडे भक्तिनें धांव घेती ।
एका हातीं कलश धरुनी, पूजिती बिल्वपत्रीं ॥

२४

घेऊनीयां जरठ विधवा पांघरायास शाली ।
मार्गी नामस्मरण करुनी चालती शीत कालीं ॥
मागूनीया तरुण तरुणी स्नानपूजार्थ येती ।
संकल्पांची द्विजजनिं किती ती त्वरा होत होती ॥

२५

कोणी घाटावरति बसती स्नानसंध्या कराया ।
एकांतींही कितिक वळती ध्यानमुद्रा धराया ॥
कोणी कोणी तनुशिं अपुल्या भस्म तें चर्चुनीयां ।
गौमुखीतें धरुनि बसती कौपिनी घालुनीयां ॥

२६

लाटा घाटावरि निशिदिनीं पाथऱ्यांच्या शिलांला ।
कांठाकांठावरि उखळुनी पार गेल्या तळाला ॥
खिंडी खिंडी पडुनि सलिलें खोल झाल्या कपारी ।
त्यांच्यामध्यें मगर-सुसरी राहती नक्र भारी ॥

२७

होते पूर्वीं यवन नृपती काळ देवालयांचे, ।
त्यांनीं केले बहुत जगतीं हाल विप्रादिकांचे; ॥
देई भग्न स्थिति तव खरी साक्ष त्यांच्या कृतींची ।
" धर्मद्वेष्टे " जगतिं असली कीर्ति त्या दुर्मतींची ॥

२८

गेल्या गोष्टी फिरुनि वदणें काय बा! त्यांत अर्थ ।
घासूनी तो फिरुनि फिरुनी कोळसा व्यर्थ मात्र; ॥
पाहूनीयां परि तुजकडे चित्त होई दुभंग ।
केला द्वेषें अजवरी अम्ही तो कुणाचा न भंग ॥

२९

पुण्यात्म्यांचें निधन घडतां अस्थि गंगेंत जाती ।
कीर्ती त्यांची फिरुनि फिरुनी सर्वही लोक गाती ॥
तूं धर्मात्मा स्मृति तव परी होत नाहीं कुणाला ॥
हा काळाचा अतुल महिमा दोष द्यावा कुणाला ॥

३०

पूर्वीं होते कवि बहु तुझ्या वैभवाच्या भरांत ।
त्यांनीं केलीं असतिल तुझीं वर्णनें सुस्वरांत ॥
मातें दुःखस्थितिच कथणें आज वांट्यास आलें ।
आले माझे नयन भरुनी बाष्पबिंदू गळाले ॥

## " नरा ! वाहशी व्यर्थ कां गर्वराशी ? "

भुजंगप्रयात.

अनंत स्वयें सृष्टि निर्मी अनंत ।
कुणाला तिचा लागला पूर्ण अंत ॥
तिच्यांतील तूं एक सूक्ष्मांशवासी ।
नरा ! वाहशी व्यर्थ कां गर्वराशी ॥

२

जगीं एक एकाहुनी थोर थोर ।
जयांच्या पुढें शोभशी शुद्ध पोर ॥
करूनी तुला आपुली धाकुट्याशीं ।
नरा ! वाहशी व्यर्थ कां गर्वराशी ॥

३

तुला वाटतें मीच कीं कीर्तिमान ।
तुझ्याहूनि आहेत बा! बुद्धिमान ॥
तुझा काय तो पाड आहे तयांशीं ।
नरा ! वाहशी व्यर्थ कां गर्वराशी ॥

४

कुठें भास्कराचार्य वा कालिदास ।
जयांचा खरा शोभसी तूं न दास ।
पहा शोधुनी आपुल्या योग्यतेसी ।
नरा ! वाहशी व्यर्थ कां गर्वराशी ॥

५

खरा तूं गणीती किती सांग तारे ।
खरा ज्योतिषी दाखवी ईश्वरा रे ! ॥
सुचेना जरी उत्तरें हीं मनाशीं ।
नरा ! वाहशी व्यर्थ कां गर्वराशी ॥

६

खरा मीच मोठा मनीं हाच ताठा ।
असंतुष्टतेचा जनीं घेइ वांटा ॥
अशानें कुठें श्रेष्ठता ये कुणाशीं ।
नरा ! वाहशी व्यर्थ कां गर्वराशी ॥

७

असे अल्पविद्या महागर्व भार ।
जसा अल्पतोयीं खळाळाट फार ॥
करीना परी शब्दही वारिराशी ।
नरा ! वाहशी व्यर्थ कां गर्वराशी ॥

८

ग्रहांचा प्रभु सूर्य आकाशवासी ।
स्वतेजें सदा पोषितो या जगाशीं ॥
सुटेना परी राहु-पीडा तयासी ।
नरा ! वाहशी व्यर्थ का गर्वराशी ॥

९

सुधांशु प्रकाशे नभीं पौर्णिमेचा ।
सुधा-स्रोत सोडी जणों चंद्रिकेचा ॥

क्षयानें पुढें तोहि जाई लयासी ।
नरा ! वाहशी व्यर्थ कां गर्वराशी ॥

१०

जगीं राम-कृष्णा परी भूप झाले ।
जयांचें अजूनी यशोगान चाले ॥
तया-सारखें काय बा ! तूजपाशीं ।
नरा ! वाहशी व्यर्थ कां गर्वराशी ॥

११

मदें रावणानें जरी राज्य केलें ।
कुठें आज तें सर्व ऐश्वर्य गेलें ॥
बळीसारखे तेहि गेले तळाशीं ।
नरा ! वाहशी व्यर्थ कां गर्वराशी ॥

१२

नको संपदेनें कुणा तुच्छ मानूं ।
नको चंचला संपदा नित्य वानूं ॥
तिला शेवटीं बांधशी कां उराशीं ।
नरा ! वाहशी व्यर्थ कां गर्वराशी ॥

१३

गड्या ! सावली दो घडीची सुखाची ।
निघूनी यदा सर्व जाईल साची ॥
कशाचा अहंकार तैं दाखवीशी ।
नरा ! वाहशी व्यर्थ कां गर्वराशी ॥

१४

तुझें तें तुला काय होई जनाशीं ।
बरें आज आहे उद्यां वेळ कैशी ॥
तरी सूत्रधारी स्मरीं ईश्वराशी ।
नरा ! वाहशी व्यर्थ कां गर्वराशी ॥

१५

असे आयु हें बुद्बुदाच्या समान ।
क्षणीं होय कालानिळें शून्यमान ॥
असोनी खरी ही स्थिती सर्व ऐशी ।
नरा ! वाहशी व्यर्थ कां गर्वराशी ॥

१६

तुला जें दिसे सर्व तें नाशवंत ।
असे एक आत्मा खरा कीर्तिवंत ॥
करी दर्पणासारखा स्वच्छ त्यासी ।
नरा ! वाहशी व्यर्थ कां गर्वराशी ॥

१७

पडे एक हांसे; दुजा त्यास पाहे ।
परंतू तयाची गती तीच आहे ॥
कळेना कसा नेम हा मोहपाशीं ।
नरा ! वाहशी व्यर्थ का गर्वराशी ॥

१८

जसा पाहुणा दों दिसांचा असावा ।
तयानें तिथें गर्व कैसा वहावा ॥

असुनी तसा येथला तूं प्रवासी ।
नरा ! वाहशी व्यर्थ कां गर्वराशी ॥

१९

करी नित्य कर्तव्य निष्काम भावें ।
स्वभावें तरी इष्टसिद्धीस पावे ॥
चढे तो पडे सत्य ये प्रत्ययासी ।
नरा ! वाहशी व्यर्थ कां गर्वराशी ॥

२०

कुणी आजपर्यंत वाहून गर्व ।
खरें सांग साधीयलें इष्ट सर्व ॥
म्हणूनी विचारी पुन्हा प्रश्न हाची ।
नरा ! वाहशी व्यर्थ कां गर्वराशी ॥

२१

किती सांगणें फार थोडेंचि बा ! हें ।
कवीचा वचस्रोत वाहात आहे ॥
तयांतूनि घे बोध-सन्मौक्तिकांशी ।
नरा ! वाहशी व्यर्थ कां गर्वराशी ॥

---

# " चातक "

( शार्दूलविक्रीडित )

१

केव्हां येईल तो सुखप्रद असा वर्षर्तु या भूतला ।
केव्हां येउनि मेघपंक्ति भुवनीं वर्षेल बिंदूजला ॥
केव्हां ते पडतील बिंदु वदनीं भागेल कैशी तृषा ।
चिंता नित्य जडून चातक खगा ! झाली तनू ही कृशा

२

लावूनी नयनद्वयास गगनीं तूं दीन मुद्रा करी ।
गेला कंठ फुटून ओरडुनिही झाली न इच्छा पुरी ॥
पूर्वीं आचरिलेंस घोर असल्या त्वा कोणत्या पातका
ज्याचे दुःसह भोग भोगिशि असे आतां गड्या! चातका

३

हें भोक्तृत्व कधीं सरेल असली आशा नको बा! करूं
तें आजन्मचि भोगणें तुज असे अश्रू नको हे भरूं॥
येई कंठ गहींवरून ममही त्वद्दुःस्थिती पाहुनी ।
" दुःखें शांतविण्या उपाय दुसरा नाहीं विवेकाहुनी "

४

पाण्यानें भरल्या तडाग सरिता नेत्रें तया पाहुनी ।
चित्तीं तूं झुरशी सदोदित नसे दुर्भाग्य तें याहुनी ॥
मातें राहुनि राहुनी कळवळा भारी तुझा येतसे ।
प्रेमाचे वच बोलण्यापलिकडे हातांत कांहीं नसे ॥

५

पाणी पाणि करून जीव झुरला वा! शुष्क झाला घसा
दुःखातें निवटील सत्य तुझिया प्राणी जगीं ना असा।
" दैवानें विषम स्थिती घडविली जी जन्मल्यापासुनी
कोणी कांहिं करो परंतु न चुके ती भोगल्यावांचुनी

६

जे जे गर्जति वारियुक्त नसती ते मेघ सारे खगा !
सारे जल्पति नीच, थोर न वदे राहे खरा तो उगा
" इच्छा होइल जेथ बा विफल ती तेथें करावी तरी।
आशाभंग न होय तेथ बहुधा आहे खरी वैखरी" ॥

# "अदलाबदल."

शार्दूलविक्रीडित

१

राजे आणि ऋषी स्वकेश उलटे बांधीत होते शिरीं ।
होत्या पाडित भांग सर्व ललना त्या माहिरीं सासरीं ॥
आली सत्य सुधारणा तरुण हे भांगास कीं पाडिती ।
वेण्या या तरुण स्त्रियाहि उलट्या घालावया लागती ॥

२

सांगावें बहु काय हे तरुण हो आचारिही जाहले ।
त्यांचीं आज चुलीपुढील अवघीं कामें करूं लागले ॥
व्याख्यात्या तरुणासमान तरुणी होऊन या राहिल्या ।
येतां सत्य सुधारणा किति अशा गोष्टी घडूं लागल्या ॥

३

जोडे जे पुरुषास योग्य असती ते घालिती कामिनी ।
त्यांच्या घालिति वाहणा युवकही शंका शिवेना मनीं ॥
कांता घालुनि पोलकीं मिरवती नाविन्य त्या दाविती ।
लोकीं कंचुकिच्या समान 'सदरे' कांहीं पहा घालिती ॥

४

कांता बैसति आसनीं प्रियपती मागें उभे राहती ।
फोटो मासिककार छापुनि असे सर्वांस ते दाविती ॥

मर्यादा पतिला दिली उचलली ती ऐट या स्त्रीजनीं ।
ऐशी दुष्ट सुधारणा चहुंकडे वो काळली स्वैरिणी ॥

५

बाई देशसुधारणे ! घडविली क्रांती समाजीं अशी ।
क्लीपुंसत्व नये तुला बदलितां कां सांग बाई मशीं ॥
झालें तेंच पुरें अतां उगिच तूं हा त्रास घेऊं नको ।
देशोद्धार तुझ्याविना न अडला चिंता तुला ती नको ॥

# " अंतर्लापिका. "

भागीरथी कोण शिरीं वहातो ? ।
लक्ष्मीसवें कोण सुखी रहातो ? ॥
सीतापती, रुक्मिणिकांत कोण ? ।
गंगाधर, श्रीधर, रामकृष्ण ॥

| प्रश्नः— | उत्तर |
|---|---|
| १ भागिरथी शिरीं कोण वहातो— | गंगाधर |
| २ लक्ष्मीसवें सुखी कोण रहातो— | श्रीधर |
| ३ सीतापति ( कोण ? ) | राम |
| ४ रुक्मिणिकांत कोण ? | कृष्ण |

. चार उत्तरें मिळून चौथी ओळ.—

' गंगाधर श्रीधर रामकृष्ण '

# " कीर्तिच्या-मंदिरांत. "

मंदाक्रांता

१

कोठें गेला कविवर असा श्रेष्ठ तो कालिदास ।
झाला नाहीं अजवरि कुणी योग्य ज्याच्या पदास ॥
गेला काव्यें रचुनि भुवनीं मृत्युलोकांतरांत ।
आहे लोकीं अजुनि बसला कीर्तिच्या मंदिरात ॥

२

कोठें आहे नृपतिमणि तो विक्रमादित्य साचा ।
ऐकूं येई अवनिवरती दुदुंभी यद्यशाचा ॥
झाली नष्टा तदिय वपु ती मृत्युच्या संगरांत ।
आहे येथें अजुनि बसला कीर्तिच्या मंदिरात ॥

३

गेले विश्व त्यजुनि नकळे भास्कराचार्य कोठें ।
ज्यांचें लोकीं सुजन गणिती बुद्धिसामर्थ्य मोठें ॥
मूर्ती गेली तदिय जरि ती मृत्युच्या कंदरांत ।
लोकीं येथें अजुनि बसले कीर्तिच्या मंदिरांत ॥

४

कोठें गेल्या निघुनि विभुती साधुवृंदादिकांच्या ।
कोठें पाहूं दिसत नसती मूर्ति संताधिपांच्या ॥
त्यांचा घोषध्वनि निघतसे जैं कथा कीर्तनांत ।
वाटे तेव्हां खचित बसले कीर्तिच्या मंदिरांत ॥

५

ज्यांचें ज्यांचें स्मरण घडतें आज आहेत कोठें ।
गेले लोकांतरिं निघुनिया सर्वही मोठमोठे ॥
वाटे ज्यांच्याविषयीं सकलां प्रेम तें अंतरांत ।
केली त्यांनीं वसति अपुली कीर्तिच्या मंदिरात ॥

६

गेलेल्याच्या करित बसणें शोक हा व्यर्थ आहे ।
कोण प्राणी अमर बनुनी मृत्यु लोकांत राहे ॥
ऐशी कांहीं स्मरणिय करूं सत्कृती या जगांत ।
राहूं येथें सुकृति विभवें कीर्तिच्या मंदिरात ॥

# " भिकारिण "

—:*:—

( शिखरिणी )

(१)

अहा ! पोटासाठीं भटकत फिरावें दिनभरी ।
विसावा या जीवा म्हणुनि न मिळे कीं क्षणभरी ॥
सदा दारोदारीं विनवुनि बहू दीन वचनें ॥
उभी राहे पाहे व्यथितहृदयें हीनवदनें ॥

(२)

जरी गांवामध्यें फिरुनी फिरुनी पाय थकले ।
उन्हानें तान्हेनें जरिहि सगळें तोंड सुकलें ॥
भुकेनें अंधारी जरिहि मम नेत्रास बसली ।
कुणाला मी सांगू स्थिति मम अहा ! हीन असली ॥

(३)

खरी सांगू जातां स्थिति गमतसे सत्य न कुणा ।
'भिकाऱ्यांची वाणी अनृत वचनांचाच नमुना' ॥
खरी आहे देवा ! जरिहि म्हटली गोष्ट असली ।
निराळी भाषा मी कथन करण्या आणुं कुठली ॥

(४)

पशू पक्षी यांच्याहुनिहि मजला नीच गणिती ।
अभाग्या दुर्भाग्या सहज कुटिला सर्व म्हणती ॥
सदा दुःशब्दातें श्रवुनि गमते खंत न मना ।
कुणी कांहीं बोलो करित असते त्यास नमना ॥

(५)

असंतोषें रोषें वचन मम ऐकून विटले ।
महाकष्टें उष्टें कुणि जरि दिलें अन्न विटलें ॥
नसे घ्याया तेंही जवळ धडकें एक सुडकें ।
म्हणूनी जातांना गळत पडतें अन्न सडकें ॥

(६)

जया आशिर्वादा वदुनि पुढतीं जात असतें ।
तयाचीं दुर्वाक्यें सहन करणें भाग पडतें ॥
अहा ! मी लोकांची विपरित कृती रोज बघतें ।
" फळा येतें जन्मांतररचित जें दुष्ट अघ तें" ॥

(७)

विशिष्टा शिष्टांच्या गृहिं वळतसे ऐन समयीं ।
वळें कानाडोळा करुनि बघती अन्यविषयीं ॥
" जनीं आशाभंग प्रबळतर तापा वितरतो ।
परंतु प्राणी तो सहन करुनीही न मरतो" ॥

(८)

निमित्तांची नाहीं उणिव जरि इच्छाच नसली ।
" घरीं नाहीं कोणी" "सवड नच द्यायास" असली॥
" फिरोनी ये बाई" म्हणुनि गृह तें बंद करणें ।
नकाराचा ऐसा सुगम पथ केव्हांहि वरणें ॥

(९)

कुणी "जा जा" ऐसें वदुनि पथ दावी निज करें।
कुणी पोराहातें नळवुनि मला काढि निकरें॥

परंतु ऐकाया विनवणि तयांना मम न ये ।
असे ठावी भिक्षेकरिण वहुही म्यां वदुं नये ॥

(१०)

कुणी मोठ्या तोरें वचन वदती निष्ठुर मला ।
कसें बोलावें मी पतित ठरलें दीन अबला ॥
" जनीं आशाभंग प्रबलतर तापा वितरतो ।
परंतु प्राणी तो सहन करुनीही न मरतो ॥

(११)

हितार्थी बोधाचें वचन सहजीं बोलति बरें ।
परंतु वागाया मजसि पडतें संकट खरें ॥
फुकाचें येतें कीं बहुत वदतां गोड सकलां ।
स्थिती ज्याची त्याला विपरित करी मात्र विकला ॥

(१२)

नसे संसाराचें उपकरण तें एकहि मला ।
कुजाती मी झालें मज सदनिं ठेवील न भला ॥
नसे माता भ्राता पति सुत सुता वा स्वदुहिता ।
नसे भिक्षेवीण स्वक्रिय उदरा मार्ग भलता ॥

(१३)

पराधीना वृत्ती करुनि मम ही येथ सगळी ।
विधात्यानें सूत्रें मम सकल लोकांस दिधलीं ॥
मला वंचायाची मग कशि तया येइल दया । ?
" करीं सत्ता येतां विकृति जडते सत्य हृदया " ॥

(१४)

दया माया यांचा निधि हृदयिं ज्याच्या वसतसे ।
कृपेची यच्चित्तीं सतत सरिता वाहत असे ॥
महात्मा ऐसाही कधिं कुणि सुदैवें गवसतो ।
मला आनंदाचा दिन सुखद तेव्हां उगवतो ॥

(१५)

मुलें माझ्या मागें सतत फिरुनी त्रासति वृथा ।
करीं यष्टी माझ्या म्हणुनि वसते कंटकयुता ॥
उनाडांचा मेळा अडवुनि बळें गाववि मला ।
कशाला हा जन्म प्रभु ! मज दिला व्यर्थ विफला !॥

(१६)

फिरोनी पायांचे जणु पडति कीं काय तुकडे ।
बसावें सोडोनी क्षुधित हृदयें सर्व तुकडे ॥
भरावी पोटाची खळगि; जल घ्यावें निज करीं ।
पडावें कोठेंही सदन पडकें पाहुनि तरी ॥

(१७)

कधीं अर्धे पोटीं कधिं मधुनि एकादशि घडे ।
खरी येतां एकादशि मग जणों लंघन घडे ॥
शरीरीं पासोळ्या उघड दिसती नेत्र सुकती ।
न येती काळाचे अनुचर मला कां दचकती ॥

(१८)

नको देऊं देवा ! कुळिंहि अबला जातिस कदा ।
भिकाऱ्याची वृत्ती; तुज विनति भाई मम सदा- ॥
नको दुर्वाक्यें तीं श्रवण करितां कर्ण विटती ।
जणो दुर्गंधाचे घट भरुनियां पूर्ण फुटती ॥

# "कशाला ?"

शिखरिणी.

१

पतीचें ऐकेना उलट पतिला दुर्वच करी ।
अबोला सोडीना रुसुनि बसते जी दिनभरी ॥
स्वरूपानें लोकीं बहुत असली सुंदर जरी ।
कशाला ठेवावी सदनिं असली स्त्री क्षणभरी ॥

२

सदा आज्ञाधारी पितरवचनीं तत्पर असे ।
यशःकांती ज्याची पसरुनि दिगंतांत विलसे ॥
पुरे झाला ऐसा सुत निजकुळीं एकहि जरी ।
कशाला ते व्हावे सुत अवगुणि शंभर तरी ॥

३

खरी बंधुप्रीती यदिय हृदयीं अल्प न वसे ।
सदा वैगुण्याचें व्रत धरुनि काकासम वसे ॥
असा बंधु झाला उलट, असुनी पंडितमती ।
कशाला आशा ती तदिय करणें व्यर्थ जगतीं ॥

४

सुखाच्या वेळीं जो वचन वदतो प्रेमळ परी ।
निघोनियां जाई कठिण समयीं सोडुनि दुरी ॥

असो तो कैसाही धनिक अथवा पंडित जरी ।
कशाला तन्मैत्री उगीच करणें कृत्रिम तरी ॥

५

मनीं अज्ञानानें निजगुरुपदीं भाव न धरी ।
शिकूं जातां मध्यें छलकपतीनें प्रश्नहि करी ॥
अशा शिष्याची ती कुशल असली बुद्धिहि जरी ।
कशाला ठेवावा शिकवुनि नसे तें फळ जरी ॥

६

धन्याच्या शत्रूशीं मधुर वदतो, स्नेह धरितो ।
तयाचीं जो वर्मं कुटिल वचनें व्यक्त करितो ॥
स्वतःच्या कार्यीं तो चुकत नसला सेवक जरी ।
कशाला ठेवावा सदनिं असला चाकर तरी ॥

७

शरीरीं डौलानें बहु रुचिर पोषाख करुनी ।
समोरूनि जाई बघत असतां गर्व धरूनि ॥
असा मोठा झाला धनिक अधिकारी जरि तरी ।
कशाला त्याच्याशीं उगिच करणें भाषण तरी ॥

८

स्वतांची विद्वत्ता जनिं मिरवितो ज्ञान नसतां ।
खरें सांगूं जातां करित बसतो वाद भलता ॥
असो कोणी ऐसा कुलिन जन वाचालहि जरी ।
कशाला मूर्खांशीं उगचि करणें भाषण तरी ॥

९

जयांच्या भांडारीं धन, कनक यांची न कमती ।
तरी स्वार्थासाठीं तनु शिणविती व्यर्थ कुमती ॥
परंतू हातानें मुळिं घडतसे ना उपकृति ।
कशाला ते मोठे म्हणुनि जगतीं या मिरविती ॥

१०

रुचेना ज्या नामस्मरण विभुचें संसृतिमुळें ।
प्रपंचाचें ज्याच्या हृदयिं भरलें प्रेमचि खुळें ॥
असो तो कोणीहि प्रभुचरण ध्याई न कुमती ।
कशाला तो आला मनुज नरजन्मास जगतीं ॥

---

# "मृत कोकीळ"

मंदाक्रांता.

१

मी डोळ्यांनीं शिव ! शिव ! पिका ! पाहतों काय बा ! हें ।
आत्मा गेला निघुनि तव तो देह हा मात्र राहे ॥
आनंदाचे दिवस सरले संपली देहयात्रा ।
' काळाचे कां चुकत असती पाश ते प्राणिमात्रा ' ॥

२

आहे किंचित् वदन उघडें कोरडा कंठ झाला ।
'पाणी पाणी' करित तव का पांखरा ? प्राण गेला ?॥
आला नाहीं स्वजन कुणिही धाउनी अंतकाळीं ।
" भाळीं आहे विधिलिखित तें कोण येऊन टाळी" ॥

३

पाहूनीयां नयन उघडे तोंड भेसूर वाटे ।
डोळ्यावाटे निघुनि विहगा ! प्राण तो जाय वाटे ॥
झांकाया त्यां जवळ नव्हता कोणि कां स्नेहकारी ।
" अंतीं कोणी जवळ नसतां दुर्दशा होय भारी " ॥

४

मित्रा ! दोन्ही दिसत असती पंख विस्तारिलेले ।
झाले तैसे मलिन अगदीं मृत्तिका लागलेले ॥

वाटे मृत्यूसह झगडला देह हा शक्तिहीन ।
" प्राणासाठीं धडपड करी जीव प्रत्येक हीन"॥

५

ज्या त्वत्कंठें रसिक जनता तोषवीली वसंतीं ।
त्यानें केला 'घरघर' अहा ! पांखरा शब्द अंतीं ॥
कां काळाला मुळिं न कळली योग्यता त्वद्गुणांची ।
" मृत्यू नाहीं करित परवा सद्गुणा-दुर्गुणांची " ॥

६

आतां वाणी श्रवणमधुरा कोण काढील येथें ।
काकाचाही मद खगवरा ! कोण खंडील येथें ॥
तूं गेलासी तरिहि तव ती गानकीर्ति न जाई ।
" धन्य प्राणी अवनिवर जो कीर्ति ठेवून जाई " ॥

७

या उद्यानीं कितिक वसती कोकिळा ! पक्षि नाना ।
भारद्वाजादिकहि अपुल्या गात आहेत गाना ॥
त्वद्गानाची परि मधुरता येइना सत्य त्यांना ।
" ज्याचा जो जो सुगुण असतो तो न ये आणिकांना"॥

८

या काकांचें कटु वच कुठें तें तुझें गान कोठें ।
त्यांना देती बलि विसरती हे तुला मोठमोठे ।
या लोकांना परि विषमता दाविली तूं न कांहीं ॥
" वागो कैसा कुणिहि बुध तो शील सोडीत नाहीं "॥

९

गातांना तूं मधुनि मधुनी घेत होतास ताना ।
कानांना त्या बहुत सुखदा वाटल्या ऐकतांना ॥
माना येथें किति डुलविल्या कोकिळा! कीर्तिमाना ।
मानाला ते उचित असती तोषिती जे जनांना " ॥

१०

तूं कोकीळा! कुठुनि शिकला सांग होतास वाणी ।
होता ऐसा कवण गुरू तो कोण ना त्यास वाणी ?॥
नाहीं कोणीं तुज शिकविली अल्पविद्या न कांहीं ।
" लौकीकाचा गुण शिकवुनी सर्वथा येत नाहीं " ॥

११

तूं होतासी मजसि गमतें पक्षिगंधर्व एक ।
जाशी स्वर्गीं रसिक जन हे तोषवूनी अनेक ॥
जाण्याची तूं परि खगवरा! फार केलीस घाई ।
" तारुण्याच्या मधुर समयीं मृत्यु बा! योग्य नाहीं "॥

१२

आम्ही घ्यावा हितकर जिच्यापासुनी बोध चित्तीं ।
ऐशी होती सुखकर तुझी पूर्ण संतोषवृत्ती ॥
तूं आनंदी म्हणुनि तुझिया दुःख चित्तीं न राहे ।
" दुःखाच्या बा! कटुतर फळां मूळ अज्ञान आहे "॥

१३

जेव्हां न्याया तुजसि रुचिरा! काळ प्रत्यक्ष आला ।
आलापांनीं मधुर अपुल्या मोहिलें कां न त्याला ॥

किंवा भ्याला असशिल तया पाहुनी तूं स्वभावें ।
" भीतिग्रस्तां सुचत नसतें काय कैसें करावें " ॥

१४

ज्या आम्रानें दिन तव पिका ! पाहिले ते सुखाचे ।
चैत्राच्या त्या रुचिर समयीं गीत बा ! गावयाचे ॥
त्याला लावी निधन तव हें अश्रु गाळावयाला ।
" नेणें मृत्यू जरठ अथवा बाल यांच्या वयाला " ॥

१५

या आम्राचें तुजवरिल मी प्रेम तें काय वानूं ।
त्वद्देहीं हा उधळित असे आपले पुष्परेणू ॥
अर्पी अंतीं क्षिति तव शवाभोंवतालीं सुगंध ।
" तोडूं जातां तुटत नसतो प्रीतीचा स्नेहबंध " ॥

१६

भृंगांचीं हीं करुण रुदनें ऐकवेना विहंगा ! ।
गंगा वाहे नयनयुगुलीं येति रोमांच अंगा ॥
ते आम्राच्या तरुवरि अहा ! बैसती दुःखयोगें ।
" दुःखी दुःखी उभय मिळतां शांत होतात दोघे " ॥

१७

येतां वासंतिक समय ये आम्रवृक्षा बहार ।
तूं तच्छाखेवरति बसुनी गात होतास फार ॥
होतें भारी स्मरण विहगा ! अंतरीं त्या दिनांचें ।
" दुःखामध्यें स्मरण घडतें भोगिलेल्या सुखांचें " ॥

वा. क्र. 18002.

१८

गेला नाहीं समय अजुनी कोकिळा! ऊठ ऊठ ।
आम्रश्रीच्या नयनसुखदा या बहारास लूट ॥
आतां कैंचा उठशिल तुझी काळनिद्रा न जाय ।
" जो गेला तो फिरुनि भुवनीं जीव येईल काय "!॥

---

# जीवित–साध्य.

वृत्त–मंदाक्रांता.

१

कोणा ठावें किति दिन तुझ्या राहिले जीविताचे ।
केलें कांहीं तरि हित गड्या ! मानवा ! कां स्वताचें ॥
आयुष्याचे दिन हळु हळु जात आहेत पाहीं ।
" जो गेला तो दिवस फिरुनी सर्वथा येत नाहीं " ॥

२

हा प्राणाचा तव बुडबुडा येथ केव्हां फुटेल ।
केव्हां दोरी नकळत गड्या ! जीविताची तुटेल ।
घेई लोकीं करुनि अपुलें जन्मसाफल्य कांहीं ॥
" वारंवार प्रिय नरतनू सत्य येणार नाहीं " ॥

३

आयुष्याचा समय सरुनी मृत्युशय्या पडेल ।
स्वार्थ-प्रेमी सकल जनता भोंवतीही रडेल ॥
जेणें शांती तंव तुज मिळे आचरीं त्या फलातें ।
" देतें पुण्याचरण हृदयीं अंतशांती जिवातें " ॥

४

क्षीण क्षीण स्वर निघतसे, प्राण कंठांत आले ।
गात्रें झालीं विकल सगळीं पांढरे नेत्र झाले ॥

तेव्हां साह्या वद झडकरी कोण ये धांवुनीयां ? ।
" जो वेळींच स्वहित उपजे शाहणा तो जगीं या " ॥

५

जे जे मोठे परिचित तुझे इष्टमित्रादि होते ।
त्यांतूनी वा ! कितिक उरले आज आहेत येथें ॥
घेई लाभ स्वकिय अपुल्या साधुनी लौकिकाचा ।
" जीवित्वाचा नच भरंवसा मृत्युलोकीं क्षणाचा " ॥

६

माझे माझे करित असतां लोक कित्येक गेले ।
क्षुद्र स्वार्थी पडुनि बुडुनी मूर्ख कित्येक मेले ॥
सांगायातें तुजसि कविला नांव ज्यांचें न राही ।
" सत्कीर्तीच्याविण जनमुखीं नांव राहात नाहीं " ॥

७

तूं डोळ्यांनीं बघत असतां सर्वहें नाशवंत ।
मायामोहीं उगिच अपणा मानिशी भाग्यवंत ॥
येई कामीं क्षणिक सगळें भाग्य हें काय अंतीं ।
" भ्रांतिष्टांना मिळत नसते पारलौकीक शांती " ॥

८


वैराग्यानें हृदय जळतें पाहुनीयां स्मशान ।
गेहीं येतां फिरुनि अपुली पूर्ववृत्ती समान ॥
अज्ञानानें निघुनि सगळा जन्म जाईल सारा ।
" आहे एक्या दिवसिं सगळा सोडणें हा पसारा " ॥

९

जातां देह त्यजुनि जगतीं नांव राहील मागें ।
लोकप्रीती स्मरुनि तुजला अंतरामाजि जागें ॥
ऐशीं कृत्यें तरि बहु करी लोककल्याणकारी ।
" जो साधीतो इहपर हितें 'धन्य' तो देहधारी " ॥

१०

शोधोनीयां बघ अजवरी काय केलें तुवां तें ।
कांहीं केलें नसशिल तरी आचरीं सत्कृतीतें ॥
ज्याच्यात्याच्या निजकरिं असे सौख्य वा दुःख त्याचें ।
" जैसें कर्म प्रतिफल तसें प्राप्त होतें तयाचें " ॥




## चक्रबंध.

स्रग्धरा

कीर्ती–सौगंध ज्याचा पसरुनि भुवनीं शोभते रम्य कांती ।
देवी–भोगा सहाती परि मनिं नच ती जाय लंघूनि शांती ॥
काव्यीं बंध प्रबंधीं कविजनिं पसरी गूण नाना ग्रथूनी ।
आनंदी–रत्नकांत प्रियजनिं विलसो विश्वनाथ स्मरूनी ॥१॥

# चक्रबंध.

स्रग्धरा वृत्त

१

कीर्ती सौगंध ज्यांचा महिवर्नि पसरे शोभते रम्यकांती ।
दैवी भोगा सहाती परि मनिं नच ती जाय लंघून शांती ॥
काव्यीं बंध प्रबंधीं कवि जनिं पसरी गूण नाना ग्रथूनी ।
आनंदी-रत्नकांत प्रियजनिं विलसो विश्वनाथ स्मरूनी ॥

**सम०रीत**—समोरील ओळींतील अक्षरें शेवटपर्यंत क्रमानें वाचावीं म्हणजे १ ओळ तयार झाली. नंतर तिच्या उजवीकडच्या ओळींतील अक्षरें तशीच वाचावीं याप्रमाणें चारी ओळी वाचाव्या.

**साध्य**— यात 'निं' हा चक्रमध्य साधला आहे आणि बाहेरील वर्तुळापासून चौथ्या वर्तुळांतील अक्षरें क्रमानें घेतलीं असतां 'गंगाधर रघुनाथ'[१] हें आश्रयदात्याचें नांव साधलें आहे.

---

१ गंगाधरराव देशमूख.

# मौज.

२

## पार्वती व गंगा यांचीं समान विशेषणें

॥ अनुष्टुप् ॥

ब्रह्मचारिप्रसूता जी गिरिजा शंकरप्रिया ।
सुरपादस्तुता देवी श्रीगंगा पार्वती तथा ॥
हरतनुस्थायिनी देवी सगरपुत्रप्रहर्षिणी ।
सदाशिवहारिणी देवी श्रीगंगा पार्वती जनीं ॥

अधोरेखित विशेषणें गंगा आणि पार्वती दोघींस लागतात पुढें पहा.

| विशेषणें. | गंगा. | पार्वती. |
|---|---|---|
| १ ब्रह्मचारि-प्रसूता. | भीष्ममाता. | कार्तिकस्वामी-ची माता. |
| २ गिरिजा | हिमाद्रीपासून वाहणारी. | हिमाद्रिकन्या (प्रसिद्ध.) |
| ३ शंकरप्रिया | हें विशेषण | उघड आहे. |
| ४ सुरपाद-स्तुता | विष्णुपदीं स्तविली गेलेली (देवानीं.) | महिषासुराच्या-वधाकरितां दे-वांनीं प्रार्थिलेली. |

| विशेषणे | गगा. | पार्वती. |
|---|---|---|
| ५ हरतनु-स्थायिनी | शंकराच्या डोक्यापासून वाहणारी. | अर्धनारी नटेश्वर. |
| ३ सगरपुत्र-प्रहर्षिणी | सगर राजाच्या पुत्रांस आनंद देणारी. | गरयुक्त जो शंकर त्याच्या पुत्रास आनंद देणारी |
| ७ सदाशिव-हारिणी | सदा+अशिव +हारिणी नेहमीं पाप नाहींसें करणारी. | सदाशिव + हारिणी, शंकराचें मन हरण करणारी (मिलीण) |

# संभाजीचें औरंगजेबास उत्तर-दूताकडून.

शार्दूलविक्रीडित.

१

सांगा जाउनि हा निरोप तुमच्या औरंगजेबास कीं ।
नाहीं मी फसणार ऐकुनि तुझीं हीं बोलणीं नाटकीं ॥
मृत्यूचें भय दावुनी शिकवितो सद्धर्म सोडावया ॥
धर्माच्या पुढतीं तृणासम सजे मी प्राण जाळावया ॥

२

नाहीं मी रजपूत कीं भिउनियां घेई विधर्मी उडी ।
आहे हा शिवराज छत्रपतिचा छावा मराठा गडी ॥
हातीं देउनि खड्ग ये मजपुढें—त्याला म्हणावें जरा- ।
देतों उत्तर मी पराक्रम तुला दावूनि माझा खरा ॥

३

दूतांच्या करवीं कशास मजला संदेश तो धाडितो ।
येऊनी पुढती विचारिल तरी संदेह मी फेडितों ।
सिंहाला मज कासया खवळितो वाक्शल्य टोंचोनियां ।
चाले मूर्ख मुलासमान करितो कां लाज सोडूनियां ॥

४

आम्ही क्षत्रिय हेंच ब्रीद अमुचें कीं धर्मसंरक्षण ।
गोविप्रप्रतिपालनार्थ गणितों आम्ही जिवाला तृण ॥
दुष्टे जे तुझियासमान असती त्यांच्याच साठीं बरें ।
आम्ही बाळगितों नृपाळ ! कटिला तें खड्ग लोकीं खरें॥

कोठें तो तकरीबखानहि तुझा दे पाठवूनी-म्हणा ।
पाठीचा अजि मोडितों तदिय मी मुष्टिप्रहारें कणा ॥
पाहूनी मजला असावध जयें हा घात केला इथें ।
हीरोजीसम त्यास पाठवुनियां देतों यमाच्या पथें ॥

६

रक्ताचें जल सिंचुनी अजवरी संरक्षिला साहसी ।
धर्माचा तरु आमुचा निजबळें छेदूं कसा पाहसी ॥
दैवानें खणिली तुझी कबर कीं मातें असें भासतें ।
येतां सत्य विनाश काल पुढती सद्बुद्धिही नासते ॥

७

मी तें वैभव सत्य तुच्छ सगळें धर्मापुढें मानितों ।
आहे ऐहिक भोग नश्वर खरें हें अंतरीं जाणतों ॥
मातें बंधनदुःख बाधत नसे धर्मांतरासारखें ।
मृत्यूला मनिं क.पदार्थ गणितों केव्हांहि ना तो चुके ॥

८

मातें कां भलत्या तुझ्या कळविशी पैगंबराच्या कथा ।
माझें हें मन ओढण्या श्रम तुझे आहेत सारे वृथा ॥
धर्माची मज लाभली मधुतरा ती रामदासी सुधा ।
कैसे हे विषतुल्य बोल रुचती जे ऐकिले ना कदा ॥

९

माझा 'राम' न थोर तो 'रहिम' तो आहे तुझा थोर का?।
कोणीं सांगितलें कुणीं शिकविलें आहेस तूं बोलका ॥
इच्छा यावरि ती जरीहि असली 'यावें स्वधर्मी अशी ।
प्रेमें रूपवती स्वकीय दुहिता अर्पून देई मशी ॥

# " निर्दोष कोणी जगतांत नाहीं "

इंद्रवज्रा

१

देवें समुद्रांतुनि निर्मिला जो ।
श्री शंकरानें धरिला शिरीं जो ॥
तो चंद्रमा लांछनयुक्त राही ।
निर्दोष कोणी जगतांत नाहीं ॥

२

श्रीविष्णुचा जो श्वशुर प्रसिध्द ।
यन्नाम रत्नाकर हें विशुध्द ॥
त्याचे जलीं क्षार भरुन राही ।
निर्दोष कोणी जगतांत नाहीं ॥

३

सौंदर्य ज्याचें रिझवी मनाला ।
सौगंध ज्याचा रमवी मनाला ॥
पुष्पें अशीं वेष्टिलिं कीटकांहीं ।
निर्दोष कोणी जगतांत नाहीं ॥

४

रत्नाकराची प्रिय जी कुमारी ।
लक्ष्मी, असे यत्पति कैटभारी ॥

ती पापसंपर्क न काय साही । ?
निर्दोष कोणी जगतांत नाहीं ॥

५

शीर्षी सदा जो वसुधेस वाही ।
शय्या जयाची करि शेषशाई ॥
कैसा मुखीं तो विष शेष वाही ।
निर्दोष कोणी जगतांत नाहीं ॥

६

पृथ्वीवरी धान्य समृद्धकारी ।
जे वर्षती मेघ विशुद्ध वारी ॥
त्यां गर्जना शोभत सत्य नाहीं ।
निर्दोष कोणी जगतांत नाहीं ॥

७

आहेत हो ! या जरि सत्य गोष्टी ।
ठेवूं नका केवळ दोषदृष्टी ॥
कोणांत कांहीं गुण दोष कांहीं ।
निर्दोष कोणी जगतांत नाहीं ॥

# "हा विश्वाचा एक बाजार आहे"

(शालिनीवृत्त)

१

हा विश्वाचा एक बाजार आहे ।
याचा कोणी अंत केव्हां न पाहे ॥
आले कोणी येत आहेत कोणी ।
गेले कोणी जात आहेत कोणी ॥

२

माता आणी तात कन्या सुपुत्र ।
आप्तस्नेही बंधु आणी कलत्र ॥
हे प्रेमाचे लोक सारे असोनी ।
कोणाचीही वाट पाही न कोणी ॥

३

तैसा प्राण्या! तूहि जाणार आहे ।
आयुष्याची सांज बा! होत आहे ॥
जातां जातां येथली वस्तु घेई ।
तूं येथोनी रिक्त-हस्तें न जाई ॥

४

येथें नाहीं माल कांहीं उधार ।
ही हातानें खेळण्याची जुगार ॥

ज्या हातें दे, घेइ तूं त्याच हातें ।
जागा नाहीं घ्यावया संशयातें ॥

५

आधीं द्यावें मोल तें वर्तनाचें ।
होतें तेव्हां तत्फल प्राप्त साचें ॥
पाहीं भ्रांती सोडुनीयां नरा ! हे ।
रोखीचा हा येथला भाव आहे ॥

६

प्रीती देई, प्रेम घेई जनांत ।
अप्रीती दे, द्वेष घे आपसांत ॥
ऐशी येथें चालते देवघेव ।
वाणी माझी नित्य लक्षांत ठेव ॥

७

सौख्यें देतां सौख्य घेशील फार ।
दुःखें देतां दुःख होईल फार ॥
जैसें द्यावें येथ तैसेंच घ्यावें ।
कोणी कोणा व्यर्थ ना दोष द्यावे ॥

८

सत्कृत्यांचें मोल देऊन कांहीं ।
जातांना तूं पुण्य घेऊन जाईं ॥
तेणें चित्ता शांति लाधेल तूतें ।
बा ! येण्याचें चीज होई येथें ॥

# हेवेखोरास.

भुजंगप्रयात.

नसे चित्तशुद्धी मनीं द्वेषबुद्धी ॥
वरूनि परी भासवी स्नेहवृद्धि ॥
तुझें जाणतों सत्य मी अंतरंग ।
मनःसागरीं फार येती तरंग ॥

२

तुझी नम्रता जीर्ण वस्त्रासमान ।
दिसे त्यांतुनी क्षुद्र आत्माभिमान ॥
किती झांकशी झाकणें व्यर्थ वा ! हे ॥
जगद्दृष्टि ही चंचला फार आहे ॥

३

करावी स्पृहा सद्गुणांची बरी ती ।
खरे ज्ञान-योगी न हेवा करीती ॥
स्पृहेनें घडे उन्नती सद्गुणांची ।
तुला सांगतों रीत साधूजनांची ॥

४

जयां वाचुनी मान्यही मानतील ।
जयां ऐकुनी शाहणे तोषतील ॥
अशा सत्कृतींनीं घडे इष्टसिद्धि ।
मनोबुद्धिची होतसे तेविं वृद्धि ॥

५

नसे ठाउकें काव्य कैसें म्हणावें ।
तयानें कसें काव्यबंधीं शिरावें ॥
कवीचा परी हाय ! हेवा सुटेना ।
मनोवृत्तिची ग्रंथिका ती तुटेना ॥

६

स्वतांचें हंसें होतसे सज्जनांत ।
कळावें कसें सर्व हें मीपणांत ॥
पहा दोष आहेत हेंव्यांत फार ।
कशी होइना त्वत्कृती दोषभार ॥

७

मधाची वसे माधुरी ज्या सुमांत ।
वनींही तया भृंग ते सेवितात ॥
तसा सद्गुणांचा जिथें अंश आहे ।
तिथें मात्र सारज्ञ मोहून राहे ॥

८

मनःपद्म सत्फुल्ल तें व्हावयातें ।
गुणाची शलाका पुरी एक होते ॥
तिथें वाहतो कीर्तिचा गार वारा ।
सुगंधें भरी तेथला प्रांत सारा ॥

९

कुणाला नसे कीर्तिची हाव भारी ।
कुणाला रुचेना स्तुती सौख्यकारी ॥

परी त्यांतल्या त्यांत आहेत भेद ।
जगीं सच्चरित्रांतुनी घे सुबोध ॥
१०
गुणी माणसा गूण हे दूत होती ।
गुणज्ञास बोलावुनी आणिताती ॥
करायास हेवा नको जाण त्याला ।
गुणाची कळे योग्यता जाणत्याला ॥
११
परांच्या गुणा पाहुनीयां जळावें ।
स्वतां दुर्गुणातें जनीं पाजळावें ॥
अशानें खरी मान्यता येत नाहीं ।
खऱ्या कीर्तिचा मार्ग शोधून पाहीं ॥
१२
करावा खऱ्या सद्गुणांचा विकास ।
धरावी महा बुद्धिची पूर्ण कास ॥
कशाला बरें व्यर्थ हेवा करावा ।
बळें निंद्य तो पंथ कां आचरावा ॥
१३
मनीं एक आहे जनीं अन्य दावी ।
अशी अन्यथा वृत्ति कां आचरावी ॥
तिच्यानें जनीं फार होती अपाय ।
स्वभावास लोकीं नसे बा ! उपाय ॥
१४
शिकोनी जरी फार विद्वान झाला ।

सुदैवें जरी फार श्रीमान झाला ॥
तरी पाहिजे एक सच्छील बा ! तें ।
" परीक्षा नराची स्वभावांत होते ॥ "

१५

मनाचीं पुटें संस्कृतीचीं गळालीं ।
परी वृत्ति दोषाहि नाहीं जळाली ॥
जिच्या पासुनी शांति ये ना मनाला ।
शिकावी अशी व्यर्थ विद्या कशाला ॥

१६

जयाचा नसे गूण जो आपणांत ॥
करावा तयाचा न हेवा मनांत ।
तुझा तूंच शोधून पाहीं मनाशीं ॥
खरें बोलणें आवडे कां कुणाशीं ॥

१७

तरी बोलतो निर्विकार स्वभावें ।
अहंमन्यतेचे न भारे वहावे ॥
तुला आवडो नावडो बोध सारा ।
कवीची गळाली परी काव्यधारा ॥

---

# प्रभंजन.

शार्दूलविक्रीडित.

१

आकाशांतरिं धूळ ही पसरली झांकून गेल्या दिशा ।
पक्षी घाबरुनी तदीय बनल्या वृत्तीहि वेड्या पिशा ॥
काढोनि मुख पाहवे न अगदीं बाहेर गेहांतुनी ।
संतापांत चुका प्रभंजन महा होती तुझ्या हातुनी ॥

२

शाखा मोडुनियां 'कडा कड' असा आवाज त्यांचा उठे ।
त्या योगें भयभीत पक्षिगण हा जाईल आतां कुठें ।
नाहीं काय तदीय अल्पहि तुला बा! काळजी अंतरीं ।
व्हाया निष्ठुर काय कारण घडे तें सांगशी कां तरी ।

३

मोठे वृक्षहि पातले उमळुनी सर्वत्र भूमीतळा ।
डोळ्यांनीं नच पाहवे ललित ज्या वेली तयांची कळा ।
लोकांचीं भुवनें तशीं उपवनें विध्वंसुनी नासुनी ।
ऐसें तें वद कोणतें स्वहितही त्वां घेतलें साधुनी ॥

४

जीं जीं सुंदर तूं वनें उपवनें उद्यान डोलाविलें ।
त्यांचा नाश करीत व्यर्थ सुटशी या उग्र कोलाहलें ॥
ज्यांचे कौतुक मानिलें झुलविलें त्यांनाच विध्वंसिलें ।
कोणीं आचरिलें कुकर्म न असें लोकांत म्यां पाहिलें ॥

५

प्राणांचे बळि घेतले नच मनीं केला विचार क्षण ।
कीं हा आश्रित हा निराश्रित असे याचें करूं रक्षण ॥
कोपावेश-भरें विचार न उरे निष्ठूरता बावरे ।
बुद्धिभ्रंश भरे खरेंच कथितों होशिल दुःखी बरें ॥

६

कोपाचा भर ओसरे अनुसरे शांति प्रती सत्वरें ।
पश्चात्तापभरें खरे निजमनीं होतात दुःखी बरें ॥
झाल्या फार चुका न जोंवरि करीं निष्ठूरता आवरी ।
शास्त्यांचा पथ आचरी मति अशी होऊं न दे बावरी ॥

७

होता वाहत मंद मंद गतिनें तूं पुष्पवृक्षांतुनी ॥
केला शांत निदाघ-दाह अजुनी जाई न लक्षांतुनी ।
तेव्हांच्या उपकारितेस तुलितां निष्ठूरतेच्या सवें ॥
एका ठायिं विरुद्ध हे गुण कसे आश्चर्य वाटे नवें ॥

८

येशी तूं मलयागिरी हिमगिरी यांच्यावरूनी जरी ।
प्रेमोल्हासकरी सुगंध लहरी चित्ताप सारा हरी ॥
तैशी एक तरी सुगंध लहरी येते तुला कां खरी ।
झालें तें विसरी गड्या ! क्षणभरी तूं शांत हो लौकरी ॥

९

मोठा सागर वा तडाग तटिनी यांच्या वरूनी कदा ।
येशी वाहन मंद मंद गतिनें मंदानिला ! सौख्यदा ॥
एका मागुन एक त्यास लहरी येती तुझ्या सारख्या ।
स्नेहाचा महिमा तुझा अतुल तो गेला कुठें बा ! सख्या ॥

१०

जे जे आजवरी कवी उपकवी होऊन गेले महीं ।
त्यांनीं 'वात मरुत् समीर' तुजला नांवें दिलीं हीं नवीं ॥
काव्यीं त्वद्गुण 'मंद शीत' असले नानापरी वर्णिले ।
ते सारे कवनींच राहुनि तुवां हें काय आरंभिलें ॥

११

अत्यावश्यक जीव जीवन जसें जीवावया निर्मिलें ।
त्यापेक्षां तव योग्यता सुकविंनीं जाणूनियां वर्णिलें ॥
"प्राणाधार" असा तुझा महिवरी लौकीक होता खरा ।
त्यातें लावियला कलंक; गमतें ऐसें मदीयांतरा ॥

१२

हे वायो ! विमला ! मला परिमला वाहूनियां निर्मला ।
संशुद्धी करण्यांत सत्य गमला तूं एकला बा ! मला ॥
कोठें सद्गुण तो पवित्र; करणी ही बा ! विचित्रा कुठें ।
ऐसें हें उलटें चरित्र लिहितां कां लेखणी ना खुटे ॥

१३

रोगी चार करी उठे झडकरी धांवे महा सत्वरी ।
"झाला वायु" असें म्हणून उपमा देती तुझी ती खरी ॥
तूतें मात्र न द्यावयास उपमा मातें जगीं आढळे ।
आहे तूंच तुझ्या समान दुसरा आणू कुठूनी बळें ॥

१४

आहे देह विहीन तूं बहुत हें आहे बरें मारुता ! ।
दुष्कृत्यापरि देह भीषण तुझा देता महा भीरुता ॥
झाले अंगरहीत जे परि जयां मुक्ती मिळाली नसे ।
भूतांच्या समुहांत योग्य गणना केली तुझी ती असे ॥

# " मेवाडच्या सरहद्दीवरील प्रतापसिंहाचे शेवटचे उद्गार "

—:*:—

( हरिणी वृत्त )

बहुत शिणलों मेवाडा ! मी तुझ्याकरितां बरें ।
त्वदिय निटिलीं स्वातंत्र्याचें नसे सुख कां खरें ॥
नृपविभव तें गेलें जावो विपत्समयीं महा ।
परि तुजकडे पाहोनीयां तुटे मम जीव हा ॥

२

धन न उरलें कांहीं, मातें अकिंचन पाहुनी ।
अनुचर मला गेले माझे अकस्मिक सोडुनी ॥
म्हणुनि उरलों एकाकी मी विषाद गमे अती ।
तिळ तिळ तुटे जीवात्मा हा करूं गति कोणती ॥

३

नृपतिसुख ज्यां तें सेवावें खरें नृपमंदिरीं ।
मज भटकणें आलें दैवें महा गिरिकंदरीं ॥
सहन तुझियासाठीं केली विपत्तिपरंपरा ।
सफल करणी झाली नाहीं अहा ! मम सुंदरा ॥

४

नखहि न दिसे ज्या साध्वीचें कधीं बघण्या जनीं ।
सखि मम अशी माझ्या मागें फिरे विजनीं वनीं ॥
प्रियसुत तिचा बा ! मेवाडा ! तुझा युवराज हा ।
रडुनि तिजला दुग्धासाठीं किती विनवी पहा ॥

५

त्यजुनि विभवें मारोनीयां सुखावरि लाथ मी ।
तुजवरिक बा ! दिव्यप्रेमें न त्या यवना नमी ॥
न तरि मजला लोकीं कांहीं मुळीं नसतें उणें ।
शिव ! शिव ! नको तें श्वानाच्या समान परी जिणें ॥

६

यवन नृप जो त्यातें देती सुता भगिनी अहा ! ।
जनिं म्हणविती 'राजे' ऐसे स्वजातिय जे पहा ॥
कशि न उरली सद्धर्माची खरी अभिमानता ।
उचित गमते कैशी लोकां पराधिन—मान्यता ॥

७

प्रळय घडले जोहारांचे किती चितुडावरी ।
तरुणि पडल्या नाहीं केव्हां परी यवना करीं ॥
अजुनिहि तिथें रक्षा त्यांची असेल पहा जरा ।
विसर पडला या लोकांच्या कसा हृदयांतरा ॥

८

सहन करवेना ज्या गोष्टी कशा मग आचरूं ।
स्वकरिं अपुल्या वंशाला मी कलंकित कां करूं ॥ ?
नृपपद जरी गेलें जावो स्वधर्म न तो सुटो ।
सहन करितां दुःखातेंही उरःस्थळ हें फुटो ॥

९

मुकुट हरण्या स्वातंत्र्याचा किती रिपु पातले ।
अतुल समरीं ज्यां रक्ताचे सडे बहु घातले ॥

परि न चुकली बा मेवाडा ! पराधिनता तुला ।
कठिण दिन हे आले भारी तुझे बघण्या मला ॥

१०

किति अजवरी केले भारी भयंकर बा ! कली ।
कितिक पडले राठोडांचे तुझ्याकारितां बळी ॥
कशि न चुकली दास्याची ती तुझी पदशृंखला ।
भडभडुनियां येतें आतां उपायचि खुंटला ॥

११

स्मृति न हळदीघाटाची ती पडेल कुणा कदा ।
समर घडले राजस्थानीं जरीहि अनेकदां ॥
नरवर किती धारातीर्थीं दिवंगत जाहले ।
तरुण विधवा धाराश्रूंनीं कपोलहि जाहले ॥

१२

अकबरशहा येता तेव्हां जरी समरांगणीं ।
यवन चमुच्या भाग्याच्या तो खरा हरितों मणी ॥
सजिव न तया जाऊं देतों खरोखर तेथुनी ।
उगिच पण त्या गोष्टी आतां नसे फळ बोलुनी ॥

१३

रुधिरमय बा ! कोणीही जो तुझा इतिहास हा ।
लिहिल अपुल्या कौशल्यानें खरा जगतीं अहा ! ॥
शिकविल जनीं स्वातंत्र्याचा खरा उपदेश तो ।
अनुभविक जो आहे तोची जगा उपदेशितो ॥

१४

जनन दिधलें बा ! मेवाडा ! तुवां मजला अहा ! ।

उपकृति तुझी जन्मोजन्मीं फिटेल न ती महा ॥
पद न उचले जातांना बा ! अहा ! त्यजुनी तुला ।
कठिण मनही ! कांहीं केल्या न हें करवे मला ॥

१५

घडतिल कधीं भेटी आतां पुन्हा न कळे मला ।
विरह दिन हे कैसे कंठू कुठें वद निर्मला ॥
नयन करितों येतों आतां समागम संपला ।
वच न निघती कंठांतूनी गळा मम दाटला ॥

---

# "अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला."

भुजगप्रयात.

शिवाजी नृपासारखे कीर्तिमान ।
गुरू रामदासापरी बुद्धिमान ॥
प्रयत्नें तयांनीं जया मुक्त केला ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥

२

दरे आणखी खोल खोरे दडाया ।
चढाया कडे भीति ना जे पडाया ॥
असे मावळे जन्मुनी धन्य झाला ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥

३

अहा ! रामदासी सुधा प्राशितांना ।
रणोत्साह आला महाराष्ट्रीयांना ॥
तयांनीं जिथें युद्ध कल्लोल केला ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥

४

मिळोनी जिथें देशबंधू समस्त ।
पुरे नष्ट केले शिखानष्ट मस्त ॥
जया नेति ते वैभवाच्या शिराला ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥

५

बरी भाकरी त्यावरी एक कांदा ।
नसो अन्य कांहीं शिदोरीस बाधा ॥
असे कष्ट सोमून जो मुक्त केला ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥

६

प्रसंगीं बहू गाळिल्या रक्तधारा ।
करीती परी देश जे मुक्त सारा ॥
अशा शूर वीरांस जन्मून घाला ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥

७

कटीं एक शेला करीं एक भाला ।
शरीरावरी लांब पोषाख केला ॥
मराठी चमूचा धुराळा उडाला ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥

८

रणाची धुमाळी उडाली उडाली ।
पहा शत्रु सेना बुडाली बुडाली ॥
असा होतसे घोष प्रत्येक वेळा ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥

९

चहूं बाजुंनीं वेढुनी गांठिला हो ।
मधें शत्रुनें फोडिला दीर्घ टाहो ॥

जिथें गोष्टि या येति ऐकावयला ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ।

१०

करीं जाहल्या छिन्न विछिन्न ढाला
रणावेश आला मराठे गड्यांला ॥
जयश्री सदा भूपवी ती जयाला ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥

११

विजापूरचा मारिला खान आजी ।
उद्यां दिल्लिचा कापला खान गाजी ॥
जिथें हर्षवीती कथा या मनाला ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥

१२

कुठें वीर बाजी कुठें वीर तानू ।
तयांना कसें शब्द–काव्यांत वानूं ॥
लढूनी जिथें वीर प्रत्येक मेला ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥

१३

जगीं ठेउनी आपुली दिव्यकीर्ती ।
कुठें जाहल्या सर्व अदृश्य मूर्ती ॥
स्मृती होउनी ध्यास लागे मनाला ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥

१४

म्हणे काय ऐका पहा घोडखिंड ।

निघाली इथें शत्रुची पूर्ण धिंड ॥
जिथें शत्रुराष्ट्रास झाला उन्हाळा ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥

१५


पहा आज सह्याद्रिच्या चोरवाटा ।
तशा कोंकणांतील त्या सर्व घाटा ॥
पहा दुर्गही बोलती याच बोला ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥

१६

असे पूर्वींचें स्थान आणि प्रसंग ।
स्मरूनी कसें होइना चित्त भंग ॥
स्वभावें मुखीं येतसे शब्दमाला ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥

---

# अष्टग्रहबंध.




दे देवा चरणीं ठाव । क्लेशदायक हा भव ॥
पाजी मुक्त सुखी व्हाया । भक्ती-सुख सुधा मला ॥१॥

कवि — दु. आ. तिवारी.
ता. १६ । २ । १९१८.

# स्वर्गंगा.

शा० विक्रीडित.

बैसें नील नभीं प्रशांत समयीं दृष्टीस जों लावुनी ।
स्वर्गंगे ! सुचले विचार नयनीं त्वद्रूप तें पाहुनी ॥
नक्षत्रें नच देव सर्व जमले त्वच्छुभ्र पात्रीं खरे ।
स्नानें मंगल चाललीं बघुनियां आनंद पोटीं भरे ॥

२

तारापुंज कितीतरी विलसती हे मध्यभागीं पहा ।
आले बुद्बुद काय हे तुजसि गे ! शीघ्र प्रवाहें अहा ! ॥
किंवा त्या असतील देवललना गौरांगना सुंदरा ।
लाजोनी दिसती क्षणांत लपती झांकूनीयां अंबरा ॥

३

येई पूर्व दिशेकडून रुचिरे ! हा कोण राजेश्वर ।
तेजस्वी भरला प्रकाश गगनीं हा काय योगीश्वर ॥
शुद्धेंदू म्हणतात जार परि हा आहे म्हणूनी स्वयें ।
पापक्षालन व्हावया तुजकडे स्नानार्थ चालून ये ॥

४

पापानें बहु हीन काय बनला त्वां पूर्ण निर्धूतला ।
पूर्णेंदू बनला सुधाकर पुन्हा संतोषवी भूतला ॥

खालीं आणि वरी तसा चहुंकडे आनंद कोंदाटला ।
हा सारा महिमा तुझा अतुल गे ! मातें खरा वाटला ॥

५

त्वत्तीरा वरि यावया झडकरी घ्यावी भरारी वरी ।
गंगे ! प्रेमभरें तुझ्या मग जलीं घ्यावी उडी सत्वरी ।
जावें तेथुनि दिव्य देह धरुनी स्वर्गांत गे ! नीटसें ।
भेटावें निजपूर्वजांस वरतीं वाटे मला कीं असें ॥

६

मंदारादिक कल्पवृक्ष तुझिया तीरावरी डोलती ।
आनंदें खग राजहंस तुझिया पाण्यामधें पोहती ॥
सारंगादिक जे रसज्ञ असती ते नाचती खेळती ।
शोभा देवि ! तुझी अम्हा न बघतां येईल तीं खाळतीं ॥

७

या लोकीं असती प्रसिद्ध तटिनी त्वन्नाम ज्या धारिती ।
तच्छोभाहि न वर्णवे तव कशी वर्णूं मनोहारि ती ॥
झालें विष्णुपदीं तुझें जनन गे ! तूं देवपुत्री असे ।
दिव्यत्वा तव वर्णण्या मम खरी वाणी सुदिव्या नसे ॥

८

केला यत्न महा भगीरथ नृपें तूं भूतलीं यावया ।
तैसाही जरि यत्न सूज्ञ कविनें केला तुला गावया ॥
त्याचे ते जड शब्द काय पुरती त्वत्कीर्ति सांगावया ।
स्वर्गांतीलचि व्यास वाल्मिक बरे त्वद्भाग्य वर्णावया ॥

१

अस्तित्वांत तुझीच खूण सकलां लोकांस साक्षी असे ।
सारें हें नभ शोधिलें नच परी तो स्वर्ग कोठें दिसे ॥
स्वर्गंगा वदती न सर्व वदती ' आकाशगंगा ' असे ॥
रूपावांचुनि नाम तें हळुहळू लोपूनियां जातसे ॥

---

## विधवा.

हा ! हा ! देवा ! मजवरि कसा कोपलासी दयाळा ।
सौभाग्याचा तिलक पुसुनी शुभ्र केलें कपाळा ॥
कोठें गेला रमण मम तो जीविताचा विसावा ।
दुर्दैवानें निटिलिं लिहिला लेख कैसा पुसावा ? ॥

२

लग्नाला अजुनी न वर्ष भरलें तों एकही व्हावया ।
गेला कांत अनाथ हाय ! बनलें सौभाग्य गेलें लया ॥

प्रेमाचा तरु लाविला स्वहृदयीं जो प्रीतिच्या सज्जलें ।
कैसा जाय वटून हाय ! मम या दुर्दैव दावानलें ॥

३

झाला काय खराच पायगुण हा माझा प्रिया मृत्युला ।
सासू दीर नणंद हे मकाटिती या आपुल्या हेतुला ॥
सारे कोपभरें मलाच वदती दुःशब्द नानापरी ।
आणाया परती उपाय असला कां सांगती ना परी ॥

४

म्हणे सासूबाई मम गृहिं नको नित्यचि रडूं ।
तुझा येई बाई अनुवभ अम्हां फारचि कडू ॥
नणंदा जावा जोडिती वरुनि यातें पुरवण्या ।
मला बाई बाई ! स्थळ नच मुखातें लपविण्या ॥

५

सती जातां येता परतुनि जरी कांत भुवनीं ।
तरी त्याच्या साठीं खचित निजतें अग्निशयनीं ॥
उपायांची जेथें सफल करणी होत नसते ।
करावें मूर्खत्वें सुजन म्हणती साहस न तें ॥

६

विचारें मीं ऐशा विकल तनु होऊनि बसलें ।
मला "पापी ! पापी !" म्हणुनि जन हे फार हसले ॥
महद्दुःखीं देती अदय वचनीं डाग वरती
कुदैवाची रेषा परि न करिती हाय फिरती ॥

७

प्रपंचाच्या भावी किति सुखद गोष्टी रचियल्या ।

मनीं आनंदाच्या किति रुचिर लाटा उसळल्या ॥
अजीं झालीं स्वप्नें जणुं विफल तीं सर्व गमतें ॥
" विधात्याची लीला अघटित कुणाला न कळते " ॥

८

तुझी सर्वांना विस्मृति हळुहळू होइल जरी ।
ममाश्रूंची धारा अविरल सख्या ! वाहिल परी ॥
झुरोनी त्वद्दुःखें मृदुल तनु जाईल सुकुनी ।
परंतु प्रेमाचा वचहि न गृहीं काढिल कुणी ॥

९

कधी स्वप्नामध्यें अवचित तुझी गांठ पडतां ।
उमाळे दुःखाचे मज बहुत येतील रडतां ॥
स्रवोनी अश्रूंतें मिळतिल सख्या ! शुद्ध हृदयें ।
पुन्हां जागी होतां भरुनि मम येई हृदय हें ॥

१०

तुझें छायाचित्र स्वमन रमवाया क्षणभरी ।
करीं घ्याया वाटे गृहिं मजसि चोरी कितितरी ॥
बसावें एकांतीं बघत जरि त्या त्वद्रुपुकडे ।
फुटोनी दुःखानें हृदय शतधा होति तुकडे ॥

११

तुझें मी किंवा तूं मम कधिं हि ना अप्रिय करी ।
अबोला कां नाथा ! मग मजसवें अप्रिय धरी ॥
पहा येती अश्रू नयनिं न दिसे मूर्ति विमला ॥
विधाता चित्रीं ही तुजसि बघुं देई नच मला ।

१२

अशा दुःखें कष्टें सहन करितां कांत विरहा।
पुढें येई बाई वपनविधिचा काळ अहहा ! ॥
समस्तांच्या तोंडीं विषय मम तो एकचि असे ।
मला येतां जातां कुटिल जनता पाहुनि हसे ॥

१३

अभागिनिस या अशी कुठवरी तरी ठेविती ।
करा म्हणति सोंवळी सुजन नांव कीं ठेविती ॥
मला वचन ऐकुनी हृदयिं दुःख जें होतसे ।
नसेल मज वाटतें मरण- दु:खही तें तसें ॥

१४

झाले कष्ट मनास दुष्ट जनता सोडीच ना ती परी ।
देवा ! शिष्ट जनास इष्ट विधि हा कां वाटतो अंतरीं ॥
निंदा ऐकुनि त्रासले परिसिले लोकापवाद-स्वन ।
वाटे त्याहुनि कीं बरें पुरवलें तें आत्मवैडंबन ॥

१५

दैवाची फिरली दिशा उलट हें जाणूनियां आपण ।
झालें सादर पाहिजे म्हणुनियां मीं घट्ट केलें मन ॥
क्षेत्रीं नेउनियां मला उरकिला तो सोंवळ्याचा विधी ।
त्यातें आठवतां अहा ! गमतसे कीं क्रूर आहे विधी ॥

१६

होतें मी अमृता मृतापरि जयें केली कृती ती स्वयें ।
त्यातें खाटिक बोलुनी स्वकिय ही जिव्हा विटाळूं नये ॥

येतां दृष्टिपुढें प्रसंग मम तो रोमांचिता होतसें ।
शब्दीं वर्णन दुःख काय करवे मातें जसेंच्या तसें ॥

१७

होता केशकलाप भूषित शिरीं तो हाय ! गेला कुठें ।
लावूं "कामिनि तेल" सांग सखया ! आतां तुझें तें कुठें
गेलें कुंकुम त्या स्थळीं निटिलिं ये हा चंदनाचा टिळा ।
आतां ती तव काय होय सखया ! शृंगारपेटी मला ॥

१८

स्त्रिया परम वैरिणी असति या दुराचारिणी ।
किती म्हणति चंचला असति पापसंचारिणी ॥
बरी स्वपतिमागुनी उचित रूपहानी तिला ।
नसे उचित बोलणें धरुनि होय हें नीतिला ॥

१९

तुम्हांस बहु सांगतें सुजन हात जोडोनियां ।
म्हणाल जरि मूर्खही मजसि शांति सोडोनियां ॥
सयुक्त वदणें असत्य न ठरे कधीं या महीं ।
परंतु न रुचे खरें वचन आइबापासही ॥

२०

गरीब विधवांस हा उचित मार्ग वैडंबन ।
करी मग न कां तरी विधुरही तदालंबन ॥
जगांत नरजाति जी अखिल आज संचारते ।
पवित्र असतां कसे घडति हो दुराचार ते ?॥

२१

विरूपकरणी समाजघटना बरी काय हो ! ।

अनाथ जन रक्षणीं गतधवा न कां योग्य हो ॥
समस्त विधवा कशा असति त्या मनःसंयमीं ।
विवाह करितां तुम्हां परिच दोषितां कां तुम्ही ॥

२२

न लग्न करितां, घडे अहह ! पाप तें शंकितां ।
परंतु विधवा–विवाह घडतां तया दोषितां ॥
विपत्ति-समयीं खरी मतिस येतसे मांद्यता ।
न बुद्धि सुचते मना न रुचते कधीं सत्यता ॥

२३

सुशिक्षित नसे जरी मनचि व्यर्थ तीं बंधनें ।
अशिक्षित मतंगिनी कमल तंतुनीं बांधणें ॥
सुशिक्षित करा स्त्रिया भय न बाळगा हो ! वृथा ।
रवी उदय पावतां तम न राहतें सर्वथा ॥

२४

नवी नवि सुधारणा घडतसे जगीं प्रत्यहीं ।
निरर्थक न ती असे त्वरित येतसे प्रत्ययीं ॥
नवीन युग हें असे तुम्हि असां पुराणप्रिय ।
जुळेल मग हें कसें अवनती घडे अप्रिय ॥

२५

सरे जग पुढें पुढें तुम्हि खुशाल मागें पडा ।
रडा मुळुमुळू कुठें निबिड काननीं जा दडा ॥
गृहांत पुरुषार्थ दाखवुनि यादवी माजवा ।
जगीं “ पढतमूर्ख ” हें स्वकिय नामही गाजवा ॥

२६

सभा भरवुनी करा सुरस तीमधें भाषणें ।
जनांकडून 'वोलका' म्हणवुनी मनीं तोषणें ॥
वदा कृति न आचारा घडुनि येइ ती हानिच ।
ठसे उलट तें जणों हृदयिं रामदासी वच ॥

## हें सारें कशामुळें ?

१

होतों एकुलताच एक सुत मी मातापित्यांना गृहीं ।
लाडानें बनलों खरोखर पहा हट्टी महा आग्रही ॥
माझा दुर्गुणवृक्ष जैं हळुहळू वाढावया लागला ।
कैसा शिक्षक त्यास ना गवसला छेदावयाला भला ॥

२

स्वेच्छाचारी मदिय बनली हाय ! ती बालवृत्ती ।
झाली तीची हळुहळु पुढें वाममार्गीं प्रवृत्ती ॥
वात्सल्याचा जननिजनकां मोह तो आवरेना ।
कर्तव्याचा खडतर असा मार्ग तो आकळेना ॥

३

कांहीं चोरु नये, कधीं रुसु नये, सत्यास सोडूं नये ।
आज्ञा मोडुं नये कुणास कधिंही टाकून बोलूं नये ॥
बोधाचीं असलीं सुमंगल वचें आलीं न ऐकावया ।
माझें वर्तन चांगलें मग कसें येईल सांगावया ॥

४

जैसें वाढत चाललें वय तसें मूर्खत्व तें वाढलें ।
मातें बोलुनि बोलुनी स्वकियही भारीच कंटाळलें ॥
गेलों दुष्ट जनांत मी मिसळुनी सन्मित्र त्यां मानुनी ।
"शास्ता कोणि न राहतां व्यसन तें येतें घरीं चालुनी॥"

५

हिताचा कोणीही करित असतां बोध न रुचे ।
कशामध्यें आहे स्वहित अपुलें हेंहि न सुचे ॥
शहाणा मी मोठा म्हणुनि मनिं ताठा धरुनियां ।
जनीं वागावें मी रुचिर विनयातें त्यजुनियां ॥

६

निघावें शाळेचें मिष करुनि जावें नदिवरी ।
मजेनें पोहावें स्थिति मजसि वाटे बहु वरी ॥
कधीं रानोरानीं भटकत फिरावें दिनभरी ।
कधीं चिंचा बोरें हुळवित बसावें तरुवरी ॥

७

बाबांना कळली जरी मदिय ही दुर्वर्तनाची कथा ।
आईच्या पदरीं शिरून अवघा तत्कोप होई वृथा ॥
व्हावें मी तरि शाहणें नच परि दुर्बुद्धि सोडी मला ।
आतां हा अनुताप पेटवि मनीं दुःसह्य दुःखानला ॥

८

माझी पाहुनि वर्तणूक गुरुनें शाळेंतुनी काढिलें ।
मातें त्या दिवशीं खरेंच कथितों चित्तीं बरें वाटलें ॥
केला त्यावरि यत्न फार जनकें शाळेंत घालावया ।
मी उत्सृंखल जाहलों म्हणूनियां तो सर्व गेला लया ॥

९

जुगारी लोकांशीं मदिय जडला स्नेह बरवा ।
कुणाच्या भीतीची मनिं न धरिली हाय ! परवा ॥
तुटे मत्ताताचा तिळतिळ खरा जीव बहुधा ।
मला दुर्भाग्याला कधिं न रुचली तद्वचसुधा ॥

१०

प्रथम मजसि झाले लाभ मोठ्या धनाचे !
मदिय मुखिं मद्याचें लागलें बोट साचें ॥
हळुहळु व्यसनाचें वाढलें तें प्रमाण ।
खचित अगदिं नाहीं राहिलें कांहिं भान ॥

११

"बाळा नाहीं व्यसन बरवें द्यूत खेळावयाचें ।
याच्यापायीं बघ हरपलें राज्यही पांडवांचें ॥"
वृद्धा माता बहुत शिणली बोलुनी बोधवाणी ।
म्यां मूर्खानें अवगणुनि ती घेतली नाहिं कानीं ॥

१२

सहन करुनि भारी कष्ट माझ्या पित्यानें ।
जमवुनि मजसाठीं ठेविलें द्रव्य त्यानें ॥

अतिशय मतिमंदें म्यां किती दुर्विचारें ।
हर ! हर ! हरवीलें अल्प काळांत सारें ॥

१३

निंदिती सकल लोक अम्हांला ।
वाटली मुळिं न खंत मनाला ॥
नावडे सदुपदेश कुणाचा ।
"खोल पाय शिरतो बुडत्याचा ॥"

१४

जनक जननि कंठीं प्राण आले तरी हीं ।
मजकडुन न सेवा जाहली अल्प कांहीं ॥
दिवसभर कधीं मी सत्य गेहीं न येई ।
सदनिं मग तयांची काळजी कोण वाही ॥

१५

दोघांनींही मरणसमयीं बोध केला हिताचा ।
मातें नाहीं मुळिंच कळला अर्थ कांहीं तयाचा ॥
पाषाणाच्या वरि जरि बहू वर्षले मेघ वारी ।
तेथें बीजांकुर न उगवे एकही सौख्यकारी ॥

१६

आतां मला धाक न तो कुणाचा ।
माझा खरा मीच धनी मनाचा ॥
आपत्तिच्या खोल दरींत मातें ।
दुर्दैव तें ओढुनि नेत होतें ॥

१७

यश येत नसे, धन जात असे ।

मजला भरलें परि सत्य पिसें ॥
मग होइ पराङ्मुख हाय ! कसा ।
रुतला जलिं मीन गळास जसा ॥

१८

जवळिल धन माझें सर्व गेलें जुगारीं ।
मदिय रमणिचेही दागिने फार भारी ॥
रडुनि रडुनि केला फार आकांत तीनें ।
उलट तिजसि म्यांची मारिलें दुर्मतीनें ॥

१९

घरें दारें सारीं विकुनि धन मी तोंहि हरलों ।
तदा गेले स्नेही त्यजुनि मजला मीच उरलों ॥
कुणालाही चित्तीं मम कळवळा येइ न कधीं ।
नकोसा हा झाला खचित मजला जीव अगदीं ॥

२०

जिथें जातों तेथें बहुत अपमानास सहतों ।
विषाच्या वृक्षाची कटु फलरुची घेत असतों ॥
उभेही दाराशीं मज न करिती आप्त जन ते ।
कशाला मी देऊं उगिच तुजला दोष जनते ॥

२१

मी पाहतों मित्र सुखांत लोकीं ।
विद्यार्जनाचें फल तें विलोकीं ॥
म्यां घेतला जो करुनी अपाय ।
आतां नसे सत्यचि त्या उपाय ॥

२२

विनती मम ही जननीजनकां ।
बहु संततिचा करुं लाड नका ॥
पदरीं जडतो हितशत्रुपणा ।
नच शब्द असे मम त्यांत उणा ॥

२३

लाडाचा परिणाम काय घडतो माझ्यावरूनी पहा ।
द्यूताच्या व्यसनावरून मम या कीं शाहणें सर्व व्हा ॥
आहे शिक्षक शिष्य पालक जनां मद्वृत्त हें बोधक ।
लाडाचा परिणाम फार घडतो भावी सुखा बाधक ॥

# ‘ समस्या–पूर्ति ’

समस्या १ ली

बाहूंनीं दृढ आवळूनि सखिला सप्रेम सौधस्थळीं ।
नेतांना गळती सुमें कचकलापांतून तीं भूतलीं ॥
सोडुनी पद-धारणा कविसुता पाहे रसज्ञाकडे ॥

× × ×

१ कीं ही कैंवि सुवर्णपुष्प रचना होईल आतां गडे ! ।
२ “टाकोनी कुसुमें” वदे “न पुढती हें योग्य जाणें गडे”॥
३ देवा ! स्वामिनि-नायका ! हरिहरा राहे तळीं बापुडे ॥

---

समस्या २ री

थोडा वेळ विचारमग्न बसलों ठेवूनि मी लेखणी ।
कांहीं आठवतांच ती हरपली मत्काव्यसल्लेखनीं ॥
होती सन्निध मत्प्रिया तिजकडे म्यां पाहिलें सस्मित ।

× × ×

१ तों ती हांसत बोलली मज गडे ! नाहीं बरें माहित !
२ झाली विस्मित ती कपोलिं मग ये तीच्याहि मंदस्मित
३ पारीजातकसें ? मशीं मज दया ! दे वासुदेवांकित ।
४ तीनें देखुनि, मद्विचार ग्रथितां, मी जाहलों विस्मित ॥

---

१ तिवारी २ विठ्ठल कृष्ण नेरूरकर ३ स्वामिराज वासुदेव उपाध्ये
४ श्रीदत्त

# 'भावगुप्त चतुष्टय'

—— ❋ ——

शिखरिणी.

१

प्रभातीं स्नानातें करित असतां कामिनि कुचां–
करानें मर्दी कीं, मृगमद निघो पूर्वनिशिचा ॥
परी पाही जेव्हां तरुणि निजवक्षीं क्षणभरी ।
वदा? नीला कांती नसुनि विलसे कां क्षण उरी?॥

२

अपर्णा जैं द्यूतीं वृषभ विधु कृत्ती नग, गणा ।
हरी शंभूच्या ती सकल विषया चारुवदना ॥
कपोलीं हास्यातें मृदुल करुनी कां मग तदा ।
जटाजूटीं प्रेक्षीं तदिय मज हेतु झणि वदा ?॥

३

हरार्धांगीं अंकीं वरुनि शिव लीला सुविमला–
करी; प्राशी जेव्हां हिमनगसुतेंदूस सकला ॥
तईं अंबेच्या त्या निटिलिं पडती वारि कण ते ।
सरोषानें कां ती त्रिपुरहरमूर्ध्नि निरखिते ॥

४

करी गौरीकांत क्षुभितनयनें भस्म मदना ।
मनीं दुःखी हो कां मधु, निजकरें झांकि नयना ॥
विधूशीं दावीना निजमुख तया काय गमलें ।
तुम्ही सांगा मातें मनिं सुकवि हो शोधुनि भलें ॥

——

# ‘ पिकान्योक्ति ’

शिखरिणी

१

पिका ! तूं आम्राला त्यजुनि वरिलें अन्य तरुला ।
तिथें आरंभीली श्रवणमधुरा गायनकळा ॥
अयोग्य स्थानीं त्या तुजसि जनता दोषिल बरें ।
“निजस्थानत्यागी बुधहि उपहासास्पद ठरे ॥”

२

उडोनी तूं जातां तरुवरुन या गायक भला ।
उठे या काकांचा ! कटुतर किती हा गलबला ॥
तयांचा खंडाया मद खगवरा ! येइल कुणा ।
“जिथें नाहीं विद्वान् शठ करि तिथें पंडितपणा ॥”

३

यदा आलापांचा तव मधुर तार स्वर चढे ।
फिका ! होई गानध्वनिहि बहुतांचा तुजपुढें ॥
तुझ्या त्या गानातें श्रवुनि बसती स्वस्थ खग ते ।
“बघोनि विद्वाना बडबड शठांची न उरते”॥

४

तुझ्या ठायीं नैसर्गिक रुचिर जो सद्गुण वसे ।
जयानें तूं येथें रसिक जनता मोहित असे ॥

तयाचा त्वच्चित्तीं दिसुनि नच ये गर्व अगदीं ।
" गुणांच्या गर्वानें फुगत नसती सज्जन कधीं " ॥

५

वसंताचा आला समय नच तो ! जोंवरि पिका ! ।
गड्या ! कंठीं कोठें दिन तंववरी राहुनि मुका ॥
समस्तांना वाणी विदित तव आहे रसवती ।
" प्रसंगावांचूनी सुरस वचही फोल ठरती" ॥

६

खरी मैत्री आहे प्रियतम वसंतीं तव खगा ! ।
तयावांचूनीयां वच न वदतां राहशि उगा ॥
वनीं नानापक्षी असुनि तव मैत्री नच घडे ।
" बुधस्नेह-प्रीति खचित बुधलोकांसह जडे " ॥

७

नभीं बद्धश्रेणी करुनि खग जाती उडतसे ॥
कुणाच्या संगें तू परि न उडतांना दिसतसे ॥
कुठें त्यांचा मोठा कलकल तुझी गानपटुता ।
"घडे ना सन्मैत्री विषम गुणशीलत्व असतां ॥"

८

तुझ्या वर्णानें जे सहज तुजला ' काक ' वदती ।
विकारानें ते ते जन तुजकडे व्यर्थ बघती ॥
विकाराची तूतें परि न उठते एक लहरी ।
" स्तुती निंदा यांची क्षिति निजमनीं सूज्ञ न करी " ॥

# " विरह-तरंग "

—०*०—

पृथ्वी वृत्त

१

उगाच बस कोकिला ! मजसि ताप देऊं नको ।
नको मलयमारुता ! मजकडेच वाहूं नको ॥
भरे मदनसंज्वर प्रबल ताप देई मनीं ।
कसा अजुनि येइना तरिहि जीविताचा धनी ॥

२

प्रयाण-समयीं प्रिया ! पुसुनि माझिया आसवां ।
वदे "खचित येइन प्रिय अशा वसंतोत्सवा ॥
परोपरि मला गृहीं वदुनि जाय तूं निर्मला ।
तुझा विरह एक एक दिन मोजुनी कंठिला ॥

३

सखीजन मला म्हणे 'चल सरो ! वसंतोत्सवा' ।
वसंत मम तूं नसे मग कसा रुचे तो सया ! ॥
मुखीं न वदलें परी बघुनि त्या मला कष्टती ।
खरीच हृदयस्थिती उमटते मुखीं स्पष्ट तीं ॥

४

वहात असतां बरा पवन आम्रराजींतुनी ।
करीत असतां पिक स्वकिय पंचमाचा ध्वनि ।

करीत असतां सुमीं भ्रमर मंजु गुंजारवा ।
नव प्रणयिनी अहा ! हसत चालल्या उत्सवा ॥

५

त्वदागमन होइल प्रियकरा ! असें जाणुनी ।
तुझी बहुत वाट मी बघितली गृहीं या दिनीं ॥
त्वदर्थ कुसुमें नवीं वरुनि हार हा गुंफिला ।
कळे न हृदयेश, तूं मम कुठें तरी गुंतला ॥

६

कदंब तरु हालती मधुलता डुले मालती ।
सदाम्रतरु डोलती लवुनि येत ते खालती ॥
असे समय योग्य हा प्रणयसेव्य कामीजनां ।
खरोखर तुझ्याविना जग उदास वाटे मना ॥

७

फुले बकुलही डुले मधुप तत्सुगंधें भुले ।
गळे सु-रस त्यामुळें जल सु-रक्त होई बळें ॥
चराचर जगा असा सुखद काल हा मोहवी ।
कितीक तरि वर्णुनी जगतिं यास गेले कवी ॥

८

सदाम्रतरुमंजिरी मधुप सेवुनी सत्वरीं ।
यथेच्छ मधुपान या सुसमयीं तिचें तो करी ॥
सरोजिनिसभोंवतीं फिरतसे पहा हंसही ।
कुणीतरि पडेल कां प्रियजनीं वृथा संशयीं ॥

९

दुरुनि बघतांच किंशुक मनोज्ञ जो वाटला ।

१८००

नितांत वनदेविच्या निटिलिं कुंकुमाचा टिळा ॥
भला शुकहि त्यावरी उडुनि येउनी बैसला ।
समान जन संग हा मजासि वटतो जाहला ॥

१०

न ये तरुणता पुन्हां प्रणयकामुकांनों कधीं ।
कधी मदनदूतिका मधुर कोकिला वाक्सुधी ॥
तुझ्या श्रुतिपथा सख्या ! अजुनि येइना कां ध्वनी
नको उगिच घालवूं समय योग्य येई क्षणी ॥

११

निदाघ परितप्त तूं परतशी गृहीं य.वया ।
सशीत उपचार मी करिन शांतवाया सया ! ॥
दृढ-प्रणय-बंधनें मग परस्परां शांतवूं ।
कथुनि विरह-व्यथा हृदय पूर्ण संतोषवूं ॥

१२

असे किति विचार मी प्रतिदिनीं मनीं योजितें ।
अनागमन हें तुझें विफलता बहु आणितें ॥
असे खचित दुर्बला जगतिं मानवाशा जरी ।
तिच्याच परिबंधनें सकल मोहती अंतरीं ॥

१३

जसा गगनचंद्र हा कुमुदिनीप्रती तोषवी ॥
तुझा वदनचंद्रमा मजासि सर्वदा तोषवी ॥
नभीं उदय पावतां दिनकरप्रभा पद्मिनी ।
खुले प्रतिदिनीं तशी तुजासि पाहुनी भामिनी ॥

१४

तुझा उगवला जरी वदनचंद्रमा सोज्वल ।
दिसेल गृह दिव्य हें अनुपम प्रभापेशल ॥
तयाविण न शांति या मम मनश्चकोरा कधीं ।
कधीं निघुनि जाय हा निरस दीर्घकालावधी ॥

१५

अगा ! प्रणयवल्लभा ! दिन कसातरी जातसे ।
परंतु रजनी अहा ! परम दुःसहा होतसे ।
दिसे शयनगेह तें सकल शून्य जातांक्षणीं ॥
न शांति लवही मिळे रुचिर वस्तुही लक्षुनी ॥

१६

निशीं पडुन राहतें कठिण भूमिशय्येवरि ।
बळें नयन झांकिनें मुळिं न झोंप येई परी ॥
तुझी मदनमूर्ति जी हृदय-मंदिरीं या वसे ।
मदीय नयनांपुढून न कधीं अहा ! जातसे ॥

१७

करी मधुनि किर्रसा रजनि कीटकांचा ध्वनी ।
उलूक खगही करी भयद शब्द 'घूं घूं' वनीं ।
निशासमय घोर तो सकल मेदिनी निद्रिता ॥
असे परम दुःखिता सदनिं मात्र मी जागृता ॥

१८

तनु क्षणहि राहिना स्थिर मदीय एका कुशीं ।
सदा तळमळे नसे म्हणुनि एकजागीं उशी ॥
विचिंतन करास या उचलतें पुन्हां टाकतें ।

सबाष्प नयनद्वयां उघडतें पुन्हां झाकतें

१९

कुठें हळुच वाजतां चकित होउनी पाहतें ।
कुणी सहज बोलतां श्रवण देउनी ऐकतें ॥
सशंक बघतें कुणी फिरूनि पाहिलें कां मशीं ।
कशी अहह ! जाहली भ्रमित वृत्ति माझी अशी ॥

२०

पुन्हां परततें हळू पद न वाजवीतां अशी ।
गृहीं मम फिरावया मजासि होय चोरी जशी ।
निराश मन होउनी शयनिं येउनीयां पडे ।
जशी वनचकोरिणी झुरझुरूनि दुःखीं बुडे ॥

२१

कपोल करिं ठेवुनी करि विचार मी सारखा ।
तुझ्यासम न की जगीं ठक दुजा मनोहारका ॥
मनास कळतें जरी सकळ तेंच कापट्य या ।
धरूनि बसतें तुझ्या जवळि मंदिरीं हट्ट या ॥

२२

विचार असला करीत मज झोंप येई जरी ।
तुझी रतिपटो ! किती पडाति गोड स्वप्नें तरी ॥
कधीं हंसतसें कधीं रुसतसें कधीं गातसें ।
कधीं उठतसें मधें दचकुनीहि निंदीतसे ॥

२३

अगा ! हृदय-वल्लभा ! मदनसुंदरा ! प्रेमळा !
कुठें विरमला मला ठकवुनी प्रिया निर्मला ! ॥

असें म्हणुनि बैसतें कर करावरी ठेवुनी ।
कुठें तरि विशून्य या सजल दृष्टितें लावुनी ॥

२४

उषासमय जाहला उडतसे खगांची तती ।
स्त्रिया रमणबाहुंत हळुहळू पहा सोडिती ॥
असें शयनिं मी इथें बसुनि ही जशीच्या तशी ।
निशा प्रबल तापिनी मजसि जातसे ही अशी ॥

२५

जरी मदिय दूतिका सहज मंदिरीं पातली ।
त्वदागमनसूचक-श्रवणरम्य वार्तावली—
कथील म्हणुनी समुत्सुक तिच्याकडे पाहतां ।
करी मज अभागिनी प्रतिदिनीं निराशान्विता ॥

२६

करील तनुदाह ही शमित चंदनाची उटी ।
म्हणूनि तनु चर्चुनी उपवनीं फिरें एकटी ॥
करी न किमपी कमी उलट दाह ती वाढवी ।
'सुखांत भवितव्यता म्हणति येतसे आडवी ॥'

२७

'सुधाकर' कसे विधो म्हणति लोक सारे ! तुला । ?
विषागराचि भाससी उदय पावतांची मला ॥
न ये उगिच योग्यता जगतिं नामरूपें कुणा ।
मला हृदयिं ना गमे लवहि बोध हा वा उणा ॥

२८

समस्त विषवृक्ष कां उपवनांत या लाविले । ?

किती तळमळे अहा ! हृदयपुष्पगंधानिलें ॥
वनींहि विमनस्कता मजसि मोहवी यापरी ।
भ्रमिष्ट असते स्थिती अहह ! कामुकांची खरी ॥

२९

समुच्छ्वसित हृद्व्यथा शमविनां उपायें बहू ।
शरें मदन विंधितो असुखयुग्म कैसें सहूं ॥
मनःस्थितिहि ही कुणा जवळ सांगतां येइना ॥
सलज्ज असती जनीं प्रकृतिसिद्ध कीं अंगना ॥२९॥

३०

वसे मदन हा जणों हरित आम्रवृक्षावरी ॥
करूनि मधुपंक्ति 'ज्या' कुसुम सायकातें त्वरी ॥
करी सतत वृष्टितें अदय हाय ! देहावरी ।
विलज्ज अबलेवरी अहह ! शस्त्र कैसा धरी ॥

३१

अरे ! अधम मन्मथा ! कुसुमसायका ! निर्दया ! ।
जनास परिपीडितां मनिं न लेखिशी तूं भया ॥
मलाच परिताडिशी प्रियकरा न कां पीडिशी ।
उगाच विरहानलीं मजसि कां बरें पाडिशी ॥

३२

कितीक प्रणयीजनां त्वदिय ताप हा पोळवी ।
वियुक्त युवतीजनां विरहपावकीं लोळवी ।
कुठेंहि मन ना रमे प्रिय न कांहिंही तें गमे ।
स्मशान सुरसद्मनापरि गमे प्रिया संगमें ॥

३३

सुवृक्षपरिवेष्टिता मधुलता सुमालंकृता ।
बघूनि हसती जणों अदयता स्वदंगीकृता ॥
सुमंजिरिमिषें सहाय तरि आम्र कैसा करी ।
असे अहह ! निर्दया पुरुषजाति लोकीं खरी ।

३४

नसे जवळि तूं सखा मदिय जाणुनी अंतरीं ।
तिथून वळलें जरि तनुसि सोडिना तो तरी ॥
असे शयनिं भोजनीं कुसुमचापधारी उभा ।
वितेज मुख जाहलें उतरली तयाची निभा ॥

३५

तनू वरिल भूषणें सकल काढुनी ठेविलीं ।
गळ्यामधुनि तत्क्षणीं कुसुम मालिका काढिली ॥
नको बकुलमंजिरी म्हणुन दूर ती फेकिली ।
परी न लवही मला हृदय शांतता लाधली ॥

३६

सशीत जलनिर्गमीं धवलमौक्तिकाचे परी ।
तुषार बहु घेतले बसुनि तेथ आंगावरी ॥
मदीय वसनें जरी भिजुनि चिंब झाली तरी ।
मला न विमनस्कतेंत कळलीं परंतु खरी ॥

३७

मनास रमवूं जरा क्षणभरी असें योजुनी ।
प्रबद्ध शुकसारिकेजवळ पातलें येउनी ॥

अधोवदन होउनी नयन आपुले झांकिती ।
खगांतहि दिसून ये प्रियसहानुभूति किती ॥

३८

तुझा रसिक हा असे जवळ गे ! सखे सारिके
तुला सकळ सौख्य तें मिळतसें मनासारखें ।
तरीहि मज दुःखिता बघुनि कष्टशी साजणी ।
तुझी सदयता बघून बहु तोषलें मी मनीं ॥

३९

पयोधर सख्याविना तटिनि ही दिसे व्याकुळा ।
प्रवाह तनुशुष्क हो मलिन देहही जाहला ॥
बघूनि समदुःखिता जवळ जाउनी बैसल्यें ॥
तदा नयनबिंदू हा खळखळा जलीं वाहिले ॥

४०

तुझ्यासम कितीकदा प्रियकरा इथें पातलें ।
सशीत जलबिंदुनीं कितीकदा तुला स्नापिलें ॥
मला स्मरण होउनी सुखद काळ तो आठवे ।
परंतु तुजसी कसा विरहकाळ हा कंठवे ॥

४१

पुन्हा उडवितां तुवां सलिल बिंदु माझ्यावरी ।
"पुरे प्रियकरा ! पुरे"–म्हणुनि आर्जवी त्यावरी ।
तुवां न परि ऐकतां तुजवरी बळें कोपुनी ।
रुसून बसलें इथें फिरवुनी मुखातें क्षणीं ॥

४२

तदा जवळ येउनी हंसवुनी विनोदें सया ! ।

हळुच पुसिलें मुखावरिल बिंदु ते माझिया ॥
अजी फिरफिरूनि ही निटिल-घर्मधारा गळे ।
न मूर्ति परिमार्जना तव मनोहरा! आढळे ॥

४३

जिच्या परिमळें दिशा दरवळे मना तोषवी ।
वरूनि मधुमालती कचकलाप संभूषवी ॥
तुवां प्रथम त्या दिनीं निजकरें जशी घातली ।
तशीच कबरी असे अजुनि मुक्त ना जाहली ॥

४४

मुखावरि तयामुळें अलक येति हे वाकुडे ।
नसे मुळिंच चित्त हें परि मदीय त्याच्याकडे ॥
कुणास्तव करूं बरें रुचिर सर्व शृंगार तो ।
न हंस तरि पद्मिनी परिविकास हो व्यर्थ तो ॥

४५

सुमग्रथित जाहली शिथिल सर्व धम्मिल्लिका ।
गुणत्रुटित जाहली गलित कंठ सन्मालिका ॥
गळून कटिमेखला सरकते नितंबावरी ।
तुझ्याविण वद प्रिया! कवण येउनी सावरी ॥

४६

उशीर मज जाहला क्षणहि यावया मंदिरीं— ।
—तुला न सहवे कसा विरह हा सहे अंतरीं ॥
न विप्रिय तसें घडे मजकडूनही कारण ।
"कठोर असतें स्त्रियांहुनि खरें नरांचें मन ॥"

४७

असे मदिय जीवित प्रियकरा! तुझ्या आधिन ।

[illegible] माधिन ॥
सतीस पतिवीण दैवत दुजें नसे सर्वथा ।
असें वदति जें महापुरुष तें नसे नान्यथा ॥

४८

मनोहर तुझी हृदीं प्रिय सुमूर्ति आणून मी ।
मनःसुमन वाहुनी परमपूज्य भावें नमी ॥
कधीं नयनिं ती दिसे मजसि पाहण्या सर्वथा ।
कळे न सखया ! कधीं शमित होय ही हृद्व्यथा ॥

४९

सख्या ! तव मनोहरा वपु शिलातलीं रेखुनी ।
त्वदंगिकृत मत्तनूविरचना करी मोहुनी ॥
भरूनि मम कंठ ये नयनपूर ये दाटुनी ।
उदास बसलें तदा सकल लेखना टाकुनी ॥

५०

नियुक्त अभिसारिका प्रियकराकडे जातसे ।
विलाससुख सेवुनी परत ती गृहीं येतसे ॥
निवास असता तुझा विदित सत्य मन्मानसा ।
प्रवृत्त असते अशा तरि करावया साहसा ॥

५१

सुरम्य अभिसारिकासमचि वेष तो घेउनी ।
अशा घन तमांतही तुजसि भेटतें येउनी ॥
जरी प्रियविना पथीं कुणिहि पाहुनी एकटी ।
कटींतुनि कट्यार ती उपसते तदा धाकुटी ॥

५२

अजी मम पुनःपुन्हा सजल वामनेत्र स्फुरे ।

सकंप उरु होतसे त्वदिय मूर्ति नेत्रीं फिरे ॥
कलध्वनि करी गृहापुढति येउनी चातक ।
त्वदागमन सूचकें गमति सर्व नैसर्गिक ॥

५३

मला बघुनि सारिका करितसे बहु नर्तन ।
तसाच शुकही करी त्वदियनाम संकीर्तन ॥
मयूर निजपुच्छही उभवुनी किती नाचतो ।
नवीन शुभसूचकें बघुनि हर्ष हा सांचतो ॥

५४

करी बहुत दुःख तों प्रिय तिचा तिथें पातला,
अकस्मिक विलोकुनी हरिख अंतरीं दाटला ।
परस्पर दिली अहा ! सुखद गाढ आलिंगनें
कवीस न अतां पुढें करवतील तीं वर्णनें ॥

---

# " यशोगायन "

### कथानक

श्री० राघोबादादा पेशवे यानीं इ० स० १७५८ च्या सुमारास पंजाबावर स्वारी करून काबूलचा अमीर अहमदशहा अबदाली याच्या ताब्यांतील पंजाब प्रांत जिंकून घेतला. व त्यावर मल्हारराव होळकर, दत्ताजी शिंदे व महादजी शिंदे यांस ठेवून ते परत पुण्यास आले. अबदालीनें नजिब खानाशीं संगनमत करून त्यास पूर्वेकडून स्वारी करण्यास सांगितलें व आपण पश्चिमेकडून चाल करून निघाला अशा रीतीनें त्यानीं मराठ्यांची कोंडी केली. हे डावपेंच ओळखून मल्हाररावानें दत्ताजी शिंदे ( यास तेंव्हां पाटील म्हणत ) व त्याचा धाकटा भाऊ महादजी या दोघास पूर्वेकडे नजीब खानावर पाठविलें व तो स्वतः अबदालीशीं सामना देण्यास राहिला. दत्ताजी शिंद्यांनीं आपल्या मर्दुमकीची शर्थ केली. पण शत्रूचा जमाव भारी, म्हणून यश येईना. बरोबर नऊ महिने पूर्ण भरलेली बायको, पावसाळा सुरु होऊन यमुना नदी दुथडी भरलेली, व नजीबखानानें दाणावैरणाचे रस्ते रोखून धरलेले अशा बिकट परिस्थितींत जयाची आशा करणें व्यर्थ म्हणून बरोबरीच्या माणसांनीं शिंद्यास पुष्कळ सांगून पाहिले पण रणांगणावरून परत फिरणें ही गोष्ट त्या मानी वीरास कशी रुचणार ? पुण्यास नानासाहेबांस माझ्या पिछेहाटीचे

वर्तमान कळल्यास ते मला काय म्हणतील या विचारानें त्यानें ' मारीन किंवा मरेन ' असा निर्धार करून यमुनेच्या घाटावर जोराची लढाई दिली. तींत तो शेवटीं जखम लागून पडला असता नजीबखानास ती बातमी लागून तो तेथें आला. जेव्हा रक्तानें माखलेली, हातांत तरवारीची मूठ घट्ट धरलेली शिंद्याची ती भव्य मूर्ति त्यानें पाहिली तेव्हां त्याचे प्राण कंठीं आले होते अशा वेळीं नजीबखानानें त्यांस व्यंगोक्तीनें विचारिलें कीं " क्यों पटेल अभि कभि हमसे लडेंगे " तें ऐकून लागलींच " हां ! बचेंगे तो और भी लडेंगे " असें खऱ्या मर्दाला साजेल असेंच उत्तर शिंद्यांनीं दिलें. तें सहन न होऊन मराठे १ कोट रुपये देत असताही त्यानें क्रूरपणानें दत्ताजीचें डोकें कापले. दत्ताजीची बायको एका रजपूताच्या किल्ल्यात आश्रयास राहिली. महादजीस असाध्य जखम लागल्यामुळें त्यास सेवकानीं समरांगणातून नेलें. पुण्यास सदाशिवरावभाऊस ही हकिकत कळल्यावर त्यास फार राग आला. त्यानी नजिबखानाचे डोकें मारण्याची प्रतिज्ञा केली व ती इ० स० १७६१ सालीं शेवटास नेली. तोच कथा भाग पुढील पद्यांत आढळून येईल.

# " यशोगायन "

१

ज्या राघूची बघुनि भरारी शत्रु सदा स्वमनीं ।
दंभस्पर्धाहीन होउनी सिद्ध असति नमनीं ॥
महाराष्ट्राच्या पुण्य उपवनीं वृक्षकोटरांत ।
वसे बंधुसह राज्यतरूचीं फळें मधुर खात ॥
पंजाबावरि घेई भरारी झुंजति अरि सर्व ।
निजभुजपक्षयुगानें हरि खगयवनांतरगर्व ॥
मल्हारी दत्ताजी आणि महादजी यांना ।
संरक्षाया ठेवी तेथें परतुनि येतांना ॥
निशाण डंके वाजत गाजत ते फिरले मागें ।
दुराणिचा द्वेषाग्नि धुमसुनी अंतरांत जागे ॥

[ चाल ]

अहमदशा क्रोधें दाटे, नजीबा भेटे, पसरण्या काटे ।
अपजयें बुद्धि वावरते ॥
सूडाची आशा उरते ।
राजनीति कुटिला ठरते ॥
समरपरीक्षा दावी ऐशा काळीं जो गाजी ॥
दत्ताजीचें यशोगायन प्रिय होतें आजी ।

२

पश्चिमभागीं अवदल्ली ये नजिब पूर्वभागीं ।

कोंडुनि धरिले सर्व मराठे तैं अंतर्भागीं ।
मल्हारी नच गडबडला परि पाहुनि यवनांना ।
क्रोधावेशें तरंग आले तच्चित्तीं नाना ॥
"पदतलि रगडिन उपटुनि मारिन तुज नीतिभ्रष्टा ।"
मद्हृदयांतील तूंच खरा कष्टद कंटक दुष्टा ! ॥
मृगपति वृद्ध बघुनि कां कोल्हा ! येशी धावोनी ।
तरि खरतर–तन्नखर–विक्रमा पळशी पाहोनी ॥
दत्ताजी महादजी जाउनी नजिबाशीं गांठा ।
पंजाबाच्या अडवुनि त्याच्या भुलवाव्या वाटा ॥
आर्यभूमिला कां छळितोसी उगाच तूं यवना !
भगवा झेंडा अजुनि न दिसला त्वदिय काय नयना ॥
आर्यसुतांचे उंची भाले तीव्र कसे असती ।
असती त्वज्ज्ञातीचे पूर्वज तरि साश्रू कथिती ॥
पाटिल बोवा ! उठा ! महादजी सजवा बिजलीला ।
डुलतिल जीर्णें नाना ऐशी करूं समरलीला ॥ "

[ चाल ]

चमुसागर तैं खळबळे, वीररस गळे, उचलिले भाले ।
युद्धाची नौबत झडली ॥
योद्धयांची तनु फुरफुरली ।
विजयोन्मुख सेना सजली ॥
चढला भगवा झेंडा गजाशिरिं खिंकाळति वाजी ।
दत्ताजीचें यशोगायन प्रिय होतें आजी ॥

३

दत्ताजी तो सान बंधुतें उपदेशी प्रेमें ।

कीं त्वां अपुल्या वहिनीसह बा ! निजसदना जावें ।।
जननिपयःपानें तव हे बा ! ओष्ठ आर्द्र दिसती ।
रणांगणीं या कोमल तनुची होईल कीं माती ।।
दादा ! ऐशा विपत्समयिं मी सोडुनि तुम्हासी ।
गृहीं जाउनी साधु तरी हो ! कवण्या अर्थासी ।।
बाबा मज हंसतिल म्हणतिल मत्पुत्र न हा नीच ।
समरभयानें जो करि कुलकीर्तींची हानीच ।।
वीरपुत्र हा नजिवा धरुनी युष्मत्पदिं दादा !
विनत करिन वा स्वर्गीं जाउनि वंदिन निजताता ।।
रणांगणीं मत्समर चमत्कृति अवलोका तुम्ही ।
"रणिं जय मरणार्थेचि जन्मतसों क्षात्रकुलीं आम्ही ।।"
जिवंत राहूं तरि स्त्रीपुत्रां अवलोकूं नयनें ।
किंवा होवो तत्क्षण हो ! तच्छुभ दैवानें ।।

[ चाल ]

ऐकूनि कंठ गहिंवरला, जवळि तो केला, उरासी धरिला ।
वदतसे अहा तूं बाला ।।
जन्मुनी धन्य जगिं झाला ।
आजि लाजविलें बंधूला ।
त्यां तर वरिलें वाण सतीचें धीर करिन आजी ।।
दत्ताजीचे यशोगायन प्रिय होतें आजी !

४

यवन-कटक-भट-युत यमुनातट निरखिति रणधीर ।।
परतीरस्थ द्विषदांसह ते झुंजति परवीर ।।
जयमाला जन्हुजा करीं जणुं आंदोलन पावे ।

नजीब दत्ताजी शिरकमलें डुलति विजयभावें ॥
कपटानें नजिबानें तेथुनि सैन्य दूर नेलें ।
दत्ताजीचे धान्यमार्ग ते अडवुनि धरियेले ॥
अन्नावांचुनि प्राण तळमळे कठिण समय आला ।
यमुनेमध्यें टाकुनि घोडे परतीरीं गेला ॥
नाना युक्तींनींही शत्रू पराजित न होई ।
दत्ताजी बैसला हटूनी परतुनि नच येई ॥
गर्भवती स्त्री असुनि बरोबर; वर्षाऋतु आला ।
यमुनातटही पांडुर सलिलें पूर्ण अहा ! भरला ।
चला जाउं ही वेळ न राया ! अनुकुल विजयासी ॥
परिजन वदतां बोधित असतां बोले तो त्यांसी ।
"चिमणाजी बाजी हे प्रभु मज वरुनी हंसतील ॥
वसई दभई रणविस्मृति कां झाली म्हणतील ।
भाऊंचें भूभ्रमण घडलाचि विन्मुख पाहूनी ॥
पदहि न मागें सरे कदापी मी अवमानोनी ।"

[ चाल ]

तूं धन्य ! धन्य ! दत्ताजी, असासि रणगाजी आर्यभूमाजी॥
तव जन्मदात्रि हो धन्य ।
त्वत्पिता असो कीं धन्य ! ॥
त्वत्कुलही हो बा ! धन्य ! ।
जनन मरण वीरांनों तुमचें होय याच काजीं ॥
दत्ताजीचें यशोगायन प्रिय होतें आजी ।

५

"भगवा झेंडा फडकाविन मी शिवबाचा आजी ॥ "

किंवा ठेविन म्हणे देह हा आज रणामाजी ।
या आर्यसुताच्या समसेरीचा प्रभाव अवलोकीं ॥
रहविन नजिबा ! तव पूर्वज मम हंसविन परलोकीं ।
उठा ! गजाशीं अंदुक घाला ! फिरवा ! शिरिं ढाला ॥
आजि पहावें दत्ताजीच्या अनुपम शौर्याला । "
खळबळलें चमुमंडळ सारें हृदयबंद तुटले ॥
हृत्सर समरोत्साह-जलानें तुंबुनियां फुटलें ।
चर्मवश्मिकांतुनि सरसर वर खड्ग भुजग आले ॥
परनर निजगर-युक्त कराया सिद्ध जणूं झाले ।
पत्नीला भेटण्यास गेला पटसदनीं धीर ॥
अंगुलपृष्ठ-कपोल-धृतेचें गळे नयननीर ॥
पाहुनि पतिशीं लगबग उठली पुसी अश्रुबिंदू ॥
धीर विचारी मलिन आज कां ? तव मुख-पूर्णेंदु ।
फुटला दु:खाब्धि तज्जल नयनाश्रूंच्या धारा ॥
झर झर वाहुनि उत्तरीयपट भिजुनि चिंब झाला ।
प्रिय पतिच्या कंठीं निजकंठा घालुनि स्फुंदे ती ॥
प्रेमभरेंची धीर विकळ होउनि दु:खीं बुडती ।
"रिपुमर्दनसमयीं त्वां मजला प्रोत्साहन द्यावें ॥
त्याच अशा कां संगरसमयीं रुदन तुझें व्हावें ?"
वदे सती ती "कळे न मजला मन कां बावरतें ॥
अंतरतें चरणांतें गमतें अंतर घाबरतें" ।
वीरोचितभाषणें शांतवी निजभार्या धीर ॥
तों येउनि महादजी करितसे प्रणाम तो वीर ।
आलिंगुनि ते परस्पराशीं रणांगणीं आले ।

रणवाद्यें वाजती पुढें तो सैनिकगण चाले ॥
[ चाल ]
पातले मराठे वीर । धीर गंभीर । चपल परवीर ।
॥ यवनही धांवुनी येती ॥
॥ निजशस्त्रें ते सांवरिती ॥
॥ ज्या लव न रणाची भीति ॥
उठले हरहर महादेव रव दीन रणामाजी ॥
दत्ताजीचें यशोगायन प्रिय होतें आजी ॥५॥

६

खड्गांचा खणखणाट झाला शर सणणण येती ॥
भाल्यांचा कचकचाट उठला वीर कितिक पडती ॥
जयमरणावांचुनि जे नेणति वीर रणीं त्यांनीं ॥
धडमुंडांकित धरणी केली क्षणांत शस्त्रांनीं ॥
नजीब ताजी टोळी घेउनि चवताळुनि आला ॥
भाल्यांच्या त्या फेकी अडल्या दीन शब्द झाला ॥
टांच देउनी बिजलीला तों महादजी वळले ॥
उसळुनि अडवुनि भुलवुनि त्यातें कमरग्यांत शिरले ।
उठला हरहर महादेव रव ओष्ठिं ओष्ठ भिडला ॥
बिजलीची अन्वर्थ चपलता कथवेना कविला ॥
बिजली हिंसली शिरली नभलीला गमली तीची॥
कुठें झळकली कुठें थरकली लपालि कुठें साची ॥
पाहुनि एकाकी त्यावरि ते धावुनि रिपु आले ॥
तद्रक्षण करण्यास्तव फिरले कितिक पाथिक भाले॥
गजकेतूवर असंख्य रिपुगण धावुनियां येती ॥

दत्ताजीच्या तीव्र शरानें मृत्युपथा जाती ॥
गजदीपावरि यवनपतंग क्रोधें धडपडती ॥
शरशकलीकृत होउनि त्यांचे भूवरि धडपडती ॥
एकचि रणकल्लोळ जाहला जरिपटक्याखालीं ॥
कोणि कुणाचा नव्हता वाली तेथें त्या कालीं ॥
महादजीभोंवतीं एकची गर्दी पाहुनि ॥
नरवर गरथर खरतर शर सोडी करकर करुनी ॥
ठेउनि धनुशर गजावरुनि तो उतरे तेजाळ ॥
खड्ग घेउनी चिरित चालला शत्रुकंठनाल ॥
डाव्या हातीं होता पट्टा सन्मुख फिरवीला ॥
वाटे त्या निर्यवनमंडलीं तो लाजवि रविला ॥
आला धावुनि पाठीशीं धरि शस्त्र छत्र वरुनी ॥
सोडवि त्या बाला भुजभुजग प्रताप मग करुनी॥
अरि मंडल फोडुनी उडाले क्रांत बहू झाले ॥
त्या रणकाननिं किंशुक तरुसम ते दोघे फुलले ॥
खवळे सेनासमुद्र सारा यवनांचा मग तो ॥
उठती लाटा विशाल त्याचा दीन शब्द होतो ॥
कापाकापी करीत–पुढती क्षणक्षणा जाई ॥
शौर्य विलोकुनि नजिबहि डुलला धन्यवाद देई ॥

[ चाल ]

तों वार मागुनी आला। अंतरीं शिरला। भूमिवर पडला।
तळमळे प्राण तो त्याचा ॥
बोलली धीरवरवाचा ॥
मृत्युला न भी मी साचा ॥

निघा ! चला ! जा ! लढा ! शत्रुशीं भिडवा ! गजवाजी ॥
दत्ताजींचें यशोगायन प्रिय होतें आजी ॥६॥

७

पाटिल पडले हें ऐकुनि तो अरि धावुनि आला ॥
"कहां पटेल" या असकृद्वचनें पुसतो दासाला ॥
परिजन मंडल रक्षित तेजःपुंज तनू दिसली ॥
रणतीर्थांतील रुधिर जलें जी शुद्ध अहा ! झाली ॥
"लढेंगे क्यों पटेल हमसे अब तुम कभितोभी ॥
बोलो बतलाता हूं डेरा अल्लाका नामी" ॥
तप्ततैल तद्वच सळसळलें श्रवणिं शिर त्यांच्या ॥
समयोचित तत्काल निघाली वीरश्री वाचा ॥
"बचेंगे तो औरभी लढेंगे गनीम काटेंगे" ॥
दिल्ली लेकर उसपर भगवा झेंडा फडकायेंगे ॥
वाक्शर हृदयीं शिरले तेणें पद मस्तकिं ठेवी ॥
तरवारीनें शिर तोडाया उद्यत तो होई ॥
रौप्यमुद्रिका सहस्त्रार्बुदा देतों परि सोडा ॥
परिजन दीन-वचानें ऐसा स्तविला तो वेडा ॥
जातो दत्ताजी सुरलोकीं काळ उलट फिरला ॥
लवहि न पाझर फुटला चर-चर कंठनाल चिरला ॥
हा ! हा ! वीरा ! काय दशा ही तव तनुची होई ॥
परि अविनाशी आत्मा तव तो स्वर्गासी जाई ॥
भूमातेच्या कंठ मालिकेंतील माणिक गळलें ॥
पर काकानें निज-चंचूनें छिन्न भिन्न केलें ॥
महादजीच्या उरु-प्रदेशीं असह्य क्षत पडला ॥

तच्चमुतटिनीहुनि बहु परसेनाब्धी भरभरला ॥
लक्ष्मीच्या सौभाग्यतिलकिं वैधव्यतिलक आला ॥
प्रियपति विरह-गरातें कैशी साहे ती अबला ॥
रुदनालाही वेळ न उरला भेट कुठें मग ती ॥
मेणे उचलुनि धावति सारे त्वरित पथ क्रमिती ॥
रजपूत दुर्ग गांठिला, तदाश्रय केला. प्राण वांचविला।
भाऊंना कळलें वृत्त ॥
क्षोभलें तयांचें चित्त ॥
करकरा वाजती दांत ॥
तैलायू संपलें म्हणे तनु मालविती तुझी ॥
दत्ताजीचें यशोगायन प्रिय होतें आजी ॥

८

दत्ताजीच्या शिरीं खला ! जो पाय तुवां दिधला ॥
जरि असतों तरि उभाचि चिरितों तोच धरुनि तुजला॥
आता छेदिन भगव्या झेंड्याखालीं खड्गानें ॥
केली प्रतिज्ञा पूर्ण अहाहा ! नरहरि भाऊनें ॥
धन्य तो असे पालक, धन्य सेवक. साधि स्वर्लोक ॥
दत्ताजी पाटिल गेले ॥
सद्यश जें मागें उरलें ॥
तें अजरामर जणुं झालें ॥
जें गावेंसें वाटत होतें कविचित्तामाजी ॥
दत्ताजीचें यशोगायन प्रिय झालें आजी ॥

समाप्त.

# " अश्रुबिंदु "

१

हा ! हा ! गेली अवचित सखी स्वर्गलोकीं निघून ।
धाराश्रूंचे नयनयुगुलीं पूर आले भरून ॥
आतां होती वदत मजसी दुःख दुःखस्वरानें ॥
" पाणी पाणी " करित असतां पाजिलें म्यां करानें ॥

२

" द्याहो ! कांहीं मज कुणितरी अन्न खायास द्याहो !"
बोले दुःखें कळवळुनियां—" वांचवा वांचवा हो ! "।
मी वैद्याचे नियम बसलों ते उरीं बाळगून ॥
" आशाघ्नें विपरित कृती होय चित्त भ्रमून " ॥

३

" नाथा ! आतां सहत नसती वेदना या मला हो ! "
" आई ! आई " वदनिं वदतां फोडिले फार टाहो ॥
वत्सा पाही, मधुनि मधुनी हंबरे गाय जैशी ॥
आली नाहीं तिळभरि दया म्लेंच्छ-काळास कैशी ॥

४

कांते ! झालें मरणसमयीं जें तुला दुःख हा ! तें ॥
तेणें कंठीं दृढतर मिठ्या मारिल्या फार हातें ॥
झालें नाहीं मजकडुन तें लेशही न्यून कांहीं ॥
" अंतीं दुःखें निवटिल असा शक्त कोणीच नाहीं " ॥

५

आली जेव्हां कुसुमतनुतें ग्लानि अत्यंत गात्रीं ॥
मृत्यु-शंका तुजसि गमली सत्य तैं मध्यरात्रीं ॥
बोले—“मातें प्रभु अजि गडे! हाय नेईल काय?”
“छी! छे!” आश्वासन मम असें सर्व तें व्यर्थ जाय॥

६

होती देवीवरि बहु तुझी भक्ति आरोग्यकालीं ॥
रक्षा तीची करुनी विनती लाविली ती कपाळीं ॥
रक्षायाची परि न धरिली काळजी हाय! हाय! ॥
“ आयुष्याच्या पुढति न चले देव-देवी-उपाय ॥

७

अंतीं अंतीं त्वदिय तनुचा जाहला दाह फार ॥
कोणालाही मुळिंच सुचला योग्य नाहीं उपाय ॥
क्षीण क्षीण स्वर निघतसे कंठ होवोनि रुद्ध ॥
हा! हा! झाली बघत असतां मृत्युपाशांत बद्ध ॥

८

होती इच्छा मजसह तुला फार बोलावयाची ॥
गेली तींची भरुनि घटिका पूर्ण कैशी त्रयाची ॥
संबोधोनी मजसि वदसी क्षीण शब्दांत—“ कांहो ”।
पृच्छा होतां मग मज म्हणे-“ बोलवे ना अतां हो!”

९

भेटायातें निधनसमयीं मैत्रिणी सर्व आल्या ॥
पाहूनीया मरणगतितें दुःखिता फार झाल्या ॥
त्यांचा आणी क्षणभरि तुझा अंत्य-संवाद झाला ॥

ता काळानें तुजवरि कसा घातला हाय ! घाला ।

१०

देहांतूनी नकळत कसा प्राणपक्षी उडाला ॥
गेलें ज्ञान, स्मृति हरपली, धैर्यसेतू बुडाला ॥
शोकावेगें हृदय मम हें पूर्ण आलें भरून ॥
कांहीं केल्या मज न धरवे दुःख तें आवरून ॥

११

अंकीं तेजोविहिन मुख तें स्थापुनी अश्रुमाला ॥
घालायाला जरिहि सजलों देह ना शांत झाला ॥
देवी ! देवी ! मधुरवचनीं बोल माझ्यासवें गे ! ॥
आक्रंदोनी तुज विनविलें हाय ! नानापरीनें ॥

१२

पूर्वीं अंकीं निजशिर कधीं ठेवुनी घेशि निद्रा ॥
नाहीं केव्हां खचित दिसली ही अशी दीन मुद्रा ॥
पाहीं डोळे उघडुनि जरा दाखवीं नील कांती ॥
मृत्युभ्रांती निवडुनि मना घेउं दे थोर शांती ॥

१३

जेव्हां केव्हां प्रणयकलहें जाहला गे ! अबोला ॥
माझ्या आधीं हसुनि हसवी मोहुनीया मनाला ॥
मी होवोनी वदत असतां शब्द कां गे ! फुटेना ॥
शुद्धप्रेमा तुजवरिल हा कांहिंकेल्या सुटेना ॥

१४

मी येतांना मजसि दुरुनी चंचलाक्षे ! बघोनी ॥
तूं निद्रेचें मिष करुनियां झांकिशी नेत्र दोन्ही ॥

तैसा हाही वद झडकरी काय आहे विनोद ॥
ज्याच्या अंतीं सुखद भरिला त्वां सखे ! हास्यमोद ॥

१५

कांहीं केलें असशिल तुवां पुण्य जन्मांतरांत ॥
आली स्वर्गांतुनि पुनरपी क्षीण-पुण्यें जगांत ॥
तें स्वर्गाचें सुख तुजसवें येथ मी पूर्ण भोगीं ॥
आतां देवी ' परि तुजविना जाहलों मी अभागी ॥

१६

संसाराब्धी सहज तरण्या मित्र एकत्र झालों ॥
लग्नाचश्या त्या शुभदिनि उडी घालुनीया निघालों ॥
षड्वर्षेंही अजुनि भरलीं पूर्ण नाहींत त्यासी ॥
मातें येथें त्यजुनि बनली पैलतीरीं निवासी ॥

१७

सांगूं कोणाजवळ रमणी ! गुह्य गोष्टी जिवाच्या ॥
कोण प्रेमें रिझविल मना बोलुनी गोड वाचा ॥
सौख्याचे ते दिवस सरले सुंदरी तूंच जातां ॥
दुःखाच्या गे ' रजनि उरल्या यापुढें मात्र आतां ॥

१८

ज्यां शोकाचें सुरस रचिलें "तेंच हें स्थान" काव्य ।
आला त्याचा अनुभव मला अल्प मासांत भव्य ॥
बाधा होते कवनविषया साधितां व्यग्रतेची ॥
घ्यावीं लोकीं परिणत-फलें चित्तएकाग्रतेचीं ॥

१९

त्वत्प्रेमाच्या रमणिय गडे ! दिव्यतेजा सुरेख ॥

उत्कर्षाची हळुहळु चढे पायरी एक एक ॥
अस्तां जातां तव मुखशशी गाढ अंधार झाला ॥
मोह व्यापी विकलहृदयीं घाबरा जीव झाला ॥

२०

स्निग्धे ! मुग्धे ! चपलनयने ! स्नेहगंगे ! शुभांगे ॥
धन्ये ! मान्ये ! नयनसुभगे ! कोमलांगे ! कृशांगे ॥
देवी ! देवी ! क्षणभरि तरी बोल माझ्या सवें गे ।
हो ! जागी हो. बघ मजकडे वस्त्र हें सांवरीं गे ॥

२१

जन्मा आली परि न भरले पूर्ण षण्मास जीला ॥
झाली मातविहिन जगतीं ती तुझी आज ' लीला ' ॥
" आई आई " म्हणुनि वदते बोल अस्पष्ट कांहीं ॥
आतां तीतें इहजगिं तुझी भेट होणार नाहीं ॥

२२

मोठी झाल्यावरति समजूं तीस लागेल जेव्हां ॥
" कोठें आई " म्हणुनि पुसतां दाखवूं काय तेव्हां ॥
गेली स्वर्गीं निघुनि परि तूं येथ तूझ्या अभावीं ॥
या बालेची गति सहचरी ! काय होईल भावी ॥

२३

जेव्हां आम्ही करुनि थकलों औषधांच्या उपाया ॥
तैं लीलेला मज विनविलें शेवटीं तूं जपाया ॥
आलें मातें भडभडुनियां शांतवीलें तुवांची ॥
कैशी ती विस्मृति मज घडे अंतिच्या त्वद्वचाची ।

२४

हें कर्तव्य प्रियतम अशा बाल संगोपनाचें ॥
आहे मोठें कठिण चतुरे ! जें असे स्त्रीजनाचें ॥
व्हावें कैसें मजकडुन तें अन्य नाहीं उपाय ॥
आहे माझ्या सतत हृदयीं दुःख तें हाय ! हाय ! ॥

२५

तीतें कोणाजवळ तरिही इष्ट देणें मला हें ॥
पोटासाठीं मज भटकणें सर्वदा भाग आहे ॥
आहे जो या जगतिं भगवान् पूर्ण ऐश्वर्यशाली ॥
या बालेचा मजहुनि असे एकला तोच वाली ॥

२६

झालें कैसें उलट सगळें कल्पनेच्या विरुद्ध ॥
दुःखाश्चर्यें चकित बनलों कंठ होवोनि रुद्ध ॥
अंतर्यामीं कढ उसळती नेत्ररूपें वहाती ॥
माझ्या दुःखें इतर रडती दीनमुद्रें पहाती ॥

" भाग "

२७

नेलें जेव्हां उचलुनि शव स्नान घालावयाला ॥
गोळा झाल्या परिचित सख्या सर्व पाहावयाला ॥
तो तेव्हांचा समय मजला लेखनीं वर्णवेना ॥
वर्णूं जातां हृदय भरुनी लेखणी हालवेना ॥

२८

लागे मातें मृदुल तनुच्या मंडनातें कराया ॥
माझा कंठध्वनि फुटुनियां लागलों मी रडाया ॥

"देवी ! देवी ! निजगृहिं कधीं सांग येशील आतां ॥
जातां जातां मधुवच तरी बोल गे ! एक आतां ॥

२९

श्रीरामाचा करित जप ती प्रेतयात्रा निघाली ॥
"होतें नाम-स्मरण बहुधा संकटाच्याच कालीं" ॥
गेहीं शय्या मृदुतर अशी सोडुनी शून्य रानीं ॥
काष्ठीं कैसें शयन वरिलें कोमलांगे ! स्मशानीं ॥

३०

ज्या हातानें धरुनि कितिदां चुंबिलें त्वन्मुखाला ॥
त्या हातानें शिव ! शिव ! कसा अग्नि लावूं चितेला
दैवा ! कैसा समय भलता आणिला तूं नृशंसा ! ॥
दीनार्तांना विकल करणें यांत नाहीं प्रशंसा ॥

३१

दाहें झाला मृदुतर तुझा शुष्क आधींच काय ॥
त्यातें हातें हर ! हर ! वरी अग्नि लावूंच काय ?॥
कांते ! कांत ! हृदय फुटलें बोलणें काय आतां ॥
प्रेमी लोकांकडुन करवी दुष्ट कृत्यें विधाता ! ॥

३२

ज्वाला जाती वरि वरि चिता पेटतां अंतराळीं ॥
तैं सर्वांची खचित कथितों वृत्ति झाली निराळी ॥
होते ज्ञानी परि ढळढळां गाळिती अश्रुबिंदू ॥
मृत्यूघातें सहज फुटती थोरही धैर्यसिंधू ॥

३२

मोठे प्रेमी जरि म्हणविती कोणि नाहीं कुणाचा ॥

अंतीं आहे समय सकलां एकटें जावयाचा ॥
अज्ञां जीवां उगिच भरला अंतरी मात्र गर्व ॥
मायामोहीं विमुढ बनले मोठमोठेहि सर्व ॥

३४

जैशी जैशी वपु तव जळे अंतरात्मा जळे हा ॥
त्याची ज्वाला दिसत नव्हती मात्र दृष्टीस तेव्हां ॥
चिंता जाळी सजिव शरिरां निर्जिवातें चिता ती ॥
याची येई त्वरित पुढती प्रत्यया सत्यता ती ॥

३५

जिव्हा ज्वाला करुनि अनलें भक्षिला देह सारा ॥
रक्षा अस्थि क्षितिवरि दिसे सर्व यांचा पसारा ॥
रक्षा सारी तृतिय दिवशीं येथ तापींत टाकी ॥
न्याया ठेवी जतन करुनी अस्थि गंगातटाकीं ॥

३६

आलिंगाया दिन मज तुला एक नाहींच झाला ॥
आलिंगुनी अहह ! तुज तो अग्नि कैसा रिझाला ॥
ती अंतींची सुखमय अशी भेट एकांत साची ॥
दोघांनाही शिवत नव्हती कल्पना गे उद्यांची ॥

३७

आलों गेहीं परतुनि तदा पाहवेना मला तें ॥
माझें गेह प्रिय जळत कीं तें स्मशानांत होतें ॥
'लीला' बाला नयनिं दिसतां दुःख माझें दुणावे ॥
दैवा ! दैवा ! तुजसि अदया ! काय कैसें म्हणावें ॥

३८

आनंदाचें उपवन जणों गेह झालें स्मशान ॥
वाहे माझी नयनसरिता राहिलें नाहिं भान ॥
नाहीं आतां मजसि कुणिही हाय ! आप्त-स्वकीय ॥
दुर्दैवानें स्थिति घडविली ही सदा कंपनीय ॥

३८ ब

जेथें अन्नाविण तव सखे ! प्राण गेला तुझा तो ॥
तेथें कैसा मम मुखिं बरें एकही ग्रास जातो ॥
जेव्हां जेव्हां विकलहृदयें पाहतों त्या स्थलातें ॥
तेव्हां तेव्हां रुदन करण्या लाविते गे ! मला तें ॥

३८ क

जेवायातें मज बसविती आग्रहें मित्र माझे ॥
"ग्राहो ! ग्राहो !" विकल रव हा कर्णरंध्रांत गाजे ॥
हातांतूनी गळुनि पडतो ग्रास शब्द-स्मृतीनें ॥
झालों क्षीण प्रणयदयिते ! मृत्युच्या दुष्कृतीनें ॥

३९

जिव्हा ज्वाला करुनि अनलें भक्षिला देह सारा ॥
रक्षा अस्थि क्षितिवरि दिसे सर्व यांचा पसारा ॥
रक्षा सारी तृतिय दिवशीं येथ तापींत टाकी ॥
न्याया ठेवी जतन करुनी अस्थि गंगातटाकीं ॥

४०

गेली स्वर्गीं म्हणुनि तव त्या अस्थि गंगातटाकीं ॥
नेऊनीयां पुनित करुनी रामकुंडांत टाकीं ॥
गंगेमध्यें पडुनि खळगा शांत झाला प्रवाह ॥

झाली माझ्या खळबळ हृदीं अंतरीं होय दाह ॥

४० अ

होती माझी अजवरि परी आज गंगे ! तुझी ती ॥
संरक्षावी स्वकिय जनता हीच गे ! योग्य नीती ॥
नीचें कैसा उगिच करणें बोध हा जाणत्याला ॥
"आपत्कालीं स्मृति न उरते दीन दुःखी जनाला ॥"

४१

गंगादेवी भरुनि सलिलें जाय शीघ्र प्रवाहें ॥
जैशी माझी विरहसरिता अंतरीं नित्य वाहे ॥
ती जाऊनी प्रियकर तिच्या सागराला मिळेल ॥
माझी मात्र प्रतिदिनिं अहा ! क्षीण काया जळेल ॥

४२

पुण्यक्षेत्रीं विविध जनता तीर्थयात्रेस येई ॥
शोभा नेत्रीं बघुनि मुदिता अंतरीं फार होई ॥
मातें तेथें त्वादिय न दिसे शुद्ध पावित्र्यता ती ॥
माझ्या चित्तीं म्हणुनि मुळिही लाधली नाहिं शांति॥

४३

श्रीगंगेच्या विमल सलिलीं घेउनीयां समाधी ॥
वाटे यावें मज तुजकडे सोडुनीयां उपाधी ॥
तों बाळेचें मुख मजपुढें येउनी बोललें गे ! ॥
"बाबा ! माझी गति तुजविना काय होईल मागें ॥

४४

पिंडश्राद्धें करित असतां सर्व अंत्यक्रिया मी ॥
वारंवार स्वनयनजलें तर्पिलें क्षेत्रधामीं ॥

नामोच्चारा जइं घडिघडी रुद्धकंठ करावें ॥
तेव्हां भारी विकल हृदय हें दुःखदुःखें भरावें ॥

४५

मंत्रोच्चारें द्विज विधि मला एक सांग कराया ॥
लागे तेव्हां भ्रमितहृदयें अन्य मी आचराया ॥
ती तेथील स्थिति मम तशी व्याकुला शोचनीया ॥
पाहूनीयां 'शिव! शिव!' वदे नेत्र तो झांकुनीयां॥

४६

माझ्या हातें सतिगति तुझी जाहली क्षेत्रधामीं ॥
माझी ऐशी सुगति करण्या कोण येईल कामीं ॥
कोणा ठावें पडतिल न वा अस्थि गंगाप्रवाहीं ॥
गेलें पूर्वीं ठरुनि, मन हें काळजी व्यर्थ वाही ॥

भाग

४७

धूमज्योतीसह वपु तुझी जाहली लुप्त साची ॥
मेघांमध्यें असशिल अशी कल्पना ही मनाची ॥
पाहूं जातां उगिच भिववी गर्जना व्यर्थ त्यांची ॥
"उन्मत्तांना क्षितिहि नसते हीन दुःखी जनांची"

४८

विद्युत्कन्या करित विकट हास्य गेली निघोनी ॥
मी डोळ्यांनीं अविनय तिचा यक्क झालों वघोनी ॥
लज्जा नाहीं किमपि गमली तीस वेडावयाची ॥
"शास्ता नाहीं कुणिहि न जया स्वैरवृत्ती तयाची"

४९

या आकाशीं सकल वदती स्वर्ग आहे म्हणूनी ॥
तूं तेथेंची असशिल असें अंतरीं मी गणूनी ॥
उत्कंठेनें बघत बसलों दृष्टितें लावुनीयां ॥
शून्याकारीं परि न दिसली शून्य मूर्ती त्वदीया ॥

५०

नोहे तारा असतिल सती दिव्य आकाशवासी ॥
ज्यांनीं त्यांनीं सुगति वरिली आत्मपुण्यें जिवासी ॥
तेथेंहा मी बहुत शिणलों शोधुनी शोधुनीयां ॥
नैराश्यानें विमल मति ही मूढ झाली मदीया ॥

५१

गेहीं होता वदनशशि जो लंघुनी क्षीण काय ॥
हा आकाशीं पुनरपि डुले तोच येऊन काय ॥
पाही जेव्हां निरखुनि तदा जाहलों मी त्रिशंकी ॥
छे! तो नाहीं मनिं उमगलें कीं असे हा कलंकी ।

५२

होतो अस्त प्रथम रविचा मागुनी तत्प्रभेचा ॥
केतुग्रासीं विपरित परी होय हा नेम त्याचा ॥
दुर्दैवाच्या परमअदयें केतुनें पीडिलों मी ॥
मी आहें तूं परि न दिससी जाहली स्वर्गगामी ॥

५३

झंझावातें गळुनि पडुनी पुष्प जावें उडूनी ॥
त्याचा भोक्ता भ्रमर भरितो रान 'गुं गुं' रडूनी ॥
अन्यें पुष्पें जरिहि असती प्रेम तें एक पाही ॥

एकाचें तें स्वरुप इतरां सत्य येणार नाहीं ॥

५४

संसाराच्या सुखकर अशा सागरीं सुंदरा जी ॥
होती तूंच प्रियकर खरी पद्मिनी एक माझी ॥
केली नष्टा अदयहृदयें तीव्र कालानिलानें ॥
राहे येथें भटकत तुझा हंस हा संभ्रमानें ॥

५५

ज्योती जातां विझुनि दिसतो दीप तजोविहीन ॥
झाली माझी तुजविण तशी दुःस्थिती आज हीन ॥
किंवा नष्टा ललितलतिका होउनी मंडपाची ॥
जाते शोभा मदिय गतिही जाहली तेविं साची ॥

५६

माझें आहे चरित सगळें दुःखशोकप्रयुक्त ॥
झालीं सौखें मज शिशुपणापासुनीयां वियुक्त ॥
वाटेमध्यें पसरत असे दुष्ट जो नित्य काटे ॥
तोंडावाटे अदय विधिचें नांव काढूं न वाटे ॥

५७

बाल्यामध्यें लव न सुखही लाधलें या जिवाला ॥
गेली माता त्यजुनि भुवनीं जाहला तो उन्हाळा ॥
तारुण्याच्या उपवनिं तुझ्या प्रीतिच्या मंडपांत ॥
विश्रांतीतें प्रणयलतिके! घेत होतों सुखांत ॥

५८

गेला तोही जळुनि अगदीं दैवदावानलानें ॥
आक्रंदाया उघड मजला ठेविलें त्या खलानें ॥

अदृष्टीं या अजुनि लिहिलें काय आहे कळेना ॥
दुर्दैवाचीं विरहलिखितें कांहीं केल्या टळेना

५९

आधीं सौख्यें लिहुनि थकला पुष्कळांच्या कपाळीं॥
नाना दुःखें लिहित सुटला हाय! माझ्याच भाळीं॥
न्यूनाधिक्याविण न तुलना चांगल्यावाइटाची ॥
हें दावाया विधिस उरलों काय मी एकटाची ॥

६०

संसाराचा मदिय दिसतो नाटकी हा विधाता ॥
एका ठेवी जतनकरुनी अन्य योजी विधाता ॥
कोठें कोठें रुचिर पडदे घालितो सारितो ही ॥
इच्छामात्रें हंसवि-रडवी बोलतां चालतांही ॥

६१

जीवित्वाचे करिं धरुनियां फेकितो नित्य फांसे ॥
दुःखें कष्टें बघुनि जणुं हा अंतरीं दुष्ट हांसे॥
केव्हां प्रेमध्वज उभवुनी प्रेमसंन्यास देई ॥
कोणी याचें हृदय घडलें ज्यास माया न येई ॥

६२

कोणी प्रेमीजन सुखविण्या ठेविला या न जीवा ॥
या दैवानें उगवुनि जणों घेतला हाय! दावा ॥
नेली कांता प्रियतम जणों प्राण माझा द्वितीय ॥
केली माझी शिव! शिव! गती येथही शोचनीय ॥

भाग

६३

छाया चित्र त्वदिय रमणी घेउनीयां करांत ॥
पाहूं जातां त्वरित भरतें अश्रुबिंदूजलांत ॥
येथेंही तो खडतर विधी नेत्रसम्मीलनातें ॥
होऊं नेदी गुरुतर घडे कोणतें पाप हातें ॥

६४

वारूनीयां नयनसलिला घेउनी तें करांत ॥
त्याशीं कांहीं वदत बसतों रुद्धकंठस्वरांत ॥
"माझ्या साठीं विपदसमयीं प्राण टाकीत होती ॥
पाही नेत्रें अनिमिष वदे एकही शब्द ना ती ॥

६५

पावित्र्याची रमणिय तुझी मूर्ति डोळ्यांसमोर ॥
पाही हा मी वदनशशिच्या चंद्रिकेला चकोर ॥
यावी शांती हृदयिं परि तो दीर्घ निश्वास चाले ॥
ऐसे कोण स्मृतिविरहि जे जाणते शांत झाले ॥

६६

नानागंधें उपवनिं जसा पुष्पगुच्छे जनाला ॥
होई तैसा त्वदिय सुगुणें तो माझ्या मनाला ॥
विश्वोद्यानीं सुमन विभुनें लाविलें एक हातें ॥
नेलें तेणें खुडुनि सदनीं होय त्याचेंच हातें ॥

६७

लोकीं येई सुखद दिन तो इष्ट जेव्हां सणाचा ।
माजे कोलाहल निजहृदीं दुःख-संमिश्रणाचा ।

जावें कोठें तरि निघुनियां घोररानीं स्मशानीं ॥
लाधे कैशी अहह! हृदया शांतता ती अशांनीं ॥

६८

त्वद्वाणीची करुनि तुलना कोकिलेच्या स्वरांनीं ॥
सारंगांनीं नयनरचना तोलिली तेथ रानीं ॥
वेलीशींही तुळुनि प्रतिती घेतली सत्यतेची ॥
एकीमध्यें तव न दिसली साम्यता रम्यतेची ॥

६९

ज्या ज्या गोष्टी त्वदिय रमणी आठवाव्या मनात ॥
त्या त्या अश्रू भरुनि मम या आणिती लोचनांत ॥
वर्षाकालीं रजनिसमयीं अतरालांत जैशी ॥
होई क्रांती हृदयदयिते! अंतरामाजि तैशी ॥

७०

येथें तेथें उगिच बसतों वेळ जावा म्हणूनी ॥
लावीं चित्ता इतर विषयीं पुस्तकीं वाचनींही ॥
कोरीं पानें नयनिं दिसती काय मी त्यांस वाची ॥
जेथें तेथें दिसत असती मात्र मूर्ती तुझ्याची ॥

७१

पाहीं डोळे भरुनि तंव त्या अक्षरांच्याच ओळी ॥
वाचूं जातां कळत नसतो अर्थ प्रत्येक वेळीं ॥
नेत्रांतूनी सहज गळती पुस्तकीं उष्णबिंदू ॥
मातें तूझा सतत बुडवी मोहिनी! मोहसिंधू ॥

७२

होई मातें उशिर बहुधा जैं गृहीं यावयासी ॥

द्वारामध्यें बघत बसशी वाट माझी गृहाशीं ॥
गेहीं येतां कल-रव तुझा येतसे गोड काना ॥
जाई माझा हरुनि सगळा शीण तो ऐकतांना ॥

७३

एके ठायीं वसति नसते प्रेमकोपद्वयाची ॥
तूं होतांची प्रणय–कुपिता मिथ्यता ये तयाची ॥
किंचित् वक्र भ्रुकुटिरचना हास्य किंचित् प्रकाशे ॥
जैसें अर्धोन्मिलित सुवनीं पद्म तेजें विकासे ॥

७४

अन्यग्रामीं गमन करण्या एकदें म्यां निघावें ॥
बोले "नाथा! हुर हुर गमे लौकरी गेहि यावें" ॥
आतां कैसें तुज करमतें एकटें सांग तेथें ॥
माझ्या चित्तीं हुर हुर अशी लावुनी हाय! येथें ॥

७५

मच्चिंतातें रमवुनि सदा कष्टशी माद्धितार्थ ॥
चातुर्यानें 'चतुर गृहिणी' नाम केलें यथार्थ ॥
अन्योन्याचा इतर जनही पाहुनी एकभाव ॥
आविर्भावें त्यजिति अपुला जन्मसिद्ध स्वभाव ॥

७६

कोणी नाहीं गृहिं शिकवितां बोलता चालताही ॥
ज्या जातीच्या सुशिल असती पाहणें त्यांस नाहीं ॥
पाषाणाचा घडुनि घडुनी देव केला जरीही ॥
अंगीभूत स्वकिय तनुचा धर्म सोडीत नाहींत ॥

७७

ज्या ज्या वस्तु तुजसह बहु सौख्य देती मनाला ॥
त्या त्या आतां मदिय रुदना कारणीं मात्र झाल्या॥
सौभाग्याची विकल करिते हाय! शृंगारपेटी ॥
डागीन्यांना बघुनि भडके अंतरीं आग मोठी ॥

७८

कांता स्वाभाविकचि असती कोमला अंतरंगीं ॥
शोकावेगें उघड कथिती दुःख नाना तरंगीं ॥
येईना तें खचित पुरुषा बोलुनी दाखवीतां ॥
बाधा होते द्विगुणित मना दुःख तें सांठवीतां ॥

भाग

७९

होती साध्वी मति तव खरी देवधर्मांत फार ॥
सेवा माझी परि न चुकली पुण्य जोडी अपार ॥
त्या पुण्यानें उचित तुजसी लाभला स्वर्गलोक ॥
हा पापात्मा पति तव रडे मृत्युलोकीं विलोक ॥

८०

तूं सौभाग्यें भरुनि सुभगे! देवलोकास गेली ॥
येथें कीर्ती युवतिसमुहीं ही तुझी फार ठेली ॥
माझ्या स्कंधीं बसुनि चढली स्वर्गसोपान–मार्ग ॥
कैसा येऊं तुजसह बरें सत्य सोपा न मार्ग ॥

८१

स्वर्गी गेली असशिल कसें काय केलें असेल ॥
लागे चित्ता तळमळ कसें काय झालें असेल ॥

वाटे रात्रदिन तुजविना अंतरात्म्यास खंत ॥
तेणें स्वास्थ्य क्षणभरि नसे कामिनी ! हंत ! हंत ! ॥

८२

स्वर्गीं जातां स्मृति मम तुला फार झाली असेल ।
लीलेचाही विरह तुजला सह्य झाला नसेल ॥
जातां जातां वळुनि वळुनी पाहिलें त्वां असेल ।
शोकें झाले असतिल तुझे आर्द्र दोन्ही कपोल ॥

८३

इच्छामात्रें सहज वरिती मृत्यु पूर्वी शुभांगी !
त्या लोकांची अतुल असती शक्ति माझ्याहि अंगीं ।
अर्ध्या मार्गांतचि तुज सखे ! गाठितों येउनीयां ।
मत्प्रेमानें चकित करितों तत्क्षणीं भेटुनीयां ॥

८४

स्वर्गीं जातों मग उभयता बोलतां चालतांना ॥
देतों शांती रिझवुनि मना चालतां चालतांना ॥
स्वर्गंगेच्या सलिलिं करितों स्नान पानादि कार्यें ॥
तेथोनीयां मग हळु हळू गांठितों स्वर्ग भार्ये ! ॥

८५

मार्गीं कोणी जरि अडविता बोलता देवदूत ॥
होतों मी तैं जवळि तुझिया कांत हा स्नेहपूत ॥
त्या वाक्नी अमरमिथुनीं स्वप्रवेश स्वपुण्यें ॥
ज्यांहीं केला खचित असता येउनी देह धन्यें ! ॥

८६

नाहीं माझ्या निटिलिं लिहिलें एवढें भाग्य थोर ॥

जन्मापासूनचि मजसवें मांडिलें हाडवैर ॥
भोक्तृत्वाचा असुखद असा काळ केव्हां सरेल ॥
राधे! देवी! फिरुनि न कळे गांठ केव्हां पडेल ॥

८७

सेवायातें सतत झटती देवदूतादि ज्यांना ॥
ऐसे स्वर्गीं वसति करिती पुण्यवान् लोक नाना ॥
नेत्रें त्यांना चकित चकिता होउनी पाहशील ॥
माझें मात्र स्मरण घडतां अश्रुनें नाहशील ॥

८८

सत्तेजाचें वलय विलसे भोंवताली जयांच्या ॥
रत्नछाया मधुनि झळके आसनांची जयांच्या ॥
त्यांच्या दृष्टी जडतिल मनीं हाच हेतू धरूनी ॥
" आली कोण प्रथित युवती ही सता भूवरूनी ॥

८९

कोणी होती मुदित बघुनी बर्तनें अप्सरांचीं ॥
कोणी दंग श्रवण करितां गायनें किन्नरांचीं ॥
कोणी हा! हा! म्हणुनि धरितां ताल मोठ्या सुहासें ॥
तांबूलानें भरुनि अवघें स्थान जाई सुवासें ॥

९०

तेथें नाहीं उदय रविचा स्थान तें कांतियुक्त ॥
तेणें आहे दिवस रजनी मांसुनी तें वियुक्त ॥
दिक्कालाची गतिहि न चले कल्पना काय चाले ।
त्वत्पुण्यानें तुजसि असलें स्थान वाट्यास आलें ।

९१

श्वश्रू आणी श्वशुरदुहिता पुत्र तैशा नणंदा ॥
यांच्या गांठी पडतील तिथें भेटशी आप्तवृंदा ॥
सर्वांआधीं तनय तनया शीघ्र आलिंगशील ॥
“मातृप्रेमा दृढतर असे कोण त्या वर्णतील” ॥

९२

आधीं माझी पुसिल जननी सर्व मद्वर्तमाना ॥
स्त्रीयां बालां करित असतां तेथ तूं दुग्धपाना ॥
“का गे! आली त्यजुनि सुतनीं एकला बाळ आहे ॥
ऐसा काते! तुजसि बहुधा दोष लावील मोहें ॥

९३

ताताचा मी बहुत ललने! जीव कीं प्राण होतों ॥
अंतींही मत्स्मरण करुनी पावला स्वर्ग जो तो ॥
“बाई कैसा मम सुत असे सांग ऐकूं मला दे”॥
उत्कंठेनें पुसुनि मग तो नेत्र झांकील खेदें ॥

९४

होत्या भारी मदिय भगिनी प्रेमळा स्नेहमाना ॥
माझ्या संगें शिशुपणि बहू खेळल्या खेळ नाना ॥
बाहुनीयां “वहिनि वहिनी” बैसुनी भोंवताली ॥
मद्वृत्तातें पुसतिल तुला प्रेमळे! त्याच काळीं ॥

९५

स्त्रीयां लोकां नयनिं बघतां दुःख चित्तीं दुणावे ॥
दोघांनाही कठिण पडतें काय कैसें म्हणावें ॥
अंतर्यामीं खळबळ उठे दाविता ती न येई ॥

भाषेमध्यें कथन करण्या नेमके शब्द नाहीं ॥

९६

तूं सर्वांना स्थिति मम यदा सांगशी हृद्विदीर्णा ॥
त्यांच्या दृष्टी बनतिल अहा ! सर्व तैं अश्रुपूर्णा ॥
मी तेव्हांची स्थिति सहचरी ! काय सांगू तुझींहि ॥
आहे नेत्रापुढति विकला राहिली ती उभी ही ॥

९७

शांती तूंच प्रथम वरुनी शांतवीं वृत्ति त्यांची ॥
राहीं सेवा करित मम त्या वृद्ध मातापित्यांची ॥
म्यां सांगावें मुळिं न चतुरे ! तूंच आहेस दक्ष ॥
स्नेहें येती वच परि मुखीं सुंदरी ! ठेव लक्ष ॥

भाग

९८

कांहीं काळें परिचय तुझा आणि देवांगनांचा ॥
होतां, प्रेमा तुजवरि जडे निर्जरस्त्रीजनांचा ॥
दुःखक्लिष्टा सतत विरही खिन्न मुद्रा बघोनी ॥
त्वच्चित्तातें रमवितिल त्या बांध नाना करोनी ॥

९९

पुष्पोद्यानीं विनवुनि तुला फार नेतील केव्हां ॥
पुष्पें ताजीं रचितिल तुझ्या कृष्ण वेणींत केव्हां ॥
केव्हां केव्हां खुडुनि सुमनें हार देतां रचाया ॥
माझें तेव्हां स्मरण करुनी गाळिशी अश्रु वाया ॥

१००

व्हावा कैसा विसर तुज; हा प्रश्न त्यांना पडेल ॥

न्हावी कैशी स्थिति तव सुखी काळजी ही जडेल ॥
'होतें दुःख प्रशमित जरी तीव्र कालक्रमानें ॥
होतां त्याचें स्मरण मग तें वाढतें त्याच मानें' ॥

१०१

आयुर्वेला मदिय सरते तोंवरी काळ कंठीं ॥
घालूं प्रेमें दृढतर मिठ्या तेथ अन्योन्यकंठीं ॥
तेव्हां सारीं विरहकथनें बोलुनी शांत होऊं ॥
आनंदानें प्रणयसुख तें नित्य सेवीत राहूं ॥

१०२

आयुष्याची मदिय घटिका पूर्ण जेव्हां भरेल ॥
तो सोन्याचा दिवस कुलजे ! आपणाला निघेल ॥
अन्योन्यांचीं विरह–हृदयें सत्य होतील एक ॥
कंठू काळा तंववरि दिना मोजुनी एक एक ॥

१०३

मेल्यामागें विसर पडतो मृत्युलोकीं मृताचा ॥
कांहीं काळेंकरुनि पुढतीं प्रश्न येतो हिताचा ॥
होवो कांहीं स्मृति तव परी नित्य होईल मातें ॥
दग्धस्थानीं सुमतरु दुजा तोषवी ना मनातें ॥

१०४

झाला मातें विरह म्हणुनी गाळिले अश्रुबिंदू ॥
नाहीं माझ्या जवळ भरला थोरही ज्ञानसिंधू ॥
आलें दुःखें भडभडुनि तें बोललों काव्यरूपें ॥
कोणामध्यें दिसत नसतीं भिन्न दोषस्वरूपें ? ॥

१०५

येथें माझे लिहित असतां आश्रुबिंद् गळाले ॥
तेंची माझ्या कडुन म्हणुनी नाव याला मिळालें ॥
आहे लोकीं जंववरि सखे ! काव्य माझें जिवत ॥
आहे तूंही तंववरि इथें कीर्तिरूपें जिवंत ॥

---

# "सासुरवास."

( शिखरणी वृत्त )

१

पयोदांच्या पंक्ती वळुनि गगन–प्रांत भरला ॥
निशानाथाचा तें किरण भुवनीं एक नुरला ॥
प्रकाशाच्या तारा दडुन बसल्या सर्व गगनीं ॥
बुडोनीयां गेली गडद तिमिरामाजि अवनीं ॥

२

निशीथाचा होता समय जन निद्रिस्त असती ॥
उलूकांचा होई मधुन भयकारी ध्वनि अती ॥
अशा वेळीं कोणी युवति सदनीं एक बसली ॥
जिच्या नेत्राश्रूंची अजुन दिसते खूण पुसली ॥

३

करातें जोडोनी वर बघतसे म्लान वदना ॥
म्हणे–" देवा ! कैसी तुजसि मम येई न करुणा ॥
दयेची ती नाहीं उठत लहरी बा ! तुज कशी ॥
अभाग्येचा माझा किति तरि बरें अंत बघशी ॥

४

कुणाला म्यां जावें श॰ण जगदीशा तुजविना॥
कहाणी दुःखाची तळमळुनि सांगूं वद कुणा ॥

सुखाच्या शब्दाचा सदनि मज आधार न मिळे ॥
कसें वागूं आता व्यथित-हृदयें सत्य न कळे ॥

५

समस्तांच्या सौख्या किति जपत मी रोज असतें॥
तयांच्या प्रेमाची तरिहि मजला वाण पडते ॥
असें कां व्हावें हें; निजमनि विभो! रोज झुरतें ॥
" करोनी केल्याचें फळ न मिळतां दुःख घडतें " ॥

६

असा नाहीं केव्हां दिन उगवला आत्मभवनीं ॥
समाधानाचा कीं ध्वनि उमटला श्वश्रुवदनीं ॥
तिला मी दोषांची खचित नयनीं मूर्ति दिसतें ॥
" स्नुषा श्वश्रू यांचें सरळ बहुधा फार नसतें " ॥

७

विभो ! सौभाग्याचा तिलक मम जो जीवितसखा ॥
तयाला या साऱ्या कळत असतांही गृहचुका ॥
वदाया येईना उघड जननीला जनभयें ॥
" असो माता कैशी सुत न वदतो सूज्ञ विनयें" ॥

८

परी ती रागानें जळफळतसे पाहुन मला ॥
तिच्या दुःशब्दांनीं खळ न पडतो नेत्रसलिला ॥
मुकाट्यानें सारें श्रवण करुनी काम करते ॥
जिवाची या माझी फड फड अशी रोज घडते ॥

९

कुटाळी मी माझी परिसुनि सदा फार विटलें ॥

किटाळी ती मातें, सुखमय अहा! तर्क फिटले ॥
न टाळी निंदेचा क्रम कुणि जरी कांहिं म्हटलें ॥
चिटाळी जिव्हेला, कटुतरवचें कान किटले ॥

१०

मला जें सांगाया उघड करुनी लाज गमते ॥
अशा आरोपांनीं हृदय मम हें फार जळतें ॥
गृहच्छिद्रं कोणा जवळ वदतां येत नसती ॥
" स्वतांच्या मांडीला उघड करिता लोक बघती " ॥

११

म्हणे—" ही चोरोनी न कळत कुणा खात असते ॥
विचारूं जातांना घुबड टक लावून बघते ॥
करट्या पायांची सदनिं शिरली ही अवदसा ॥
हिच्या पायीं आली खडतर अम्हाला ग्रहदशा ॥

१२

बसे जेवाया तैं लवकर हिचं होत नसतें ॥
परंतू कामाला हिजसि उठणी येत असते ॥
पहावेना बाई! मम नयनिं ही फार सलते ॥
हिच्या आईबापें हिज शिकविले ढंग भलते ॥

१३

नये बोलूं वाटे उगिच अपुलें तोंड दिसतें ॥
तरी " मामी मामी " करित पुढती येत असते ॥
गिळोनी रागाला मुख उघडणें भाग पडतें ॥
तिचें बाई नाहीं तरि मजविना काय अडतें ॥

१४

जरा कामामध्यें चुकत असतां गाल धरिला ॥
भिलावा लावोनी न कळत हिनें तो फुगविला ॥
मला कांहूं देती सुख न जन ते 'दुष्ट' म्हणती ॥
कुभांडीनें हीनें नच खळविली नेत्रगळती ॥

१५

जनांच्या गेहीं का इतर नसती वागत सुना ॥
उपाधी वांचोनी दिन सटविचा जाय न सुना ॥
करोनी एकाचें पतिजवळ हीं दोन कथिते ॥
"तयाला माझी ही वटवट वृथा सर्व गमते ॥"

१६

किती गोष्टी ऐशा अनृत असतांही वदवती ॥
खऱ्या नाहीं खोट्या असतील कुणाला म्हणवती ॥
असत्याचें आविष्करण करण्या मी न शिणतें ॥
तुला सारें देवा! कळत असतें आणि दिसतें ॥

१७

गृहीं आया बाया जमवुन तयांच्या जवळ या ॥
विपर्यस्ता गोष्टी रचुन वदते सोडुन नया ॥
कपाळीं लावोनी निजकर बसे ऐकत उगी ॥
"स्वभावाला नाहीं म्हणाति अगदीं औषध जगीं" ॥

१८

कुणाच्याही चित्तीं मज विषयिं ना आदर वसे ॥
विदोषी दृष्टीनें सकल जनता पाहत असे ॥

पथीं येतां जातां इतर कुमती लोक हंसती ॥
टवाळांची आहे कितिक भरली येथ वसती ॥

१९

मुखें माझी निंदा करुनि म्हणती मीच कुलटा ॥
जगाचा हा आहे मज गमतसे न्याय उलटा ॥
किती त्या निंदेचे हृदयिं बसती तीव्र चटके ॥
कुणाला दोषावें असुनि अपुलें दैव फुटकें ॥

२०

दयाळा! निष्पापी बहु अनपराधी असुनियां ॥
न या लोकां आली मज विषयिंची अल्पहि दया ॥
नयानें वागोनी जरिहि यश गेलें मम लया ॥
तयाचा तू साक्षी; तुज कळतसे सर्व सदया ॥

२१

जयाचा तोंडानें मजसि नच उच्चार करवे ॥
असा मोठा खोटा मुळि न मनिं आरोप सहवे ॥
कडू निंबाचा तो पचविन कसाही रस परी ॥
विषाच्या पेल्याला पचवुं शकतो कोण उदरीं ॥

२२

छळाच्या दारूला वरुन ठिणगी तीव्र शिवली ॥
विषारी गोळी ती अहह ' हृदयामाजि शिरली ॥
शरीराचा झाला अतिशय दहा काळिज फुटे ॥
सुटे आशा सारी सकल जग आतां मज सुटे ॥

२३

मला बाबांनीं हें स्थळ उचित पाहून दिधलें ॥

कपाळीं दैवानें उलट असले भोग लिहिले ॥
करो आप्तप्रेमें कितिहि चतुराई स्वजन तो ॥
अभाग्याच्या भाग्या सहज फिरवूं कोण शकतो ॥

२४

गृहीं माझें ओझें सतत नवमासावरि जिणें ॥
सुखानें साहोनी जनन दिधलें त्या जननिनें ॥
उभी आहे वाटे पुढति नयनीं येउन सती ॥
जिच्या सत्प्रेमाला इतर उपमा योग्य नसती ॥

२५

नको आई! शोकें निज–नयन बाष्पाकुल करूं ॥
नको ताता! माझ्यास्तव हृदय तूं दुःखित करूं ॥
दिवाळीच्या भेटी अजुन घडल्या नाहिंत पुन्हां ॥
अतां दादा ओवाळणि मजविना घालिल कुणा ॥

२६

पतीच्या गेहीं जी विमल यश जोडी कुलवती ॥
अशा कन्येचें त्या जननि–जनकां भूषण अती ॥
खरी वा खोटीही जरि जगतिं दुष्कीर्ति पसरी ॥
बरी ती मेलेली श्रवण करणें त्या अवसरीं ॥

२७

अहा! झोंपी गेला शयननिकटीं हा चिमुकला ॥
भुकेनें बाळाचा रडुनि रडुनी कंठ सुकला ॥
मुला! जागा होई नयन उघडीं योग्य समयीं ॥
स्तनाचें हें प्राशीं अमृत अपुली भूक शमवी ॥

२८

मुला! या हास्यानें हृदय नच मायावश करीं ॥
बघोनी घेई ही तव जननदात्री क्षणभरी ॥
मलाही पाहूं दे वदन तव डोळे भरुनियां ॥
कशाच्या बा! भेटी घडतिल आतां त्या फिरुनियां ॥

२९

जयानें या लोकीं तुज चिमुकल्या! जन्म दिधला ॥
करो प्रेमें तोची सदय तव संगोपन भला ॥
सुखें घेई निद्रा मृदुल शयनीं या निजविलें ॥
आतां येऊं ना मी? मज अधिक ना बा! वदवतें ॥

३०

उभी राहे पाहे नयन भरुनी त्या शिशुकडे ॥
तदा वक्षाचे ते फुटुन शतधा होत तुकडे ॥
तिचा मातृप्रेमें पद न उचले तेथुन पुढें ॥
करानें दोन्ही ती नयन अपले झांकुनि रडे ॥

३१

पुसोनी नेत्राश्रू जवळ बघिला निद्रित पती ॥
हळू जाई त्याच्या शयननिकटीं कंपित सती ॥
म्हणे येतें नाथा! मजवरि करावी अनुदया ॥
नकोसा हा झाला मजसि अगदीं जीव सदया! ॥

३२

विषारी वल्ली ही अमृतफल दायी न गमली ॥
प्रपंचोद्यानाची रमणिय न ती कांति खुलली ॥
सुखाचा लाधेना क्षण मजमुळें त्रस्त वपुला ॥

म्हणोनी मी आजी सरळ करितें मार्ग अपुला ॥

३३

मनोभावें सेवा करुन सुख द्यायास झटलें ॥
तुम्हापाशीं केव्हां तरि न अपुलें दुःख म्हटलें ॥
प्रिया! हें साहेना खचित अपमानास्पद जिणें ॥
अजी मृत्युद्वारीं म्हणुनि शिरतें निर्भयपणें ॥

३४

तुम्ही आहां निद्रावश म्हणुन हें पत्र लिहुनी— ॥
उशाशीं ठेवीं कीं सहज बघतां येइ नयनीं ॥
उद्यां माझ्यासाठीं विकलहृदयें खेद न करा ॥
क्षमा व्हावी मातें विनति करिते जोडुनि करा ॥

३५

प्रिया! सांभाळा हा मम निरपराधी चिमुकला ॥
अभागी बाल्यत्वीं निजजननिला हाय! मुकला ॥
उद्यां 'आई आई' करित मज बाहील वदनीं ॥
बसायाचीं स्थानें सकल मम शोधील भवनीं ॥

३६

निराशेनें आजीजवळ बसुनी बालवचनें ॥
कुठें गेली 'आई' म्हणुनि पुसतां म्लानवदनें ॥
तिच्याही येई त्या अदय हृदयीं शोक भरुनी ॥
असें होतां होतां विसर मग जाईल पडुनी ॥

३७

विचारांचा येथें सहजचि तिचा ओघ फिरला ॥
म्हणे "सासूबाई! बहुत छळिली दीन अबला ॥

मनस्तापाला जी सतत तमच्या कारण असे ॥
तिचें गेहीं आतां अशुभ न पुन्हा दर्शन दिसे ॥

३८

जरी दुःशब्दांचे जळजळित कीं डाग दिधले ॥
मुखानें कोणाच्या जवळ न तरी शब्द बदलें ॥
अविंधाच्या गेहीं म्हणति जन कीं गाय पडली ॥
तिला मृत्यूवीण स्वहितगति नाहीं उमजली ॥

३९

मृगी व्याघ्रीच्या ही जणुं भयद गेहांत शिरली ॥
तिच्यायोगें तीची मरणघटिका पूर्ण भरली ॥
मुखानें जे केले व्रण अजुनि ती आग भडके ॥
विनाशाच्या पूर्वी विकल शरिरीं जीव धडके ॥

४०

मला वाटे जन्मान्तररचित जें वैर सगळें ॥
तुम्हीं मातें भारी छळुनि इहजन्मीं उगविलें ॥
तुम्हाशीं कोणाचें अहह ! चुकुनी वैर न घडो ॥
“ महामाया-दृष्टी शिव ! शिव ! न कोणावरि पडो ॥

४१

असें मर्यादेला त्यजुनि वदणें योग्य नसतें ॥
मनामध्यें दुःख-स्मरण घडतां चित्त जळतें ॥
कशाला मी बोलूं ? मम निकट संबंध तुटला ॥
क्षणाच्या वास्तव्यास्तव उगिच हा ताप कुठला ? ॥

४२

असें बोलोनी ती क्षण चहुकडे पाहुन निघे ॥

तरी जातां जातां निजशिशुस डोकावुन बघे ॥
मुका घेवोनीयां झटकन तिचे पाय वळले ॥
मुलाच्या त्या गालावरि परि तिचे थेंब गळले ॥

४३

गृहद्वारीं येई भ्रमित गृहदेवी गुणखनी ॥
तदा झाला मोठा 'कड कड' असा शब्द गगनीं ॥
गळाले मेघांचे सलिल-कण वीजा चमकती ॥
अधःपातापूर्वी अशुभ शकुनें फार घडती ॥

४४

जिच्या मर्यादेचा पदर चुकुनीही न ढळला ॥
तिचा गेहांतुनी हर! हर! कसा पाय पडला ॥
मनोवृत्ती भारी नवतरुणिच्या स्निग्ध असती ॥
अनर्थांचीं बीजें असहनिय जाचांत असतीं ॥

४५

नभामध्यें होतें घनपटल तेव्हां पसरलें ॥
दिसेना डोळ्यांना निबिड तम सर्वत्र भरलें ॥
सुटे सोसाट्याचा पवन शरिराला न सहवे ॥
घरांतुनी कोणा मुखहि नच काढून बघवे ॥

४६

विजेच्या तेजानें जलमय दिसे मार्ग दुरुनी ॥
नद्या नाले गेले धवल सलिलें पूर्ण भरुनी ॥
अशा त्या रात्रीच्या भयद समयीं द्वारसदनीं ॥
उभी होती साध्वी करित अपुला निश्चय मनीं ॥

४७

कदी कादोनी ती झळुच पुढलें दार उघडी ॥
कटीला खोंवोनी पदर मग घेई पथिं उडी ॥
फवारे वृष्टीचे मृदुल तनुला फार बसले ॥
तुफानाचा वारा सुटुनि शरिरीं शीत भरलें ॥

४८

पदीं येणारा तो उचलुनि करीं घोळ धरिला ॥
उभी ती राहीना मग क्षणिं तिनें मार्ग धरिला ॥
पुन्हा झाला मोठा 'गड गड' असा शब्द वरती ॥
गृहाची लक्ष्मी ही गमन करिते चंचलमती ॥

४९

पुढें मार्गे पाहे दचकुनि मधें थांवत असे ॥
कुणी नाहीं ना कीं बघत मजसी; संशय वसे ॥
गृहामार्गे गेलीं परिचित गृहें मार्ग सरले ॥
नदीच्या वाटेला 'हर! हर!' तिचे पाय शिवले ॥

५०

संभोंतीं भेकांचे 'डर डर' असे शब्द उठती ॥
जयांतें ऐकोनी श्रवणयुगुलें फार चिटती ॥
निशेचाही 'किर्र' ध्वनि उपजवी भीति हृदयीं ॥
सतीच्या धैर्याचा तट न फुटला घोरसमयीं ॥

५१

वरूनी पाण्याच्या सरिवर सरी येत असती ॥
अधोभागीं दोन्ही चरण चिखलामाजि भरती ॥
निसर्गानें केली तिजसि फिरवाया कुशलता ॥

'कृतांताकृष्टा जी सुटत नसते ती तनुलता' ॥

५२

कुठें खाचेमध्यें न कळत तिचा पाय पडतो ॥
कुठें उंचाहूनी सरकन पुढें तो घसरतो ॥
अहा ! गेला शोला श्रमिततनु भूमीवरि पडे ॥
उठाया येई ना पद उचलताना धडपडे ॥

५३

नदीचा ऐकूं ये दुरुनि बहु 'सूं सूं' ध्वनि असा ॥
तयाच्या संधानें क्रमण करिते मार्गहि तसा ॥
भिजोनी गेलेलें वसन पिळुनी ती मुख पुसे ॥
निहाळूनी पाहे तटिनिजल कांहीं तंव दिसे ॥

५४

चहूं बाजूचें जें जल मिळुन ओहोळ बनती ॥
नदीच्या पात्राशीं चहुंकडुन येऊन मिळती ॥
अशा स्थानांतुनी पुढति सरली क्रांत ललना ॥
महायासें आली जवळ बघिला भीषणपणा ॥

५५

नदी चाले फोंफावत तरुण नागीण जहरी ॥
शिरूं पाहे मोठ्या चपलगतिनें भूमिकुहरीं ॥
जिनें कित्येकांचे निजपथिं अहा! प्राण हरिले ॥
विवेकभ्रष्टेन तादियतटसांनिध्य वरिलें ॥

५६

खळे दृष्टी कांहीं हळु हळु नभोभाग निवळे ॥

गळे वृक्षांतूनी सलिल पवनाच्या गतिमुळें ॥
खळें चंद्राचें तें गगनि विलसे शुभ्र पिवळें ॥
पळे दूरान्तीं तिमिर शशिच्या त्या भरवळें ॥

५७

प्रकाशानें मोठें भयद तटिनीरूप दिसलें ॥
जणों मृत्यूचें तें मुख पसरुनी तेथ बसलें ॥
उडी घ्याया कैसा तरिहि अबलेचा पद वळे ॥
चढे उंचस्थानीं खडक धरुनी ती निजबळें ॥

५८

कला जाणे ना ती दरडिचढण्याची शशिकला ॥
कळा थंडीच्या त्या तिजसि करिती गात्रविकला ॥
कळा तोंडाची ती उतरुनि तिचा कंठ सुकला ॥
कलास्वामी दुःखें निटिलिं लिहुनी फार चुकला ॥

५९

महाकष्टें गेली वर चढुन लावण्यलतिका ॥
अहा पाषाणीं त्या जणु विलसली पुष्पकलिका ॥
सुटोनी गेलेले कुरळ कच बांधी निजकरें ॥
पचंगा बांधोनी युवति वदली गद्गदभरें ॥

६०

दयेचा बा! देवा! तुजजवळ ठेवा वसतसे ॥
कृपासिंधू ऐसें रुचिर यश मी ऐकत असें ॥
कशी गावी कीर्ती विमल तव ती सद्गुणमयी ॥
मनोभावें येतें शरण चरणीं अतसमयीं ॥

६१

प्रभो ! जीवित्वाचा बहुत तिटकारा मज गमे ॥
विदेहि मी झाल्याविण हृदयिंची आग न शमे ॥
करंट्या भाग्यानें उगिच जगुनी काय करणें ॥
बरें त्याच्या पेक्षां तव चरणसान्निध्य करणें ॥

६२

असे ठावी तूतें प्रिय तव सुता शुद्ध विमला ॥
तुझ्या या कन्येचें अवन करणें योग्य तुजला ॥
अहा ! येशी स्वर्गावरुन मजसाठीं प्रभुवरा ॥
पहा मीही आले.... .... .... .... ॥

६३

अहा ! झाला तेव्हां ध्वनि जलरवामाजि शिरला ॥
प्रवाहीं थोडासा पडुनि खळगा तोहि भरला ॥
निशानाथानें तें मुख लपविलें मेघपटलीं ॥
कवीच्याही नेत्रीं सलिल भरलें बुद्धि खुटली ॥

# सीता-शपथ.

विषयसूत्रः—श्रीरामचंद्र लंकेहून परत अयोध्येस आल्यावर कैकयीनें भर सभेंत सीतेच्या पातिव्रत्यासंबंधानें संशय प्रदर्शित केला कीं, 'सीतेसारखी तरुण सुंदर स्त्री रावणाच्या नगरांत शुद्ध कशी राहिली असेल ? सापत्न सासूचा हा दुष्ट आरोप ऐकून सीतेनें खालीं उतरून भर सभेंत आपली माता पृथ्वी हिचा धांवा केला. तनयेच्या गद्गद वाणीनें वसुंधरा कंपित होऊन दुभंगली व वर आली. त्या भुवनैकसुंदरीनें वैदेहीस हृत्पद्माशीं कवटाळून धरिलें आणि सर्वांसमक्ष तिला आपल्या पोटांत घेऊन सीतेच्या पातिव्रत्याची शपथ पुरी करून तिचें चारित्र उज्ज्वल केलें.

(चाल—भूपती खरे तें०)

अरिकंदन करुनी रघुनंदन गेहाला ।
लंकेवरि डंके वाजवुनीयां आला ॥ १ ॥
मरुयात अयोध्या नटली सजली होती ।
तिज नभीं लाजल्या सुरयुवतींच्या पंक्ती ॥
गंधानिल सोडी लहरींचा उल्हास ।
जणुं आकाशांतिल देवानंदोच्छ्वास ॥
'श्रीरामचंद्रकी जय' जनवाणी नाचे ।
विरले गानध्वनि किन्नर-गंधर्वांचे ॥
चौदा वर्षांनंतर पुत्रांची भेट ।

कौसल्या घे वात्सल्य-सुधेचा घोट ॥
वामांग भूषवी गौरतनू वैदेही ।
पंचायतनांतिल कपि चरणातें सेवी ॥
सौमित्र भरत शत्रुघ्नादिक परिवार ।
मंत्री सचिवांनीं गजबजला दरबार ॥
वेदाशिर्वचपटु वसिष्ठ ऋषिजन-वाणी ।
मंगलधामाचें भविष्य मंगल वाणी ॥
इंद्रासह करिती सुर सुमवृष्टी वरुनी ।
रुमझुमती अप्सरसांचें नूपुर चरणीं ॥
नारद तुंबर चढविती विणेची तार ।
चालला शारदा वीणेचा झंकार ॥

श्रीरामाला बघण्याला आल्या रामा ।
कौसल्या कैकयि मागें बसल्या शामा ॥
निभु तो तर होता मेघासम नवनील ।
ती चमकत होती विद्युत्सीता धवल ॥
अव्यग्र दृष्टिनें बघती तरुण मयूरी ।
पदरानें पुसती आनंदाचें वारी ॥
तेजोमय होते पडदे जे सुटलेले ।
ते नीलकटाक्षें नीलवर्णमय झाले ॥
सीता धवलांगी मधुनी मधुनी पाहे ।
वाटे मेघा आडून चंद्र डोकावे ॥
फिरवी भ्रुकुटीच्या इंद्रधनुःखंडांना ।
लज्जेच्या उमटति छटा तयावरि नाना ॥

नयनीं लसती कनिनीका गोलाकारा ।
लुकलुकती जैशा नीलाकाशीं तारा ॥
बांकेड अलक लोंबती मुखावर खालीं ।
वाटे कमलांभंवती जमली भृंगाली ॥
कचबंधावर मालती सुमाचा हार ।
विलसे चंद्राची कृष्ण ढगावर कोर ॥
तत्वज्ञ जनक तद्धवल कीर्ति जी मोठी ।
पावे रूपाला वसुंधरच्या पोटीं ॥
कौमुदी शरत्कालची तिला पण सारी ।
हिरकणी कांतिची चमक दृष्टिला मारी ॥
भारुनि पावित्र्गें सर्वांत करणांना ।
आकर्षित होती युवयुवतीनयनांना ॥
लागेल दृष्ट हिज आज खरोखर बाई ।
मीतिवचनें वदली कौसल्या आई ॥
साम्राज्ञि-पदास्थित सीतेला नयनांनीं ।
पाहवे न जीतें कैकयि ती पापीणी ॥
नागिणी विषारी दंश तियेनें केला ।
सीताशपथेचा प्रकार मोठा घडला ॥

कैकयीकपाळीं मोठ्या आठ्या पडल्या ।
दुर्मतिलतिकेला विषमय शाखा फुटल्या ॥
ते तीव्र मत्सरग्रासितभ्रूविक्षेप ।
धुमसला अंतरीं सापत्न याचा कोप ॥
अतिभीषण शब्दें विजली ती कडकडली ।

अंतःपट सारुन सभामंडपीं शिरली ॥
बोले—:" वैदेही पतिव्रता ही कैशी ।
साम्राज्ञिपदावर शोभत नाहीं विवशी ॥
जी तरुणी रमली लंकेशाच्या भवनीं । ?
ती शुद्ध राहिली असेल कैशी भुवनीं ॥
हातीं सांपडली कळी जया रमिकास ।
सोडील घेतल्यावीण काय तो वास ॥ ?
फसवून मिळविला सुधाकुंभ नीचानें ।
का मुखीं चाखला नसेल सांगा त्यानें ॥ ?
राहुनें गिळितां धवल विधूची कलिका ।
ती ग्रहण लागल्याविण लोकीं राहे कां ? ॥
परकक्षेमध्यें कंठ जिचा सांपडला ।
सुंदर तारेचा अधःपात ठरलेला ॥
जरि सीतावचनीं ठेवावा विश्वास ।
कोणती जारिणी वदते निजकर्मास ? ॥
जें आसन व्हावें साध्विपदें भूषीत ।
बैसे त्यावर सीता रावण-दूषीत ॥
म्हणविती स्वतांला विद्वन्मुकुट महात्मे ।
ते करून बसले मतिविक्रय का यत्नें ॥
वैदिक कसचे वदवती पोटासाठीं ।
मोहोळाभंवतीं मधमाशांची दाटी ॥
लांगूलचालनीं उपजीवन करणारे ।
ते निस्पृहतेचे वच कसचे वदणारे ? ॥

जर असेल सीता पतिव्रता देहानें ।
तर सतीत्व दावावें उतरोनी तीनें ॥ "

ती असें वदोनी बघे सभोंती जेव्हां ।
खळबळ झालेली दिसून आली तेव्हां ॥
दुर्वाणी तापप्रद ज्यांना सहवेना ।
ते तपोनिष्ठ लाविती हात कानांना ॥
श्रीरामचंद्र जरि गंभीर सागर होते ।
या झंझानिल लहरींनीं डोलत होते ॥
इतरेतर जनता अपसांत कुजबुजली ।
युवतीसमुहीं कौसल्या धस्‌धस्‌ रडली ॥
कितिकांच्या दृष्टी भूमिसुतेवर जडल्या ।
ही काय करील या संशयांत त्या पडल्या ॥
सीता संध्येसम लाल चंडिका झाली ।
कोपानें कांपे थरथर देवी काली ॥
झटक्यासरसी उतरली वरोनी खालीं ।
पतिकंठार्पित निजबाहू सोडुनि आली ॥
विश्वाची माता विचार करि मनिं साचा ।
कीं समय नव्हे हा उलटा कोपायाचा ॥
भर सभेंत दोषारोप कुणाला खपती ।
कांचेसम असते नाजुक अबला जाती ॥
संकटसमयीं शरणागत जावें कोणा ।
प्रभु रामचंद्र तर शंकिजनांचा राणा ॥
कसल्याही वेळीं वात्सल्याची जननी ।

पुण्याचरणीं कुरवाळी कर पसरोनी ॥
ही जाणोनी ती धावा करि पृथ्वीचा ।
माते ! तनयेवर प्रसंग दुष्कीर्तीचा ॥
तूं क्षमाशील तुज 'क्षमा' शोभतें नांव
मद्दोषचि नाहीं विदित तुला सतिभाव ।
तुजसमक्ष बसल्यें होत्यें ना लंकेंत ।
स्वदेह भिजविला रोज हुंदके देत ॥
नीचांस अवास्तव दोष स्फुट करितांना ।
अल्पही पुरेसें कारण होतें त्यांना ॥
ताडीच्या खालीं दैवें कोणी बसला ।
म्हणतिल ताडीचा होता हातीं प्याला ।
तरुणाशीं तरुणी सहजी बोलत राहे ।
देतील रूप प्रेमाचें मणयाला हे ॥
ज्यांत ना स्वार्थ परमार्थ असा उद्योग
करतील लावितिल सूज्ञामार्गे भोग ॥
मी कायावाचामनें जरी रघुनाथ ।
आराधित केला असेल निजहृदयांत ॥
जरि पतिव्रतेचा धर्म कठिण या लोकीं ।
प्रतिपालित केला असेल लंकाशोकीं ॥
तरि निजहृदयाच्या कमलीं घेईं मातें ।
या दुष्ट जनांचे दोष न सहती मातें ' ।

ऐकतां सुतेची गद्गदकंठें वाणी ।
कंपित होवोनी दुभंग झाली धरणी ॥

गंभीर शब्द दशांदिशीं पसरला जेव्हां ।
विस्मयस्तिमित जन झाले सारे तेव्हां ॥
भुवनैक सुंदरी वसुधरा वर आली ।
हस्तपद्माशीं वैदेहीला कवटाळी ॥
ज्योतिर्माला ग्रहमंडल भूषविणारी ।
मणिरचितहार कंठीं धारण करणारी ॥
झगझगती किरिटावरि जणु कोटी सूर्य ।
विधिकृत नव्हतें तें नैसर्गिक सौंदर्य ॥
तें दिव्य तेज डोळे दिपवोनी सोडी ।
झांकली दृष्टि पळभर ना कोणी उघडी ॥
तापसी वृत्तिनें गिरिकंदरिं वसणारे ।
ज्यांवर वाहति ना सुखदुःखाचे वारे ॥
तेही 'हा ! हा !' म्हणुनी खेदानें वदले ।
निज जटाभार सांवरीत पुढती सरले ॥
चौदा वर्षें उपवासें क्षीण जहाला ।
तो लक्ष्मण हनुवरि बोट ठेविता झाला ॥
शिशिरानलत्रस्त प्रभमुखकमलच्छाया ।
विस्मय भीती प्रीती ये अवलोकाया ॥
प्रश्नार्थक भावें रघुनायक तो पाहे ।
कीं पुसे " सांग मजकडे दोष कां आहे ? ॥
विरहाच्या पावकशय्येवरती दायिते ! ।
कां पुन्हां तळमळावया लाविशी सीते ! ॥"
चेतोल्हासिनि हृदयेश्वरि ती वैदेही ।
निरुपायदृष्टिनें जीवितनाथा पाही ॥

चालली मनोमोहिनी अयोध्याराणी ।
भाळास लागले हात सवलें पाणी ॥

ऐरणीवरी दावितां स्वतांच्या शीला ।
सोडावें लागे कोंदण हो! हिरकणिला ॥
ज्योतीस स्वतांला जाळुन घ्यावें लागे ।
तन्निकटीं तेजोवलय न त्याविण वागे ॥
उज्ज्वल चरिताची येइ परीक्षा वेळ ।
चालत नसती दुर्बळ मायेचे खेळ ॥
तनुची जीवाची ना परवा कोणाची ।
सत्वाची किंमत तैं संरक्षायाची ॥
पुत्रीसह झाली वसुंधरा संगुप्त ।
होई कैकयीवर सभा अती संतप्त ॥
कैकयिदुष्टेचा खेळ असा हा झाला ।
साध्वी सीतेचा कलंक धुतला गेला ॥
परिषद्दुःशकातमोपटाचि निस्तारिला ।
भारतांत आर्याकीर्तिध्वज फडफडला ॥
अग्नींत घातली सुवर्णकंठी व्यर्थ ।
मूळ द्रव्याचें होतें नाम यथार्थ ॥
छलकांच्या पाषाणीं तेजस्वी जनता ।
निजगुण घांसोनी पावे विद्वत्समता ॥
अन्यत्र मिळेना जोड पवित्रपणास ।
ऐसा आर्यांचा गतकालिन इतिहास ॥
माझ्या देशांतील भगिनी सीता व्हाव्या-
इच्छा ही मम कीं-त्यावर कविता गाव्या ॥

# "कृष्णाकारुण्य"

भगिनीची लाज तुझ्या ठेव बा मुरारी ॥
घाल उडी संकटांत कुंजवन विहारी ॥ ध्रु० ॥
दु:शासन करधृत हा
नीवीचा बंध पहा
सुटला यदुनाथ अहा
धांव व्रजविहारी—घाल उडी संकटांत०.... ॥ १ ॥
पाहुनिया क्रूर अधम
चैतन्यचि गेले मम
शरण तुला पुरुषोत्तम
आज मला तारी—घाल उडी संकटांत०.... ॥ २ ॥
केस केशवा सुटले
अधमानें कर्षियलें
वसन तेंहि बा गळलें
कवण दैन्यहारी—घाल उडी संकटांत०.... ॥ ३ ॥
दासी मी तव असुनी
दासी हा मज वदुनी
दोषाचा होइ धनी
पूतनांत कारी—घाल उडी संकटांत०.... ॥ ४ ॥
अबला मी उघड परी
उघडी हा मजसि करी

उघडीं नयनांस हरी
कालियाविदारी!—घाल उडी संकटांत० ॥ ५ ॥
उघडी ही मम काया
या समया झांकाया
तुजवांचुनि यदुराया!
कोण लाजकारी!—घाल उडी संकटांत० ॥ ६ ॥
नाथ असुनियां अनाथ
झालें मी, गोपिनाथ!
तूं तरी अनाथनाथ
होइं साह्यकारी—घाल उडी संकटांत० ॥ ७ ॥
होते जे धर्मराज
ते झाले रंक आज
पार्थसम पुरुषराज
पडति ते विचारीं—घाल उडी संकटांत० ॥ ८ ॥
भीमाची तीक्ष्ण गदा
कांपवि शत्रूंस सदा
पाहे ती मम विपदा
आज निराधारी—घाल उडी संकटांत० ॥ ९ ॥
काळाचे असति काळ
सोभतीहि लोकपाळ
अबलेचे मदिय हाल
एक ना निवारी—घाल उडी संकटांत० ॥ १० ॥
नीतीचे शंख किती
फुंकिति निःशंकमति

तेच करिति परि अनीति
मूढ दुराचारी—घाल उडी संकटांत० ॥ ११ ॥
देती कर्तव्यपाठ
वर्तनांत सरसपाट
बडबडती व्यर्थ भाट
गर्व पात्र भारी—घाल उडी संकटांत० ... ॥ १२ ॥
पापाच्या मार्गानें
जाई निर्भयतेनें
व्यक्ती निजकर्मानें
नाश पावणारी—घाल उडी संकटांत० ॥ १३ ॥
पंकिलांत रुपलेली
कलंककरीं पडलेली
धेनु अशी नडलेली
कोण ती न तारी—घाल उडी संकटांत० ...॥ १४ ॥
असशिल स्वर्गांत जरी
उघडुनियां दार सरी
बैसुनियां गरुडावरि
घेइ या भरारी—घाल उडी संकटांत० .... ॥ १५ ॥
भुजगाच्या शयनावरि
निजला असशील हरी
ऊठ ऊठ या! झडकरी
भगिनि हाक मारी—घाल उडी संकटांत० ... ॥ १६ ॥
सोडुनियां सुख-विलास
भजकहृद सुखनिलास

ममचि दैवदुर्विलास
बघसि कैटभारी—घाल उडी संकटांत० .. ॥ १७ ॥
केव्हां तू गर्जलास
गगनांतुनि उतरलास
स्तभांतुनि प्रगटलास
नृसिंहावतारी—घाल उडी संकटांत० . . ॥ १८ ॥
पीतांबर नेसुनियां
वैजयंति घालुनियां
येउनि करिं मज अभया
चक्रगदाधारी—घाल उडी संकटांत० ... ॥ १९ ॥
घननीळ नीळ प्रभा .
दाखवुनी ठाक उभा
थक्क करीं सर्व सभा
मोह पाषणारी—घाल उडी संकटांत० . ॥ २० ॥
खालीं मुख घालुनियां
बसले जे या ठाया
गुरुजन ते वद्वाया
प्रश्न तू विचारीं—घाल उडी संकटांत० .. ॥ २१ ॥
दीनांचा कैवारी
दुष्ट जनांचा वैरी
भक्तांना सुखकारी
तू गजार्तिहारी—घाल उडी संकटांत० . ॥ २२ ॥
शाम देवकी-कुमार
गोपींचा कंठहार

उतराया जगत-भार
गोकुळावतारी—घाल उडी संकटांत० ॥ २३ ॥
लोकोत्तर तव लौकिक
गाती किन्नर गायक
स्वर्गाचा तूं नायक
लौकिकानुसारी—घाल उडी संकटांत० — ॥ २४ ॥
अश्रूंच्या सुममाळा
तव चरणीं गोपाळा
वाहियल्या वेल्हाळा
कार मनोहारी—घाल उडी संकटांत० ॥ २५ ॥
येणें हें तुजसि उचित
येशी ना जरिहि त्वरित
ठावी तुज मी न खचित
जीव ठेवणारी—घाल उडी संकटांत० ॥ २६ ॥
वासुदेव करुणाकर
नंदलाल मुरलीधर
गोपसखा तूं गिरिधर
संकटास वारी—घाल उडी संकटांत० ॥ २७ ॥
काय सुभद्राच खरी
आवडती भगिनि जरी
कासयास मजसि तरी
ठकाविलें बिहारी—घाल उडी संकटांत० ॥ २८ ॥
तीच इथें जरि असती
कठभरें बोलविती

बसतां कां स्वस्थमती
सांग तूं मुरारी—घाल उडी संकटांत० ... ॥ २९ ॥
अग्नीविण कढ नाहीं
मायेविण रड नाहीं
सत्य गमे मजलाही
वाक्य हें प्रचारी—घाल उडी संकटांत० ... ॥ ३० ॥
पाण्याहुनि रक्त असे
दाट; म्हणति सुजन असें
अनुभवुनी मनचि कसें
जाहलें विकारी—घाल उडी संकटांत ॥ ३१ ॥
भोळी मी द्रुपदसुता
सर्वसाक्षि तू असतां
दाविशि कां निष्ठुरता
दिव्यकिरिटधारी—घाल उडी संकटांत० ॥ ३२ ॥
द्वारकेश गहिंवरला
गुप्तरूपिं अवतरला
झांकी निजभगिनीला
राजसभाद्वारीं—घाल उडी संकटांत० ॥ ३३ ॥
मधुर मंजु मुरलिगान
विसरुनि गेलास भान
मातेपरि तवचि ध्यान
कंसच्छेदकारी—घाल उडी संकटांत० ॥ ३४ ॥

# "गारदी कटोनी मेला"

१

जातीचा खान परंतू— जो भारत-भू सुत होता
जो तिच्याच अंकावरतीं— दुग्धामृत प्याला होता
यत्प्रवाह नव रुधिराचा— नस नसांत खेळत होता
जननी-ऋण फेडायाला
स्वामिभक्ति दावायाला
भाऊसह पानपताला
इब्राहिम सागिनवाला— गारदी कटोनी मेला

२

निज कवायती फौजेचा— चौफेर बांधुनी गोळ
चालला अघाडीवरती— वाजवीत पडघम ढोल
भाऊस सलामी देतां— वदला शेवटचे बोल
" मी धर्माचा इस्लाम
नाहीं परि निमकहराम
जरि झालों नामोहरम
संपादिन या कीर्तीला— गारदी कटोनी मेला

३

ही वेळ न बोलायाची— कर्तव्य समय हा खान !
हा समोर आतां आहे— घोडा आणि मैदान !!

पाहीन ठेवितो कैसा— या भाऊचा अभिमान "

चढवुनी मिशीवर हात
बोले तो आवेशांत
येतील शब्द कानांत

'विजयी झाला वा गेला— गारदी कटोनी मेला'

४

मांडीच्या खालीं घोडा— फुरफुरुनी नाचत होता
टांचेनें उडवित गेला— डोळ्यानीं बघतां बघतां
तो मेघ वायुवेगाचा— वीजेनें भरला होता

'कडकड' या आवाजानें
दशदिशांस भरिलें ज्यानें
अंतींही तो जोमानें

गगनांत निघोनी गेला— गारदी कटोनी मेला

५

भेसूर गर्जना व्हावी— नाचावी चपला वरतीं
वृष्टि श्रावण महिन्याची— खंड ना जियेला पडती
खालतीं रक्त मांसाच्या— चिखलानें भरली माती

तो घटोत्कची अवतार
गारदी रिसालेदार
रक्ताची गाळित धार

गर्दीतचि गारद झाला— गारदी कटोनी मेला

६

गिलच्यांच्या तोफावरतीं— फेकतां नेमकं भाले
होऊन तयांच्या ठिकऱ्या— अस्मानीं तुकडे गेले

अफगाणी गोलंदाज— होते कीं नव्हते केले
तें युद्ध तोफखान्याचें
चातुर्य खानखानांचें
उलटले डाव युद्धाचे
गडला तथुनि ना ढळला— गारदी कटोनी मेला

७

तें दैवाचि फिरलें हातें— करणार काय त्या कोणी?
आकाश फाटलें त्याला— लावावें ढिगळ कुठोनी?
फुटतां सागर रोधावें— खडकानें किति अडवोनी?
विश्वास सोडुनी गेला!
भाऊ न दिसे नयनाला!!
पण स्वामीच्या कार्याला
लढला तेथेंची निजला— गारदी कटोनी मेला

८

होळीच्या होळकरांची— आधींच परतली स्वारी
बिजलीवर होउनि स्वार— फिरली शिंद्यांची स्वारी
रणरंग पाहुनि घेती— एकेक पाय माघारी
समशेर बहादर पडले
तेजस्वी तारे तुटले
पेंढारी धावत सुटले
रणसिंह-न परिचळवळला— गारदी कटोनी मेला

९

शिंद्यांची दृष्टी गेली— इब्राहिमखानावरतीं
पगडीचे पेंच सुटोनी— रुळती मानेच्या भंवतीं

अर्धीच जळाली दाढी— तोंडीं फेंसाची भरती
परि कवायती फौजेशीं
दे बरचेवर हुकुमाशीं
भिडवी नेउन गिलिच्यांशीं
नखशिखांत शौर्यें भ्याला— गारदी कटोनी मेला

१०

शूरानें शौर्य वखाणी— शाहवे न त्या शूराला
शाबास! खानसाहेब''— शहिंवरुनी शिंदा वदला
तो जंगबहादुर मान— लववोनी थोडा हंसला
पाटील चालला तुम्ही
येऊं न शके परि हा मी
कळवा नानास सलामी
सांगा कीं,—'नाहीं हटला— गारदी कटोनी मेला

११

तरुण्याच्यास ठीं ज्यानें— अडवून कितीदा धरिलें
हट्टहि तुम्ही लाडानें— ज्याचे सगळे पुरवीले
आपुल्या कृपेची छाया— ज्यावरी सर्वदा ढाले
बेइमान नाहीं झाला
जागला खऱ्या निमकाला
घनघोर अशा समयाला
हें कळवा हो! नानाला— गारदी कटोनी मेला

१२

रडतील बायका पोरें— जा सांभाळा जा त्यांना ?
द्या सलाम शेवटचा हा— मज मारुं द्या गिलिच्यांना

शिपायांनीं मुख फिरविलें— लावून पदर डोळ्यांना
चालली लांडगे तोड
आली बाजू बिनतोड
सर्वस्वी झाला मोड
विच्छिन्न होउनी पडला— गारदी कटोनी मेला

१३

हिंदूंच्या मानेवरती— ठेवोनी अपुली मान
देशाचा अमुचा भाई— निजला इब्राहिमखान
जातीचा पडदा आम्ही— फेंकोनी देऊं मान
निज राष्ट्रहिताच्या साठीं
व्हाव्या सकलांच्या गांठी
पर्वा न जिवाची मोठी
हें दावाया सकलांला— गारदी कटोनी मेला

# "विश्वास सोडुनी गेला!"

—:०:—

( चाल—उद्धवा शांतवन कर जा. )

१

रणदेवी कुरुभूमीची— शतवर्ष उपोषित होती
पातला सदाशिवभाऊ— रणकंकण बांधुनि हातीं
पेटलें कुंड युद्धाचें— कित्येक आहुती पडती
आकाश फाटलें सारें
भाऊंना शिरलें वारें
पाडिले शवांचे भारे
तों दुःखध्वनि हा उठला— "विश्वास सोडुनी गेला!"

२

तें सळसळणारें रक्त— गोठलें आंतल्या आंत
चेहरा उग्र भानूचा— झांकला दुःखमेघांत
दृढ मिठी तीक्ष्ण खड्गाची— जाहली शिथिल हातांत
शत्रूला कर्दनकाळ
पातला तेथ तत्काळ
लावून उराशीं बाळ
शोकानें भाऊ वदला— "विश्वास सोडुनी गेला"

३

बोलुनी मुखानें 'काका'— टाकिली मान ती स्कंधीं
बोलणें राहिलें पुढचें— मृत्यूची चढली धुंदी
अंतींची इच्छा वदण्या— राहिला न थोडा संधी

घरबुडवे स्वामिद्रोही
गेले मज सोडुनि कांहीं
चिंता मी केली नाहीं
पण हाहि लाडका मातें– "विश्वास सोडुनी गेला"

४

जिंकुनी दोन दिवसांत– दिल्लीला दासी केली
फोडुनी तक्त यवनांचें– शकलें उधळोनी दिधलीं
दक्षिणचा राजा तेथें– बसवीन प्रतिज्ञा केली
आशेचे उंच मनोरे
गगनाला जे भिडणारे
ज्यावरती रचिले सारे
युवराज इथें तो मातें– "विश्वास सोडुनी गेला"

५

बसईच्या युद्धीं ज्यांनीं– धावरा 'फिरंगी' केला
दभईला ज्यांनीं पुरता– दाभाड्याला निजवीला
भूषवी सदा उभयांना– विजयश्री घालुनि माला
ते 'अप्पा' आणी 'बाजी'
बैसुनी विमानीं आजी
मर्दुमकी बघती माझी
पण काय करूं हा! बाब!– "विश्वास सोडुनी गेला"

६

तोडुनी आइचें पोर– मी निष्ठुर घेउन आलों
तो बळी इथें हा दिधला– खाटिका कसाई ठरलों
मिळविलें यश जरी आतां– या जगीं निंद्य मी झालों

वेगांत हांकिली नौका
खडकाचा बसला ठोका
मृत्यु या क्षणीं प्रत्येका
दुःखांत दुःख हें मजला— "विश्वास सोडुनी गेला"

७

पुसतील गोपिका वहिनी— 'विश्वास कुठें भावोजी ?
गुणसौंदर्याची ठेव— विसरला कुठें ती माझी ?
तनमणी गळ्याचा होता— निजविला कुठें रणगाजी' ?
दाविल्या आंतल्या ज्वाळा
तोडिला पोटचा गोळा
स्वाधीन जियेनें केला
मी सांगू काय तियेला— "विश्वास सोडुनी गेला"

८

टाकुनी लेखणी ज्यानें— समशेर चढविली हाता
ती टाकुनिया संग्रामीं— येइल कां मजला जातां
नानाला काळें तोंड— दाखवूं तरी कां आतां
मारून थडक गिलच्याला
घेऊनी विश्वासाला
फिरविल्याहि असत्या ढाला
पण तोच कलीजा माझा— "विश्वास सोडुनी गेला"

९

नानांना जाउनि माझें— साष्टांग नमन सांगा हो !
भटकुळांतील भट गेला— अश्रु ना कुणाचे वाहो
छत्रपती शिवबाचें— तें तख्त सलामत राहो

बोलुनी अशा या बोला
तो आगीचा जणुं गोळा
आगींत उडोनी गेला
जाळिती शब्द हृदयाला— "विश्वास सोडुनी गेला"

## "भाऊ ! भाऊ ! !"

चाल—उद्धवा शांतवन कर जा.

बोलतां काय हे शब्द— "भाऊ मज सोडुनि गेला!"
ही वार्ता कसली ! कर्णी— ओतिलें तप्त तैलाला !
तळमळती पंचप्राण— देहाचा भडका झाला !
प्राणांतिक ज्याचा मारा !
रिपुला धरवेना थारा
पळती ते सैरावैरा
ऐसा तुटला मम बाहू— भाऊ तुज कोठें पाहूं !

२

करवीरीं रुसुनी जातां— धांवलों तुझ्या मागून
प्रेमाची घालुनि आण— आणिलें तुला परतून
इच्छा पुरवाया सजलों— हें राजपदहि सोडून

अत्यंत दिव्य ती प्रीति
तुजवरची माझी होती
रुसलास पुन्हां मजवरती
आतां पण कोठें जाऊं !— भाऊ तुज कोठें पाहूं !

३

गेला होता विश्वास— तूं येतासी परतुन
तें विष मी गिळिलें असतें— माधवाकडे पाहून
ती जखम पुत्रदुःखाची— भरली असती मागून
घावावरि बसला घाव
घेई हृदयाचा ठाव
आतां न सुखाचें नांव
'भाऊ' कोणाला बाहूं !— भाऊ तुज कोठें पाहूं !

४

अवतार परशुरामाचा— अद्वितीय ब्राह्मण वीर
कर्णासम संकटकाळीं— जो स्वावलंबनीं धीर
जो युधिष्ठिरचि भासावा— घनघोर संगरीं स्थीर
ऐसा तू भाऊराया !
दैवाची वळतां छाया
त्वत्सद्गुण गेले वाया
विरहातें कैसा साहूं ?— भाऊ तुज कोठें पाहूं ?

५

कां इतुका देहावरती— तू उदार झाला होता ?
कां पुण्यपुरीला तूतें— मायेचा कोणी नव्हता ?
प्रीतिचा उन्हाळा राया—! तुजला कां झाला होता ?

तुज पाहतांच दोघांनीं— मज दोष दिले असतील
संसार न झाला ज्यांचा
बळि दिला अशा भावाचा
उरला न वंश काकांचा
हें शल्य कसें तरि साहूं ?— भाऊ तुज कोठें पाहूं ?

१२

तूं दरबारीं दिसशील— म्हणुनी मी तेथें जातां
दरबार ढाळितो अश्रू— मी 'भाऊ! भाऊ!' वदतां
परतुनी शयन-मंदिरीं— डोकावुन तुजला बघतां
स्वकरीं ठेवोनि कपाला
वाहे अश्रूंच्या धारा
त्या तुझ्या धर्मपत्नीला
कोणत्या वचें समजावूं ?— भाऊ तुज कोठें पाहूं ?

१३

जे सुभेदार सरदार— विसरले तुला साचार
अंगचोर विधव्या नांवें— फोडिती खडे ते फार
मीही विसरावें तुजला— सांगतात गोष्टी चार
जे मोठे मोठे राव
दाखवितात स्वामीभाव
त्यांनीच बुडविलें नांव
हे सांग भोजनभाऊ !— भाऊ तुज कोठें पाहूं ?

१४

दुःखद हृदयाचे पोळ— उकलून कुणा दावावे

जे कसेंसेंच मज होतें— तें कसें मुखीं बोलावें
बंधुप्रीतीचें वेड— वेड्यांना कसलें ठावें !

सौमित्रामाठीं हाय
श्रीराम रडे असहाय
माकडांस त्याचें काय
बोलून कशाला दावूं ?— भाऊ तुज कोठें पाहूं ?

१५

तव वसतिक्रीडास्थानें— दुःखातें करिती जागें
हा शनवाराचा वाडा— खायास धांवतो मागें
ही धुरा राज्यशकटाची— ओढाया मन ना लागे

एकांत स्थल पाहून
पर्वतीवरी यऊन
बसलों तरि विरहक्षीण
जाईना क्षणहि आयु— भाऊ तुज कोठें पाहूं ?

१६

उपवासी भाऊ गेला— गिळवे न अन्न हें उचला
तो निजला भूमीवरती— भूमीवरती मज घाला
तो गेला वाऱ्यावरती— मजही वाऱ्यावर घाला

उघडा तेजाचा लाल
गेला घेवोनी काळ
मज हवी कशाला शाल
पडला काळाचा घाव— भाऊ तुज कोठें पाहूं ?

१७

बसला कां शयनाभंवतीं— खालीं घालोनी माना ?
आणिले कशाला वैद्य— जाऊन भाउला आणा
आला कां माझा 'भाऊ'— अंधारी आली नयना
एक वेळ भाऊ बोल
बोल हा चालला खोल
करुं नको मदाशा फोल
ये आलिंगन वा देऊं— भाऊ तु ...ज कां..

१८

"भाऊ भाऊ" करितांना— गेला देहांतुनि श्वास
जीवास लागला ध्यास— पण पुरली नाहीं आस
दुःखावर बसला डाग— हळहळला सारा देश
इतिहास महाराष्ट्राचा
उज्वल बंधुप्रीतीचा
अजुनीहि पर्वतावरचा
वाहे या शब्दें वायू— भाऊ तुज कोठें पाहूं ?

# "मोहरा इरेला पडला"

१

बेलाग दुर्ग जंजीरा— वसईचा किल्ला असला
दुस्मान फिरंगी तिथला— आटोपेना कोणाला
त्या सिंहाला पकडाया— भारतीय चिमणा सजला
गोव्याचा टोपीवाला
कोंकणचा पगडीवाला
लागली झुंज उभयाला
बुद्धीचा डाव उडाला— 'मोहरा इरेला पडला'

२

मर्द त्या मराठी फौजा— रणकीर्ति जयांच्या गाव्या
तळहातीं शिर घेऊनियां— चालुनि तटावरि जाव्या
जणुं घोंगावत मधमाशा— मोहोळाला बिलगाव्या
कडकडाट वरुनि व्हावा
सारखा अग्नि वर्षावा
परि सिंहाचा तो छावा
परतेना हिंमतवाला— 'मोहरा इरेला पडला'

३

बोलावुन सरदारांना— तो समर धुरंधर बोले
शूरांना वेढा द्याया— चार मास होउनि गेले
आवडते कंठमणीही— कार्य काय त्यांनी केलें

बेहिंमत जे असतील
परतोनी ते जातील
मी आहे निश्चयशील
जा कळवा श्रीशाहूला– 'मोहरा इरेला पडला'

४

चालुनी उडी संग्रामीं– जिंकील भयंकर काळ
मी असा घेतला होता– एकेक निवडुनी लाळ
मी तुम्हांस मानित होतों– शौर्याचे तेजोगोळ
जाहली परीक्षा आजी
मति खिन्न जाहली माझी
म्हणतील काय ते वाजी
जा कळवा कीं दादाला– 'मोहरा इरेला पडला'

५

तोफेच्या तोंडीं मानें– बांधूनीं उडवा हारें
शिर तुटुनी त्या आघातें– किल्ल्यांत पडूं द्या त्यातें
भीय मी जरी तुम्हातें– पुरवा अंतिम इच्छेतें
ती निर्वाणीची वाणी
डोळ्यांला आणी पाणी
प्रत्येक वदे गहिंवरुनी
इर्षेंत वीर हा चढला– 'मोहरा इरेला पडला'

६

लागला विषारी बाण– सकळांच्या अंतःकरणीं
शस्त्रांस पोंचले हात– लढण्याने फुरफुरुनी
उतरुनी रक्त डोळ्यांत– नजराही गेल्या फिरुनी

ध्वनि 'हरहर' ऐसा झाला
पाठींच्या सुटल्या ढाला
बोलती सकल या बोला
राखूं निज लौकीकाला— 'मोहरा इरेला पडला'

७

गोळ्यांच्या माऱ्याखालीं— चर खोदुनी रेतींत
उडविले सुरंगी बार— तट लोळविला मातींत
गर्जना एकदम झाली— पडलेल्या खिंडारांत
जों बांध तटाचा फुटला
तों सैनासागर सुटला
धैर्याचा किल्लेवाला
बंदुकीस भाला भिडला— 'मोहरा इरेला पडला'

८

कदमाच्या पुढती कदम— चालले कदम सरदार
बाराबारि करितचि वार— अनुसरले शूर पवार
शिद्याचा खंदा घोडा— चालला जणूं कीं तीर
बावटा धरुनि तोंडांत
भोंसला चढे जोमांत
आगीच्या वर्षावांत
सामना भयंकर झाला— 'मोहरा इरेला पडला'

९

गरनाळी तोफा मोठ्या— धुंकार कराया सजल्या
घायाळ धडाधड खालीं— तनु कितिकांच्या धडपडल्या
छातीचे निधडे वीर— चिंध्या परि त्यांच्या झाल्या

पगडीची फौज हटेना
मगरीची पकड सुटेना
तो विजयश्रीचा चिमणा
बेहोष होउनी वदला— 'मोहरा इरेला पडला'

१०

शौर्याची शर्थ जहाली— बावटा तटावरि चढला
जयनादानें वसईचा— दिक्प्रांत अहा दुमदुमला
पोर्तुगीज किल्लेवाला— आपांच्या शरणीं आला
राष्ट्राची वाढे कीर्ति
तो समय आणि ती मूर्ती
ठाके कविनयनांपुढती
आठवतां या वाक्याला— 'मोहरा इरेला पडला'

# " निश्वास. "

" अश्वधाटी—वृत्त "

१

देवी गतश्वास होऊन, विश्वास—
सोडी, आविश्वास वाटे मनीं
गेला अविश्वास घी सोडि निश्वास,
नाहीं समाश्वासनाला कुणी
नौका तळाशीं बुडाली प्रवाशी
भयाभीत पाही दिशांशीं जसा
माझ्या जिवाशींच ठावा; कुणाशीं
विधी काळ नाणो विदेशीं असा

२

सर्वांग—सौंदर्य—संवर्धिनी
सादरें सारसाक्षी समालोचनी
सत्प्रीति—संयुक्त—सभाषिणी
सत्कृष्टस्थितीमाजि संतोषिणी
सताप—सपाप—संमर्दिनी
सौख्यसंतर्पिणी स्वर्गसंचारिणी
संतोष संपत्ति संवाहिनी
संतसंभाविनी सगसंमोहिनी

३

सर्वत्र सत्प्रीतिसंपादिनी
सत्यसंवादिनी स्नेहसंरक्षिणी
सावित्रिसीतादि—सच्छील—

—सीमंतिनी—सत्वरूपा—सदाचारिणी
संसार संगास सोडी सती
सारहीनत्व सारें समालोकुनी
साध्वी स्त्रियेसारखी संपली
स्निग्धलीला सखीची स्मृतीदायिनी

४

मुक्तावलीची प्रभा फांकली
चंद्रिका मूर्तरूपास कीं पावली
स्वर्गांतली मल्लिकेची कळी
देवकर्णावरोनी गळाली तळीं
भूमिस्थळीं उज्वला पातली
शुक्रतारा जणों काय व्योमांतली
ती जेथल्या तेथ गेली, जलीं
वाहते मात्र प्रश्नेत्र धारावली

५

गेली मनोमोहिनी, टाकुनी मोहिनी,
प्रीतिची ती सुधा वाढुनी
रात्रदिनीं चिंतनीं खेळुनी
राहते कां दिसूनी न ये लोचनीं
स्वर्वासिनी जाहली, एक वेळां
गृहस्वामिनी होति जी कामिनी
निश्वास सोडून मोडून भाग
निघनाच हा जीव मोहांतुनी

६

गेहाकडे पाहणें नावडे,
दुःखशोकीं बुडे, चित्त हें बापुडें
कैसें रडें थांबवूं मी गडे !
अश्रुचे हे सडे घालु कोणापुढें?
भ्रांती जडे, मार्ग ना सांपडे,
जाहलें वांकडें बुद्धिचें पारडें
हे कोरडे लोक देती धडे,
पीळ ज्याला पडे, दुःख त्याला घडे

७

बाहेरुनी गेहिं यावें क्षणीं
जीव जावा दमोनी श्रमा साहुनी
दारांतुनी नील दृष्टीस फेंकीत
मोहीत होती प्रसन्नाननी
ती झोपतां जाउनीयां स्मशानीं
स्मशानापरी गेह झालें त्वरीं
रामेविना राम नाहींच संसारिं
आराम वाटेल कैसा तरी

८

लागे निजध्यास जीवास आभास
तेणेंच होतात स्वप्नांतरीं
देवांगना काय गौरांगना कीं
नभःप्रांगणांतून ये भूवरी
केव्हां दृढालिंगनानें कदा

अश्रुसमार्जनानें हरी सुंदरी
होळी पुन्हां पेटते जागृती—
माजे येतांच दुःखानलाची परी

१

दुर्दैव मोठें ललाटांत खोटें
पुसायास कोठें तरी जाउं मी
जें दुःख दाटें तयें ऊर फाटे
कुणीही न भेटे मनःसंयमीं
हा शोक वाटे गळे अश्रु दाटे
सुखामाजि कांटे कुणी पेरिले
मी क्लेशलाटेसवें काळ लोटे
विचारास फाटे किती लागले

# "दिवाळी" व देशांतील दैन्य.

[ मंदाक्रान्ता ]

दुर्भाग्यें ज्यां पुरति न मिळे भाकरी खावयासी
ऐसे माझे असतिल किती देशबंधू उपाशी
जेथें अन्नाविण भडकली नित्य पोटांत होळी
तेथें कैसे धरुनि बसलां पाडवा वा दिवाळी
माझ्या बाळां रुचकर कधीं लाधते खीर पोळी
तद्बालाचीं असतिल मुखें आज कोमेजलेलीं
ऐशी दशास्थिति बघुनियां वृत्ति होते निराळी
केला दुःखीं वद सण कुणीं पाडवा वा दिवाळी
दारोदारीं फिरति उघडे बंधु माझे भिकारी
पोषाखाची वद तरि कुणा दाखवूं ऐट भारी
त्यांची चिंता जंव तरि गड्या ! अंतरात्म्यास जाळी
बाह्योपाधी करुनि करणें काय आहे दिवाळी
कर्तृत्वाचा वद जगिं दिवा लाविला काय हातें
हे तेलाचे अमित हि दिवे लावुनी काय होतें
कांता गेहीं प्रतिनिशिं दिवे लाविती अस्तकाळीं
मानायाची तर मग असे रोजची ती दिवाळी
कष्टें गेला थकुनि चिमणा जीव तो दीनवाणा
संसाराचा तरिहि भिडला पाठिमागें ससाणा
भाऊ माझे कितिक बसले लावुनी हात भाळीं
हातांतूनी गळुन पडतो घांसः—कैंची दिवाळी

जे जे कोणी गरिब दुबळ्यां नाडुनी या जनांना
त्यांच्या जीवावर उडविती श्रीमद् रंग नाना
त्यांनीं लोकां पिळुनि भरली आपुली मात्र झोळी
त्यांची आहे तुज मज नको त्या परीची दिवाळी

---

## "समाराधन."

१

अलंकारांसाठीं इतर करिती हौस युवती ।
तुवांही कां त्यांची अनुकृति करावी गुणवती ॥
हिरे मोतीं कोठें सुगुण तव कोठें कुलवती ।
"गुणांशीं रत्नांचे दगड तुलितां येत नसती"

२

कुणी रंभा मोठी निजशरिर गे ! देवि नटवो ।
कुणी तोरा इंद्रायणि भगवती स्वीय मिरवो ॥
नखाचीही त्यांना तव न समता येइल सती ।
"बलाका हंसीची विषम तुलना कोण करिती"

३

कशाला कोकीळे ! बद गळसरी गे तुज हवी ।
तुझ्या या कंठाचा अमृतरस कर्णास निववी ॥
कशाला सांगूं मी विदित न तुला काय सुमती ।
"अलंकारी वाणीपरिस न अलंकारमहती" ॥

४

जिथेंनीं नाना सद्गुण उगम घेतात दयिते ! ।
निधान प्रेमाचें रुचिर तव ऐसें हृदय तें ॥
तयाची कां हाराविण विलय पावे रुचिरता? ।
"स्वभावें जें आहे सुभग नलगे त्या सुभगता" ॥

५

व्रतें दानें यांनीं कर तव समालंकृत असो ।
सुवर्णाचें त्याला वलय नसलें गे तरि नसो ॥
तुझ्या पावित्र्याची हृदयिं भरते दिव्य सरिता ।
"न लाभे पुण्याईविण प्रियसखी धर्मनिरता" ॥

६

पतीमागें गेली जनकतनया उत्सुक मनें ।
कुशाचे दागीने कुसुमतनुला भूर्जवसनें ॥
तिला ऐश्वर्याचें स्मरणहि कधीं येइ न मनीं ।
"पतीवांचूनीयां सति न दुसरें भूषण गणी" ॥

७

दिली पातिव्रत्यें हरिहरविधात्यास शिशुता ।
तपस्वी अत्रीची तुजसि अनुसूयाहि विदिता ॥
प्रतिष्ठा दागीन्यावरुनि तिजला काय मिळते ।
"दिगंतीं सत्कीर्ती गुणकिरणमाला पसरते" ॥

८

स्मशानस्थानीं सभ्रमण गिरिजाशंकर करी ।
भुजंगाच्या शय्येवरि पहुडला श्रीपति हरी ॥
ज्या गौरी त्या त्या स्थितिंतहि सुवंद्य त्रिभुवना

"जगन्मान्या होती नच सुकृतिवांचून ललना" ॥

९

तुझी इच्छापूर्ती मजसि करणें दुष्कर नसे ।
कुबेरालाही मी रमविन सखे ! काव्यसुरसें ॥
परंतू याञ्चेची संवय न कधीं मानिनि ! मला ।
"महात्मे यांचेच्या परिस म्हणती मृत्युहि भला "

---

## " विषय-सूत्र."

"गिलच्यांच्या सरदारांनीं रोज रोज आमची रसद लुटावी, पठाणानीं आमच्या सैनिकाचा धुवा उडवावा आणि आमच्या एकाही मराठे सरदारास या गोष्टीचा सूड उगविता येऊं नये! ही मोठ्या नामुष्कीची गोष्ट आहे!! आमचे काहीं सरदार तर पोर-वयाचेच आहेत; पण—" जनकोजी शिंद्यानें पुढें भाऊसाहे-बास बोलूंच दिलें नाहीं; तो ताडकन् उठून उभा राहिला आणि म्हणाला—"का हा रणसिंह शिंद्याचा छावा स्वामीस तेजोहीन वाटला कीं काय ? हा असा जातों—आणि या म्यानांतून बाहेर काढिलेल्या समशेरीचा प्रभाव दाखवून नंतर चरणाचें दर्शन घ्यावयास येतों " असें बोलून तो अठरा वर्षांचा फाकडा वीर भर दरबारांतून निघून गेला ! भाऊ-साहेब व त्याचा तो दरबार त्या बालवीराकडे विस्मयपूर्ण दृष्टीनें पहातच राहिला ! हा तरुण वीर आपल्या बोल-

ण्यान इषस चढून साहसास प्रवृत्त झाला हें ध्यानीं येऊन प्रसंगीं मदत करावी व पाठ राखावी म्हणून बळवंतराव मेहेंदळे यास हुकूम सुटला! बळवंतराव व जनकोजी याचे मनोमनीं चांगलें नव्हतें. मेहेंदळे आपली खास पागा घेऊन गेले; पण शिंद्यावर एकजात ५०० पठाणी स्वार तुटून पडले असताही ते गिधाडासारखे घिरट्याच घालीत होते. मेहेंदळ्यांची हरामखोरी शिंद्याच्या तेव्हाच लक्षांत आली आणि त्या झटक्यात तर तो अधिकच मर्दुमकीनें लढला. विजयी होऊन रक्तानें भरलेली ती जनकोजीची बालमूर्ती आपल्या कंगणीदार पगडीला मिरवीत, घाम पुसीत दरबारात ठाकली! तेथें मोठ्या जोरदार भाषेत त्यानें मेहेंदळ्याचा पाजीपणा व्यक्त केला! भाऊसाहेबानीं शिंद्याची पाठ थोपटून बळवंतरावास फार दोष दिला! गुडघ्यात मान घालून बसलेले बळवंतराव घरीं येतात तों दारातच उभ्या असलेल्या त्याच्या पत्नीनें "कीर्तीचा ध्वज मळवीला!" असें म्हणून त्याचा धिक्कार केला. घरीं दारीं चोहींकडे होत असलेल्या अपमानानें तो मानी पुरुष चिडून गेला. मळविलेला कीर्तिध्वज उजळून येईन नाहीं तर आपली "स्वर्गांत भेट होईल!" असें पत्नीला सांगून त्यानें एकदम डंके वाजविले! ते ऐकताच आपली खास तैनाती फौज घेऊन तो सरदाराचा सरदार सदाशिवरावभाऊ बळवंतरावाच्या रक्षणाकरिता त्याच्या पाठीवर धावून गेला! स्वत श्रीमंत भगवा झेंडा तोलीत आपणाकरिता येत आहेत हें पहाताच बळवंतरावाचा कंठ भरून आला. पुढें दोघानीं गिलच्याबरोबर केलेला घनघोर संग्राम येथें गद्यात लिहिण्या-

पेक्षा तो पुढील पद्यातच वाचलेला बरा. या युद्धात बळवतराव पडले ! भाऊसाहेब अत्यंत दु:खानें त्याचें प्रेत घेऊन परत वळले. पुढें मेहेंदळ्याबरोबर त्याची सत्यवचनी पतिव्रता स्त्री तिथेंच सती गेली ! !

## "कीर्तीचा ध्वज मळवीला."

म्हणतात काल स्वारींनीं— कीर्तीचा ध्वज मळवीला
आपण जनकोजी शिंदा— बालवीर तोंडीं दिधला
दुरुनीच घालुनी घिरट्या— गृध्रासम डोळा दिधला
मी महिंदळे वीरांची
वीरपत्नि असतां साची
वार्ता दुर्लौकीकाची
मग कैशी ऐकूं बोला— कीर्तीचा ध्वज मळवीला

२

ओठाच्या वरचें दूध— अजुनी न जयाच्या सुकलें
अठरा वर्षांचें पोर— झेंडे फडकावित आलें
रणशूर शिकंदर माजी— ते माशा उडवित आले
व्यक्ति द्वेषाचा मूड
देशाच्या कार्यी मूढ
उगवितात मानारूढ
तुमगलें कसें स्वारीला— कीर्तीचा ध्वज मळवीला

३

पांचशें पठाणी स्वार— शिंद्यावर येउनि पडतां
एकटाच "हर! हर!" शब्दें— बेहोष होउनी लढतां
तुम्हि भीमासम लढवय्ये— तें कोठें गेला होतां?
कांकणें अम्हासम हातीं
कां भरलेलीं तीं होतीं?
दगडाची करुनी छाती
परतोनी कैसे आलां— कीर्तीचा ध्वज मळवीला

४

रक्ताच्या कारंजांचे— तनुवरी फवारे बसले
घामाच्या धारा फुटुनी— मुखही डबडबुनी गेलें
त्या अपरंपार श्रमानें— तें म्लान जरासें झालें
ऐशी शिंद्यांची मूर्ती
ठाकतां पेशव्यापुढतीं
"शाबास! वाहवा!" म्हणती
धिक्कार जाहला अपुला— कीर्तीचा ध्वज मळवीला

५

"उलटें काळीज जयांचें— कुलटे आम्हासह होते
चोरटें दगलबाजीनें— घिरटें घालित तें होते
उलटेल केधवां डाव— उलटे चिंतित ते होते"
ऐसें शिंदे रागांत
वदतां भर दरबारांत
घातली मान गुडघ्यांत
निर्लज्ज कसे तें झाला— कीर्तीचा ध्वज मळवीला

६

पाहूतांच रणमैदान— रोमांच थरारुनि जावे
आवेश भरोनी अंगीं— छातीचे बंद तुटावे
हृदयाच्या ठोक्यासरसीं— शरिरांत रक्त उसळावें
जे प्रलयकाळचे सांब
काळाला म्हणतिल थांब
पळुं नको असा तू लांब
बळि पडले ते दुषाला— कीर्तीचा ध्वज मळवीला

७

ऐकुनी जयांचें नांव— अरिशरिरीं कंप सुटावा
नौबतिचा ध्वनि दुमदुमतां—धैर्याचा दोर तुटावा
उसळुनी धडाडी घेतां— शेळ्याचा कळप पळावा
ते काल ऐन समयातें
लावितां न कर खड्गातें
टकमक कां पाहत होते
मतिविकार कैसा झाला— कीर्तीचा ध्वज मळवीला

८

करकरीत कोरे कपडे— रक्ताचा डाग न एक
घमघमाट ये गंधाचा— घामाचा थेंब न एक
तरवार कटीला नाहीं— हातांत छडीचा झोंक
या ऐशा वेषें मजला
कां भुलवायाला आलां
भुलणारी नाहीं अबला
शौर्यावर पाडुनि घाला— कीर्तीचा ध्वज मळवीला

९

स्वारी विजयाची माला— कंठीं येइल घालून
मी दारातचि आनंदें— पंचारति ओवाळीन
राहुनी उभी शेजारीं— वरती पंखा वारीन
भोपळा भ्रमाचा फुटला
आशातरु दग्ध जहाला
मी सोडीं निःश्वासाला
ऐकिलें यदा वार्तेला— कीर्तीचा ध्वज मळवीला

१०

दोषितात तुमचे तुह्मा— सरदार तसेंचि शिपाई
गोटा गोटांतुनि ऐका— किति निंदा चाले बाई
उपमा देतात तुम्हाला— "हे बारागिरांचे भाई"
दु:शब्द कसे ऐकवती
अपमान कसे साहवती
कां वाटत नाहीं खंती
लाविला डाग वंशाला— कीर्तीचा ध्वज मळवीला

११

हा बेहिमत्याचा मुलगा— वदतील लोक बाळाला
ही नामर्दाची दासी— हिणवितील बाई मजला
"विश्वास घातकी पाजी"— ही विशेषणें तुम्हाला
तुमच्या वडिलांची कीर्ती
दुमदुमते आर्यावर्ती
" होती शौर्याची मूर्ती "
मोठ्यांच्या पोटीं आला— कीर्तीचा ध्वज मळवीला

१२

एरंड उसाच्या पोटीं— शेवाळ नदीच्या कांठीं
कीं आम्रफळाच्या पोटीं— निःसत्व असावी बाठी
कंटक पुष्पाच्या देंठीं— कांटे फणसाच्या पाठीं
कीं काच हिऱ्याच्या पोटीं
तुळशींत भांग उफराटीं
अंधार रवीच्या पाठीं
तैसे जन्माला आलां— कीर्तीचा ध्वज मळवीला

१३

आलात तसे जा परती— हें तोंड न मज दावावें
घालून पालथे शत्रू— मातींत मिळवुनी द्यावें
पडलेला डाग धुवूनी— दासीला दर्शन द्यावें
जरि गेला स्वर्गावरती
तनु ठेवुनि सरणावरती
सेवीन येउनी वरती
जन बोलत न या बोला— कीर्तीचा ध्वज मळवीला

---

# "स्वर्गांत भेट होईल"

१

भामिनी पुरे कर आतां— बाणीचें शरसंधान
त्वां जागविला हा सिंह— खुपसून विषारी बाण
दारूच्या कोठरास- लाविला अग्नि हा जाण
हो बाजूला चल दूर
गिलिच्यांचा किति मगदूर
जरि दैवाचि झालें क्रूर
तरि शेवटचे हे 'बोल'— स्वर्गांत भेट होईल

२

स्मरुनी वडिलांचे पाय— वाहतों शपथ कीं साफ
पडला कीर्तीला डाग— तो करीन रुधिरें साफ
देणें पडलें देईन— प्राणाचें भरुनी माप
कां प्रबळ गजाचा छावा
अबलेनें धिःकारावा
हा दुर्दैवाचा कावा
जर शेवटचाच असेल— स्वर्गांत भेट होईल

३

ऐसाच जाउनी घेतों— समशेर आणि ती ढाल
बळवंतराव मी नाहीं — जाहलों खरा वेताळ
एकची करोनी देतों— आकाश आणि पाताळ

रिपुपक्षाकडचीं भूतें
नाचवितों "थैं थैं" तेथें
आलों तर येइन येथें
अंतिम वा संगमकाल— स्वर्गांत भेट होईल

४

दुसऱ्याचें साह्य कशाला— वनराज एकटा जातों
गर्जना फोडुनी मोठी— धडकी शत्रूला भरितो
झेंपसरसी मेंढ्यांचा— फडशा पाडोनी येतों
कोल्ह्यांची गडबड काय
ठेवील व एकहि पाय
म्हणतील जिवाला हाय !
जरि दुर्दैवाचि उलटेल— 'स्वर्गांत भेट होईल

५

गर्वी षण्मुख बडबडती— थोपटती बाहूदंड
गणपतिच्या बलवंताचा— पाहिला न शुंडादंड
बघतों मजसह लढती कीं— आजि कोण कोणते षंढ
मी जीव तृणासम गणितों
हें नशीब ठोकुन जातों
जातांना तुजला वदतों
उलटेल जरी हा खेळ— स्वर्गांत भेट होईल

६

त्या रणदुल्ला खानाला— खेंचून आणितों पुढती
खिळखिळीं करूनी हाडें— वाघाला धरितों हातीं
मिरवीत आणितों येथें— बांधोनी हत्तीवरती

त्या कापाकापीमध्यें
येतिल जे पुढतीं योध्दे
पाडीन तयांचे मुर्दे
आलीच तशी जरि वेळ- स्वर्गांत भेट होईल

७

मी महिंद्ळे नांवाचा- गोंधळांत उडविन खटका
गांठून वजिर काबुलचा- हातानें मारिन झटका
मग बघेन येतो कोण- करण्याला त्याची सुटका
सिंहाच्या दाढेखालीं
एकवेळ जी सांपडली
वांचते कशाची शेळी
जरी निष्फळ बच होतील- स्वर्गांत भेट होईल

८

मज मनःपूत निंदाया- ज्यांच्या जिव्हा चुरचुरल्या
धरतील जिभा दातांत- लाविल्या जयांनीं चुगल्या
तोंडांत घालतील बोटें- म्हणतील कल्पना चुकल्या
हे कानामागुन आले
शाहणे फारची झाले
उघडितो तयांचे डोळे
अवतार जरी संपेल- स्वर्गांत भेट होईल

९

अजवरी चकमकी झाल्या- पोरखेळ पारांचे ते
हैदोस कसा घालावा- शिकविन आज मी त्यांतें
कितिकांच्या विधवा दुःखें- लावितील कर भाळातें

आकाशीं जी थरथरली
उतरेल भूवरी बिजली
जर असेल वेळाचि भरली
ज्योतींत ज्योत जाईल— स्वर्गांत भेट होईल

१०

कटिवस्नी नाहीं बाळ— झोंपला काय तुकता तो
जागवूं नको झोंपूं दे— एकवेळ पाहुन घेतों
कपरेस घालुनी विळखा— तो म्हणेल मीही येतों
जरि आलों बाळा ! परती
तुज घेइन मांडीवरती
नाहीं तर जेव्हां पुढती
कीर्ती मिळवुनि येशील— स्वर्गांत भेट होईल

११

येतों थोड्या वेळानें— साध्वी ! कर्णा वाजेल
तास दोन तासामध्यें— मोठी दंगल माजेल
ही पानपताची भूमी— नर रुधिरानें रंगेल
तूं रहा रमनी येथ
येतों जयघोष करीत
जरि फसले माझे बेत
मग ठरेल अपले बोल— 'स्वर्गांत भेट होईल'

१२

सोडुनी पाश मायेचा— कर्मवीर निघुनी गेला
ती तटस्थ पाहत होती— निश्चल हरिणाक्षी विदुला
निज सौभाग्याचा लाल— तो दृष्टि आडही झाला

निश्वास सोडुनी ध्याई
'हे! देवी अंबाबाई
काळजी इकडची वाही
इच्छा जरि नवचि असेल— स्वर्गांत भेट होईल

## "विजयाच्या द्वारीं अडला!"

१

डंके नौबत रणवाद्यें— हीं कोणाचीं दुमदुमतीं ?
कोणाचीं निवडक पथकें— वळलीं कुरुभूमीवरतीं ?
हा माहिंद्ळे सरदार— ज्या 'पंचहजारी' म्हणती !
शिंद्याचें वच ऐकोनी
अपमानानें जळफळुनी
अजि कमरबंद बांधोनी
ललकारी ठाकित गेला— विजयाच्या द्वारीं अडला

२

श्रीमंत सदाशिव-भाऊ- सरदारांचा सरदार
पाठीवर धांवत आला- दासांचा पालनहार
त्या दिलदाराला बघुनी- गहिंवरुनी आलें फार
"कीर्तीचा ध्वज मळवीला
स्वामी ! ऐशा दासाला
कां परतविण्याला आलां ?
परतेल न चाकर अपुला- विजयाच्या द्वारीं अडला

३

बळवंतराव ईर्षेनें !- एकटे चालुनी आलां !
सांभाळा आतां बाजू- लागेल डाग तोंडाला
भिडविती बगल मी डावी- तुम्हि उजवीला सांभाळा
तो गरुड भरारी मारी
भुजपक्षानें रिपु सारी
कितिकांना टोक मारी
कल्कलाट भारी केला- विजयाच्या द्वारीं अडला

४

त्राणाच्या कैचावाले- धाडसी जबुरेवाले
उडविल आगीच्या ठिणग्या- अंगावर धावुन आले
भिडला वाहला बाहू-- बाल्यावर पडले घाले
'मी मरेन वा मारीन
कीं कटेन वा काटीन
पण कीर्तीला उजळीन'
ऐसा निर्धार लढला- विजयाच्या द्वारीं अडला

५

तो ज्वालामुखिचा स्फोट— पाषाणहि द्रवुनी जावे
कीं प्रभंजनाचा लोट— उपटुनी वृक्ष पडावे
प्रक्षुब्ध अब्धिची लाट— मासे खळबळुनी जावे
होणारें होवो कांहीं
मागें ना परतुन पाही
तुडवीत शवांना जाई
चौफेर घेरला गेला— विजयाच्या द्वारीं अडला

६

भीषण शब्दांचे मेघ— पर्वतावरी घसरावे
मोठाल्या जल-ओघांनीं— सागरतीरीं नाचावे
कीं पतंग दीपाभंवतीं— चहुं बाजूंनीं झडपावे
धिप्पाड काबुली वीर
होउनी लाल अंगार
थकले कराया वार
फिरवी पाय न तरि अपुला— विजयाच्या द्वारीं अडला

७

एकटा वीर सगळ्यांशीं— झगडे मोठ्या निर्धारें
ढालेचा फिरवित हात— चुकवी खड्गांचे मारे
आले पठ्ठे धांवोनी— जीवास जीव देणारे
खणखणाट मोठा झाला
रक्ताचा पाउस पडला
तो महिंदळा मरणाला
थोडाहि न चित्तीं भ्याला— विजयाच्या द्वारीं अडला

८

जाळ्यांत वाघ सापडला— हें दुरून अवलोकोनी
'भगवा झेंडा' बोलीत— आला भाऊ धांवोनी
नेटानें चढवुनि हल्ला— घुसला तो फळी फोडोनी
तो योद्धा हिंमतवान
पाही गर्दन वळवून
प्रेमाश्रू आले भरून
दुप्पट अवसानें भरला— विजयाच्या द्वारीं अडला

९

मोहरा खुद्द स्वारीचा— जवळीं आलेला दिसला
शत्रू सेनेचा डोळा— श्रीमंतांवरती फिरला
नरहरीच तो तर होता— आतड्याच फाडित गेला
तो प्रसंग पाहुन नयनीं
चावुनी ओठ दातांनीं
पलटी घेवोनी त्यानीं
"हर हर" ऐसा ध्वनि केला— विजयाच्या द्वारीं अडला

१०

रवरी चंद्र उसळावा— उसळे तैसा त्वेषांत
स्वामीच्या भंवतीं फिरती— 'गरगर' पट्याचे हात
जणु भरली होती वीज— त्या शूराच्या अंगांत
पळमासम देहीं नटला
शेला कमरेचा सुटला
अवसर ना बांधायाला
रतला स्वामीसेवेला— विजयाच्या द्वारीं अडला

११

उंच उंच हिमगिरिशिखरें— देखावा पाहत होतीं
त्या अशुद्ध शोणित सरिता धों धों खालीं वाहाती
गंगा यमुना चळवळती— भूवरच्या पुण्यज्योती
नव बलाहकांच्या पंक्ती
कोलाहल ऐकुन भीती
गिरिशिखराला दृढ धरिती
ऐसा रणांनी गेला— विजयाच्या द्वारीं अडला

१२

नामर्दाच्याही अंगी— स्फुरवील चेतना मोठी
विजयश्री हांसत यावी— माला घालाया कंठीं
कर्तृत्व वचोंना शब्द— आले भाऊंच्या ओठीं
वा ! महिंदळे शाबास !
द्या नीचांना गळफांस
कोंडून धरा अधमास
स्वामी वचनें सरसरला— विजयाच्या द्वारीं अडला

१३

दैवानें ठोकर दिधली— घातली झडप काळानें
खंजीर खुपसला पोटीं— गर्दीत कुणी पाप्यानें
भूमीवर उलथुन पडला— त्या प्राणांतिक घातानें
आरोळी एकच उठली
भाऊंच्या कानीं आली
नद्राणी धाकें वदली
कर्णासम योद्धा गेला— विजयाच्या द्वारीं अडला

१४

तुटला स्वामीभक्तीचा— तेजस्वी सुंदर हार —
सति सुलोचनेचा झाला— इंद्रजीत युद्धीं ठार
त्या मंदोदरिच्या नेत्रीं— लागल अश्रुची धार
उलटा नशिबाचा वारा
वाहतां जिवाचा प्यारा
धरणीवर फेकी शरिरा
तो काय करिल दैवाला— विजयाच्या द्वारीं अडला

१५

तें प्रेत परत मिळवाया— प्रेतावर प्रेतें पडलीं
परतले सदाशिव भाऊ— बाष्पाला गाळित खालीं
ती जखम स्वामिभक्ताची— स्वामीला बाधक झाली
म्हणती दैवाचे वादी
पुढच्या नाशाच्या आधीं
अपशकुन घडोनी बाधी
हा शकुन तसा भाऊला— विजयाच्या द्वारीं अडला

# "मन:सांत्वन."

[ वृत्त-शिखरिणी ]

१

तिचें चित्ता आतां स्मरण करुनी काय फळ तें
वियोगाची बाष्पावलि नयनिं ही मात्र भरते
दुज्यांनीं सांगावें परि तुजसि हें सर्व कळतें
"निघोनी जी गेली पुनरपि न ती मूर्ति दिसते"

२

खरे आनंदाचे दिन तिजसवें मात्र गमले
अतां अंतर्दु:खें सहन करणें हेंच ठरलें
मना ! मोठे मोठे सुजन परि बा ! काय म्हणती
"विचारें दु:खाचे हिमगिरि महाही वितळती"

३

लिहूनी प्रीतीचे अमरपट गेली गुणवती
कसे ते दावावे उघड करुनी काय दिसती
न येई झालेली जखम भरुनी सज्जन मना !
"पुढें जी आली ती सहन करणें दैवघटना"

४

जिनें संसाराचा सुखकर बगीचा उभविला
कुठें गेली कोठें लपुन बसली आर्यमहिला
जगत्सिद्धांताचा गहनहि असा भाग समजे
"कुणालाही कोठें जननमरणाचें न उमजे"

५

जिच्या संगें केला निबिड विपिनीं वासहि जरी
तिथेंही जी देवी अनुपम सुखें दिव्य वितरी
तिचा आहे चित्ता ! विरह सहणें भाग तुजला
"शहाणा तोची कीं विपदिं मिळवी शांति अतुला"

६

तिला जावें कष्टें विसरुनि असेंही ठरविलें
परंतु डोळ्यांच्या पुढुनि मुख तें लेश न चळे
मना संमोहाच्या निधितुनि कसा कोण उतरी
"तपस्वी लोकांही भ्रमित करिती मोह-लहरी"

७

अधिष्ठात्री होती मदिय कवितेची गुणवती
पदाच्या लालित्यें मन हरित होती गजगती
विधात्यानें नेली उचलुनि कुणाला न पुसतां
"कुणालाही येई विधिवरि न फिर्याद करितां"

# "छत्रपतींचा मानभंग."

[ वृत्त-शार्दूलविक्रीडित. ]

१

नाहीं मूषक डोंगरांतिल, महाराष्ट्रीय शार्दूल हा
ऐसा प्रत्यय रामसिंह दिधला औरंगजेबास या
राजा मानुनिया निमंत्रित करी दासांत ठेवी मला
"गेहीं बोलवुनी अनादर करी तो मूर्ख मूर्खांतला

२

आहे हा जहरी भुजंगम असें ठाऊक होतें मला
भोळे ते यशवंतसिंग मजला विश्वास त्यांनीं दिला
याचीं गोड निमंत्रणें स्मरुनिया मी होतसे विस्मित
"वेळीं साखर पेरतो रिपु खरा तो घातकी निश्चित

३

यानें बंधु निवारिले जनकही बंदींत तो घातला
मी माझ्या भुजविक्रमें प्रभुपणा लोकांत विस्तारिला
यालाही मम कां नसेल कळली चित्तीं खरी योग्यता"
"मात्सर्यें स्वगुणाविना परगुणीं दृष्टीस ये अंधता"

४

माझ्याशीं तह जाहला परिसलें जैं सेवकाच्या मुखें
जो त्या मोदभरें नमाज पढला निष्काळजीच्या सुखें
माझा हा अपमान त्यास करण्यादुर्बुद्धि कां जाहली?
"पश्चात्ताप न खोड मोडित असे जन्मस्वभावांतली"

५

आहे गांठ रणांत छत्रपतिशीं वार्ताच ऐकोनिया
चिंताक्रांत अशा यदीय बसल्या अंतःपुरांत स्त्रिया
तें हे मोंगल, त्यांत काय मजला हें स्थान खालीं मिळे
"राजर्षी असला तरी जळफळे तो मानभंगामुळें"

६

धेनुब्राह्मणपालनार्थ वळती जे हात खड्गाकडे
ते जोडून कदापि राहिन उभा मी ना अरिंधापुढें
याच्या दुष्कृतिचें पुढील भय म्यां गाडून तें टाकिलें
'केतु ग्रासिल हा म्हणून रविनें त्याला कधीं वंदिलें?'

७

घेऊं कां वद रामसिंह! इथुनी उड्डाण सिंहासनी
पाहूं कां उलथून यास अगदीं सिंहासनापासुनी ?
येतो कोणमधें तपास बघतों आहे 'भवानी' करीं
अंतःशक्ति जयांत पूर्ण भरली तो कां कुणा आवरी?'

८

डाळिंबास विदारुनी शुक करी निर्बीज ती पोकळी
तैसें मारुन हे अमीर करितों आतां सभा मोकळी
पाडोनी तरु हे प्रभंजन जणों जातों निघोनी जवें
"आवेशांत मनुष्य काय न करी कोणास हें सांगवें"

९

तूं 'नाहीं' म्हणशी पुनः पुनरपी बा रामसिंगा! परी
'सिंहाच्या सदनांत आपण उभे;ही वेळ आहे अशी'

देतों सोडुनियां विचार परि ही धिक्कारितों मी सभा
'सिंहाच्याहि गृहांत व्याघ्र न कधीं कोल्ह्यांत राहे उभा"

१०

निघुनि समरगाजी भूप गेला शिवाजी
रिपु जरि इतराजी जाहला त्या समाजीं
वदति कितिक तेथें एकमेकांस कानीं
" सहन करित नाहीं मानभंगास मानी "

# " हे मोठे "

वृत्त—स्रग्धरा.

१

मोठे नाहींत ज्यांचे परहितपर ते सद्विचार स्वतंत्र
स्पर्धा सन्माननीयासह परि करिती सोडुनी ताळतंत्र
ज्यांच्या एकेक गोष्टी बघुनि निजमुखीं घालिती लोक बोटें
ऐसे खोटे किती या जनिं म्हणविती आपणालागिं मोठे

२

लोभी किंवा असत्य स्तुति करुनि निजस्वार्थ जे साधणारे
ज्यांना नाहीं स्वताचें सरळ मत सदा मान डोलावणारे
त्यांच्यामध्यें जयांना सहज मिळतसे मान मोठेपणाचा
ते मोठे हो! तयांना बुधजनिं असला मान नाहीं फुकाचा

३

दुःखानें त्रासलेले, अकरुण विधिनें फार जे गांजलेले
ज्यांचा दारिद्र्यपंकांतुनि पद बुचले त्यांत जे गाडलेले
संपत्ती ती असुनी जरिहि कळवळा येत नाहीं अशांचा
त्यांचा मोठेपणा तो असुनि नसुनिही काय जाळावयाचा

४

गेला आजी कसाही दिन परि दुसरा हाय! जाईल कैसा
निद्रा नाहीं सुखाची धग धग जळतो जीव चिंतेंत ऐसा

ऐशा लोकां बघोनी हृदयिं न पडतो एकही पीळ ज्यांना
ते मोठे हो! कशाचे उघड जनिं असो पूर्ण धिक्कार त्यांना

५

आकारानें म्हणावे महिष तरि जगीं काय नाहींत मोठे!
उंचीनें ही कमी कां क्षितितलिं वसती उष्ट्रपश्वादि मोठे
नाहीं उत्कृष्ट कांहीं सुगुण दिसतसे एक सांगावयाला
मोठे झाले कशानें? सुटत न असतो प्रश्न हाची मनाला

६

कृत्यें यांचीं पहावीं तर जणुं असती राक्षसांचेच बंधू
कैसें यांचें विधीनें हृदय घडविलें ज्यांत ना स्नेहबिंदू
ताठ्यानें चालणें तें नयन मुरडुनी बोलणें आढ्यतेनें
अंगीं मोठेपणाचा ज्वर बहु भरला काय होईल नेणें

७

कोणाहातें कुणाच्या सुखकर सदना अग्नि लावून बाया
लोकीं नामानिराळे पुनरपि अपुली सभ्यता दाखवाया
यांना 'मोठे' म्हणूनी जर कधिं उपमा शोधिली द्यावयाला
व्याख्या मोठेपणाची तर मग दुसरी पाहिजे व्हावयाला

८

एखाद्या सज्जनाच्या फिरवुनि सयशीं हात तो काजळाचा
तेजोभंगें तयाच्या हंसतिल करुनी घात तल्लौकिकाचा
अन्याची हे कुचेष्टा करितिल अपुली दाखवाया प्रतिष्ठा
यांना 'मोठे' म्हणाया सकल न जनता जाहली बुद्धिनष्टा

९

विश्वासानें कुणाशीं करतिल अगदीं गुप्त संकेत कांहीं
त्याला देतील थापा किति भलभलत्या नेम याचाहि नाहीं
आशाभग्न स्थितींत त्यजतिल पुढतीं साधितां कार्यसिद्धी
गाजे यांची अशा या विषमतर अविश्वासमार्गीं प्रसिद्धी

१०

देशाचा मान गेला मुळिंच न परवा मान यांचा रहावा
आला फांसा गळ्याला कठिण, परि बडेजाव यांचा करावा
राष्ट्रांचाही कराया चुकतिल न तरी घोर विश्वास घात
होवो ऐशा खलांचा हिमगिरिशिखरापासुनी देहपात

## " विजयोत्साहदिन "

( चाल—भूपती खरें तें )

विजयोत्साहाचा दिवस आज सोन्याचा—
आनंद न मावे भारतीय लालांचा
राक्षसी जर्मनी क्रूर मतंगज झाला—
दुबळ्या राष्ट्रांला पायीं तुडवित गेला

त्या बेलजिमांची उठली जैं किंकाळी—
 "दीनांचा नाहीं आज कुणी कां वाली ?"
कां सर्व जाहलें उर्वीतल निर्वीर—
 अमुचा नाहीं ना कोणी पालनहार ?
ती ब्रिटानिया त्या आर्त रवें तळमळली—
 तळव्याची चढली आग मस्तकीं भिडली
पाठीस घालुनी बेलजिमाला पुढती—
 आलें चालुन इंग्लंड ठोकुनी छाती
शत्रूची होती पूर्वसिद्धता मोठी—
 कितिवीरांच्या पडल्या प्राणांशीं गांठी
अस्त्रांचा केला रिपुनें निर्दय मारा—
 रणनीतीच्या डोळ्यास लागल्या धारा
सारे किल्ले पडले मातींत मिळाले—
 फुटला सागर पूरावर पूरचि आले
त्या प्रळयकाळच्या लाटा ना आवरती—
 रिपुसेनाब्धीला भरतीवर ये भरती
राखावा कैसा लौकिक साम्राज्याचा—
 खालींवर होई जीव ब्रिटानियाचा
मारिली हाक तैं तिनें हिंदभूमिला—
 भगिनी बोलवि संकट कालीं भगिनीला
बाई ! तव पाठवि समर-धुरंधर पुत्र—
 पसरे यत्कीर्ती दुनियेवर सर्वत्र
ही कर्तव्याची हाक असे गे ! बाई—
 मी बसलयें मार्गीं नेत्र लावुनी ताई !

२

पोंचला चहुंकडे मातृ-भूमि-संदेश---
खडबडुनी जागा झाला भारतदेश
कमरा बांधोनी गेले हिंद शिपाई--
खांद्यास भिडउनी खांदा लढले भाई
मारून रेटले मार्न नदीवर वैरी---
व्हर्डुनवरतीं भरडून काढिले भारी

क्यॉले रक्षाया लालीलाल जहाले---
इप्रेसावरतीं रक्त ओक्षुनि धाले
गुरख्यांची कुकरी काळजास भिडणारी--
कितिकदां तिनें उडविली भली भंबेरी
शीखांचीं चक्रें शिरकृतन करणारीं---
चमक ती मराठी भाल्याची हो ! भारी

ज्यांनीं पेरावे सह्याद्रीचे माळ---
त्यांनीं चिरिले जर्मन कंठांचे नाळ
जे हिमालयाच्या तटीं चारिती ढोरें---
अॅल्पसाचें केलें लाल तयांनीं खोरें
काळ्या लोकांनीं सांडोनी रुधिराला---
कालिमा न लागूं दिला गौर तोंडाला !

पगडी राखी टोपीची मोठी लाज---
दिलदार हिंदुची जातच हिंमतबाज
दिल देतिल ज्याला मरतिल त्याच्यासाठीं---
गाजते चहुंकडे राजनिष्ठता मोठी

अहिमही फाडिले असुर रामदूतांनीं—
कैसर रावण उलथिला भारतीयांनीं
पडघम ढोलावरतीं टिपऱ्या झडझडऱ्या—
विजयाच्या तारा देशोदेशीं गेल्या
जयशाली परते उंच मराठी भाला—
पंचम जॉर्जाचा जयजयकार जहाला.

३

हा विजय असे आर्यांच्या बलशौर्याचा—
कीं प्रताप आहे हिंद राजनिष्ठेचा
हा प्रकार आहे दिव्य स्वामिभक्तीचा—
कीं प्रकाश आहे भरत-वंश-रत्नांचा
शाबास म्हणोनी अमेरिकेला गावें—
कां धन्यवाद त्या पंजाब्यांना द्यावे
वाहवा करावी फ्रान्साच्या धैर्याची—
कीं स्तुती करावी नेपाळी गुरख्यांची
हसावें कीं आंग्लांच्या दमछाकीला—
कीं पुनः पुनः गावें 'हर हर' घोषाला
मंगळवेला कोणाच्या अभिमानाची—
जा पुसा साक्ष रणदेवी देइल याची
अभिमान वाटतो हिंदूंना कीं हाच—
जगताचें केलें चित्ताकर्षण साच
साम्राज्यछत्र शांतता सुखाचें राहो—
काळजी प्रजा-पाळनीं सर्वदा वाहो.

---

# "चक्रव्यूह-बंध."

पापा अहो लक्षि रमेश भीही ।
गावा सखा सुस्वमनें तरीही ॥
ही रीत नेम स्वसुखास वागा ।
ही भी शमे रक्षिल हो ! अपापा. ॥

समजण्याची रीतः—चक्रव्यूहात शिरताना जीं जीं अक्षरें लागतात त्यानीं दोन ओळी तयार होतात आणि परत फिरतांना तींच अक्षरें उलटीं वाचून पुढच्या दोन ओळी तयार होतात.

पहिली ओळ उलट वाचा म्हणजे चौथी ओळ तयार होईल आणि दुसरी उलट वाचा म्हणजे तिसरी तयार होईल.

अर्थः—अहो ! रमेश ( श्रीविष्णु ) पापा ( पापाला ) लक्षि ( पर्यायानें नाश करितो ), भी ( ससारभय ) ही लक्षितो. ( असें आहे ) तरीही ( तो ) सखा ( श्रीविष्णु ) सुस्वमनें ( शुद्धांतःकरणानें ) गावा हो ! ही रीत नेम ( साधुजनांचा आहे म्हणून ) स्वसुखास वागा. ( म्हणजे ) ही भी ( संसारभीति ) शमे तो ( विष्णु ) अपापा रक्षिल.



## चक्रव्यूहबंध.

पापा अहो लक्षि रमेश भी ही !
गावा सखा सुस्वमनें तरी ही ॥
ही रीत नंम स्वसुखास यागा !
ही भी शमे रक्षिल हो ! अपापा ॥१॥

७ जुलै १९१६

सत्यमेव जयते

दु. आ.
तिवारी

# "कृपेची तुझी नित्य छाया असावी."

( वृत्त—भुजंगप्रयात. )

१

सुखाचा निधी तूंच देवाधिदेवा ! ।
स्वभावें करावी तुझी नित्य सेवा ॥
प्रभो ! त्वत्स्मृती नित्य मातें घडावी ।
कृपेची तुझी नित्य छाया असावी ॥

२

दिला त्वां मला मानुषी जन्म जेव्हां ।
स्तनीं आइच्या निर्मिलें दुग्ध तेव्हां ॥
तशी काळजी रक्षणाची वहावी ।
कृपेची तुझी नित्य छाया असावी ॥

३

"असें चांगलें कीं नसें" या विचारें ।
द्विधा होय हें चित्त माझें बिचारें ॥
तुझ्यावांचुनी कोण सन्मार्ग दावी ।
कृपेची तुझी नित्य छाया असावी ॥

४

रुसो बंधु सारे रुसो आप्त सारे ।
निजार्थी जनांचे जगीं हे पसारे ॥
तुझी रुष्टता मात्र देवा नसावी ।
कृपेची तुझी नित्य छाया असावी ॥

५

अहंमन्य गर्विष्ठ लोकाधिकारी ।
मनें जाहलीं व्यर्थ ज्यांचीं विकारीं ॥
असंतुष्टता काळजी कां वहावी ।
कृपेची तुझी नित्य छाया असावी ॥

६

नसे गधही श्रेष्ठतेचा मनाला ।
परी मानिती थोर जे आपणांला ॥
अशांचीं मनें कासया बा ! धरावी ।
कृपेची तुझी नित्य छाया असावी ॥

७

स्वयंस्फूर्तिचे ज्यांस नाहीं विचार ।
परांच्या मुखानेंच जे बोलणार ॥
असे शंख पाहून कां बुद्धि भ्यावी ।
कृपेची तुझी नित्य छाया असावी ॥

८

परोत्कर्ष ज्यांना मुळीं साहवेना ।
कुणाचें बरें हाय ! तें पाहवेना ॥
अशा निंदकांची क्षिती कां धरावी ।
कृपेची तुझी नित्य छाया असावी ॥

९

हटानें जरी बाळ जाई उन्हांत ।
कृपा उद्भवे माउलीच्या मनांत ॥

चुके मी जरी योग्य मार्गास लावी ।
कृपेची तुझी नित्य छाया असावी ॥

१०

असे ख्रिस्त तूं राम तूंची रहीम ।
अम्हाला परी व्यर्थ येई वहीम ॥
तुवां आमुची कींव बापा ! करावी ।
कृपेची तुझी नित्य छाया असावी ॥

११

नद्या वाहती भिन्न भिन्न प्रदेशीं ।
परी भेटती सर्व त्या सागराशीं ॥
तसे धर्म हे, भेदबुद्धी नसावी ।
कृपेची तुझी नित्य छाया असावी ॥

१२

जगीं राहशी सर्व भूतीं दयाळा ! ।
असे सांगती संत साधू अम्हाला ॥
कळेना तुझी भक्ति कैशी करावी ।
कृपेची तुझी नित्य छाया असावी ॥

१३

त्रिलोकीं तुझी गाजते दिव्य कीर्ती ।
दिसेना परी हाय कां स्पष्ट मूर्ती ॥
कशी खोल माया अम्हांला कळावी ।
कृपेची तुझी नित्य छाया असावी ॥

१४

नसे शांतता स्वस्थता हाय ! जीवां ।

मृगांना जलाभास होतात जेवीं ॥
दयेच्या घना प्रीतिधारा वहावी ।
कृपेची तुझी नित्य छाया असावी ॥

१५

कधीं खिन्न होई उदासीन होई ।
मना तीव्र उद्विग्नता ताप देई ॥
स्मृतीनें तुझ्या दुःस्थिती सर्व जावी ।
कृपेची तुझी नित्य छाया असावी ॥

१६

रमावें सदा चित्त हें चिंतनांत ।
रमावें तुझ्या नाम संकीर्तनांत ॥
प्रपंचीं परी सर्वथा साध्य नाहीं ।
कृपेची तुझी नित्य छाया असावी ॥

१७

तनूची जिथें शाश्वतीही नसावी ।
तिथें संपदा नित्य कैशी नसावी ॥
नको संपदा वाटते सर्वथा ही ।
कृपेची तुझी नित्य छाया असावी ॥

१८

कुणी द्रव्य मागे कुणी पुत्र मागे ।
तुझी भक्तकल्पद्रुमा ! कीर्ति गाजे ॥

मला देणगी मात्र ही आज द्यावी ।
कृपेची तुझी नित्य छाया असावी ॥

१९

किती सत्कवींनीं तुला प्रार्थुनीयां ।
सुकाव्यें फुलें अर्पिलीं गुंफुनीयां ।
मदीया तशी ! ऐक वा प्रार्थना ही ।
कृपेची तुझी नित्य छाया असावी ॥



REFBK-0001800

१८००